म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0014464

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38802 दि: ४-१-१४
क्रमांक 12842 नों. दि 10/1/65

# टाकीचे घाव

लेखक

कृ. गो. सूर्यवंशी

REFBK-0014464

मूल्य : तीन रुपये

जगताप-कारले प्रकाशन

प्रकाशक :

स. आ. जगताप
जगताप–कारले प्रकाशन,
१९२ शुक्रवार, पुणे २.

मुखपृष्ठ :

अनंत सालकर

प्रकाशन दिनांक

२८ फेब्रुवारी १९६५

मुद्रक :

मा. र. कारले
जनसेवा मुद्रणालय
१९२ शुक्रवार, पुणे २.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १४४६९

## प्रकरण १ ले

१० डिसेंबर १९६४. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अमरावती येथे भरलेल्या अधिवेशनाच्या उद्‌घाटनाचा दिवस. अमरावतीकरांनी आपल्या उज्ज्वल परंपरेला साजेलशी भव्य व उदात्त मांडणी अधिवेशनाची केली होती. त्यातून त्यांची कलादृष्टी दिसून येत होती. अकरा हजार लोक उद्‌घाटनाला हजर होते. उद्‌घाटक होते वसंतराव नाईक. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. साधा सरळ माणूस. जे मनाला पटेल ते बोलायचे. मनाला न पटतादेखील केवळ दुस- ऱ्यांना रुचेल, बरे वाटेल, असे बोलणारांचा एक वर्ग असतो. त्यांचे पाईक वसंतराव नाईक नव्हेत. अंत:करणात उमटलेले पडसाद शब्दाने साकार करून व्य कांपुढे सरळपणाने ठेवणे हा त्यांचा रिवाज. अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना साथ नी केलेले भाषण त्यांच्या सरळपणाची साक्ष देणारेच होते. कुस्तीगीर यादेच्या कार्याच्या वाढत्या पसाऱ्याचा परामर्श घेताना कुस्तीगीर परिषदेच्या काँग्रेसवंत शिल्पकारांचा उचित उल्लेख केल्यावाचून त्यांच्याने राहवले बँकेचे ते म्हणाले, " मल्लविद्येचा उत्कर्ष साधण्यासाठी योजनाबद्ध आखणी टेक्स्टाइ ती कार्यवाहीत आणणे आणि तेही सबंध महाराष्ट्र राज्य डोळ्यापुढे सदस्य,हे कार्य अनेक विचारवंत व तळमळीचे कार्यकर्ते यांच्या हार्दिक सहकार्या-

शिवाय होऊ शकणार नाही. ही गोष्ट खरी आहे. तथापि या कार्याची कल्पना रुजवून ती कार्यान्वित करणे, यासाठी जी अभूतपूर्व तळमळीची शक्ती लागते, ती मामासाहेबांच्या रूपाने उभी होती म्हणूनच कुस्तीगीर परिषदेची उभारणी झाली व शुक्लपक्षातील चंद्राप्रमाणे दिवसेंदिवस परिषदेच्या कार्याची व्याप्ती पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करू लागली. मामासाहेब मोहोळ ही मल्लविद्येची संजीवक शक्ती आहे. मामासाहेबांच्या रूपाने मल्लविद्येला जी प्रेरक आणि संजीवक शक्ती लाभली त्यामुळेच आज अवघ्या महाराष्ट्रातून पाचशेवर मल्ल लांग कसून प्रत्यक्ष मल्लयुद्ध करण्यासाठी अमरावतीस येऊन ठाकले आहेत.

"लहानथोर, शिक्षित, अशिक्षित, गरीब, श्रीमंत या सर्वांना बरोबर घेऊन कार्य कसे करावे, हे मामासाहेबांच्या पासून इतरांनी शिकण्यासारखे आहे. अहं-काराची बाधा होऊ न देता हाती घेतलेल्या कामासाठी अविश्रांत परिश्रम करीत राहाणे, हे जसे मामासाहेबांना जमले आहे, तसे क्वचितच इतरांना जमेल असे वाटते. या त्यांच्या गुण वैशिष्टयामुळे मामासाहेबांनी जिथे जिथे हात घातला, ते ते कार्य त्यांनी यशस्वी करून दाखविले आहे. ते जात्याच प्रसिद्धिपराङ्मुख असल्यामुळे त्यांचे नाव विदर्भातील तुम्हा लोकांपुढे कदाचित आले नसेल, पण कार्य मात्र खचित तुम्हापर्यंत पोहोचले आहे. पश्चिम महाराष्ट्रात मामासाहेबांना ओळखणार नाही, असा माणूस सापडणार नाही. मामासाहेब ही व्यक्ती नसून संस्था आहे. मामासाहेब म्हणजे महाराष्ट्रातील मंगल शक्तीचे प्रतीक आहे."

महाराष्ट्रातील विचारवंतांना, सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांना मामा-साहेब म्हणजे महाराष्ट्राच्या शक्तीचे प्रतीक वाटतात. त्यांच्यात त्यांना कुश संघटकाचा साक्षात्कार दिसतो, तर खेडोपाडीच्या असंख्य निरक्षर, ग आणि निराधार लोकांना मामासाहेबांचा मोठा व विश्वासाचा आधार वा मोकळेपणाने हे भोळेभाबडे खेडूत येतात आणि सरळ मामासाहेबांना भेट 'मनीचा हेत' आपल्या रांगड्या बोलीत स्पष्टपणाने त्यांना सांगतात व : "असं मामा तुमी आमच्यासाठी करा, ते कसं करायचं ते तुमचं तुमीच आमाला त्यातलं काई कळत न्हाई," असे मामासाहेबांना बजावतात.

लोकांना मामासाहेबांच्या विषयी किती आपुलकीची भावना आहे, हे यावरून दिसून येते. या लोकांना केव्हा यावे, कसे बोलावे, वगैरेबद्दलचे रूढ संकेत माहीत नसतात. ते केव्हाही येतात, रात्री बारा बारा वाजेपर्यंतदेखील येतात. दारावरची कडी खडखड वाजवतात आणि जोराने हाक मारतात, " अवो ऽ मामा, उठा, आमी आलोय् ! "

तसल्या अपरात्री गाढ झोपेत असलेले मामासाहेब चटकन जागे होतात आणि पटकन हाकेला प्रतिसाद देतात, " आलो, कडी काढतो हं. "

मामासाहेबांची झोप सावध आहे. हाकेसरशी ते जागे होतात. मामासाहेबांचे अंत:करणही असेच सावध आहे, गोरगरिबांच्या सादाला प्रतिसाद ते देते. त्यांच्यावर राग करीत नाही, दुस्वास नाही. काही नाही. लोकांना घरात घेऊन मामासाहेब त्यांच्याशी खुशाल तास–दीड तास बोलत बसतात, त्यांचे म्हणणे शांतपणाने ऐकतात. समजूतदारपणाने काय काय केले पाहिजे, हे सांगतात. बेकायदेशीर काही गोष्टी असल्या तर त्याबद्दल " नाहीरे बाबांनो असे करता येणार नाही, कायद्यात हे बसत नाही.बेकायदेशीर काही तरी करून किंवा खोटं नाटं करून कुणाचं भलं होत नाही. देशाचं वाटोळं होतं."अशा आपुलकीच्या भावनेने ओथंबलेल्या शब्दांनी लोकांची कानउघाडणीही करतात. लोकही म्हणतात, " वंगाळ असल तर राहू द्या, पण ह्यातनं पार कसं पडायचं, तुमीच बगा. "

असा लोकांचे विलक्षण प्रेम व विश्वास असलेला माणूस ही कधी व्यक्ती राहातच नाही, राहूही शकत नाही. तो संस्था बनतो. चालती बोलती जिवंत संस्था. अनेकांच्या कल्याणासाठी रात्रंदिवस झिजणारी संस्था. मामासाहेब ही व्यक्ती नसून ' संस्था ' आहेत. वसंतराव नाईकांचे हे उद्‌गार खऱ्या अर्थाने सार्थ आहेत.

या ना त्या नात्याने मामासाहेब अनेक संस्थांशी निगडीत आहेत. पुणे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, मुंबईतील, पुणे जिल्ह्यातील लोकांच्या फेडरेशनचे अध्यक्ष, भोर टेक्स्टाईल को-ऑप. सोसायटीचे कोषाध्यक्ष, अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सदस्य, महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसच्या कार्यकारिणीचे सभासद, पुणे जिल्हा

स्पोर्ट्स कौन्सिलचे अध्यक्ष,महाराष्ट्र स्टेट स्पोर्ट्स कौन्सिलचे सदस्य, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे संस्थापक व कार्याध्यक्ष, पुणे जिल्हा जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट ॲमॅ. रेसलींग असोसिएशनचे कार्याध्यक्ष, अखिल भारतीय हौशी कुस्तीगीर फेडरेशनचे उपाध्यक्ष, इंडस्ट्रिअल ट्रेनिग इन्स्टिटयूटचे सल्लागार, एम्प्लायमेंट एक्सचेंज ॲडव्हायझरी कमिटीचे सदस्य, पूरग्रस्त पुनर्वसन कमिटीचे सदस्य आणि महाराष्ट्र राज्य विधानसभेचे लोकनियुक्त सभासद या नात्याने मामासाहेब आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, क्रीडा व राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे वावरत आहेत. ज्या ज्या क्षेत्रात त्यांचे पदार्पण झाले, त्या त्या क्षेत्रात त्यांनी आपल्या वैशिष्ट्याचा ठसा उमटविल्याचे सुखद्दृश्य दिसून येते. या भिन्न भिन्न क्षेत्रातील, भिन्न भिन्न अनेक व्यक्तींशी त्यांचा संबंध आला आणि ते त्या लोकांच्या आदरास प्राप्त झाले. भिन्न भिन्न क्षेत्रात लोकादरास पात्र होणारी व्यक्ती आगळीच. हे आगळेपण मामासाहेबांना लाभले आहे. ते त्यांच्या निरलस, नि:स्पृह सेवेमुळे व प्रामाणिकपणे व तळमळीने काम करण्याच्या वृत्तीमुळे.

मामासाहेबांनी विविध कार्यक्षेत्रात अल्पावधीत जी विलक्षण प्रगती केली व जनतेच्या हृदयात विराजमान होण्याचे भाग्य मिळविले ते पाहून साहजिकच उद्गार निघतो, " अगा नवल वर्तले ! "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3८८०२ वि: चरित्र
क्रमांक ९२७२ नों. दि: १०।८।८५

## प्रकरण १ ले

मामासाहेबांचे आयुष्य विलक्षण नवलांनी भरलेले आहे. त्यांच्या जन्माची सुद्धा एक नवल कथाच आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुका हा मावळ-मराठ्यांचा मुलूख. या मुलुखातील मुळा खोरे हे त्यातल्या त्यात मावळ्यांचा बालेकिल्ला. या मुठाखोऱ्यातील डोंगर उतरणीवर वसलेले मुठे हे छोटेसे खेडे. या छोटेखानी डोंगराळ गावातील एका केंवळी घरात साठ वर्षांपूर्वी एका बालकाचा जन्म झाला. ५ फेब्रुवारी १९०५ हा दिवस. घर, घर कसले ते ! दीड खणाची केंवळी झोपडीच. घरापुढे थोडासा ओटा आणि मागे परडे आहे म्हणण्या-एवढे निरुंद परडे. घरात माणसे मोजकीच. सदाशिव–घरधनी, चिमाबाई–घर-धनीण, महादू–साधू ही दोन मुले, एवढेच मानवी जीव त्यावेळी केंबळीत घर-ट्याच्या आसऱ्याला राहात होते. त्यात एका नव्या जीवाची भर पडली.

दोनचार दिवस कसेबसे गेले. बाळ-बाळंतणीचे करायला कुणीतरी हवे म्हणून सदाशिवराव पुण्यास आले. पुण्यास सीताबाई होती. सीताबाई ही सदाशिव-रावांची कन्या. मारुती चिंचवडे यांना दिलेली. सासरहून माहेराला मुलीला न्यावी हा सदाशिवरावांचा इरादा. लेकीला न्यायला मोठ्या आशेने सदाशिवराव

निघाले. झुंजुमुंजचे घर सोडले. पाठीवर नाचणीच्या भाकरीची चवड, पायांत करकर वाजणाऱ्या जाड वहाणा. अंगात वंदाची वंडी, डोईला मुंडासे, नेसूला लंगोटी आणि हातात काठी, अशा थाटात भरदार मिशांना पीळ देत व अधेमधे तंबाखूला चुना लावून फक्कन् तोंडात टाकीत ही मावळ मराठ्याची स्वारी वहाणांच्या ' करा–करा ' आवाजाच्या तालावर तरातरा चालत निघाली. देव डोईवर यायच्या आत पुणे गाठायचे होते. लेकीच्या ओढीने सदाशिवरावांनी एका दमात वीस–एकवीस मैलांचे अंतर तोडले आणि पुणे गाठले. लेकीच्या दारात जाऊन हाक मारली,

" सीता ऽऽ ए सीता ! "

" कोण ?" म्हणत सीताबाई बाहेर आली आणि वडिलांना पाहून मायेच्या उमाळ्याने उद्गारली, " बाबा ! "

सीताबाई वडिलांच्या पाया पडली. सदाशिवरावांनी आशीर्वाद दिला, " औक्षवंत हो ! "

मुलीला ' औक्षवंत हो ' असा आशीर्वाद देणाऱ्या पित्याचे आयुष्य तर संपत आले होते. हे त्या बाप-लेकींना कुठले ठाऊक असणार ? परमेश्वराची करणी अगाध असते. त्याचा थांगपत्ता कोणालाच लागत नाही. सदाशिवरावांसारख्या बळकट बांध्याच्या, भरदार आणि राकट पुरुषाभोवती यमाचे दूत मृत्यूचे पाश घेऊन उभे आहेत, याची दाद कोणालाच नव्हती. बाप-लेक मोठ्या आनंदात होती. त्यांच्या या आनंदात जावई मारुतराव चिंचवडे सहभागी झाले होते.

ते दिवस प्लेगचे होते. पुण्यात प्लेगने कहर केला होता. लोक घरदार सोडून गावाबाहेर झोपड्या बांधून राहिले होते.

सदाशिवरावांचा तो दिवस लेकीच्या संगतीत व बापलेकींच्या सुखदु:खाच्या बोलण्यात भुर्रकन उडून गेला. लेकीने रात्री जेवणाचा खास बेत केला. सदाशिवरावांनी जेवण केले. समाधानाने ढेकर दिली आणि थकलेभागले शरीर कांबळीवर पसरले. त्यांना ताबडतोब झोप लागली. सीताबाई पहाटे उठली व आईकडे जाण्याची तयारी करू लागली.तोच तिला वडिलांच्या कण्हण्याचा आवाज आला.

ती चरकलीच आणि घाबऱ्या घाबऱ्या वडिलांकडे गेली. तिने त्यांच्या अंगाला हात लावला. ते रसरसीत लागले. तिला भडभडून आले. तिने हाक मारली,
" बाबा ! "

तशाही अवस्थेत सदाशिवराव उठून बसले. त्यांचा चेहरा उतरला होता. डोळे तांबुसले होते. ते खोल आवाजात म्हणाले,

" सीता, देवाचं आवातनं आलंय मला ! "

" बाबा ! " अशी व्याकुळ हाक मारत सीताबाई ओक्साबोक्शी रडू लागली. सदाशिवरावांना प्लेगाने गाठले होते. त्यांच्या काखेत प्लेगची गाठ उठली होती.

सीताबाई वेडीपिशी झाली. मारुतरावांनी धावपळ करून दवापाणी केलं ! पण जे व्हायचं तेच झालं.! लेकीला घेऊन गावी जायच्या ऐवजी सदाशिवराव एकटेच देवाघरी गेले. सीताबाईने एकच आकांत केला.

मुठ्याला बातमी कळली. तिथे तर फार कल्लोळ झाला. घरचा कर्ता पुरुष गेला. चिमाबाईवर दुःखाचा डोंगर कोसळला ! पदरी तीन मुलं ! बछडी ! त्यांना पोटाशी कवटाळत चिमाबाई आक्रोश करू लागल्या ! या मुलांना जगवायचं कसं हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. एकखांबी तंबूसारखा त्यांचा संसार होता. सदाशिवरावांनी काबाडकष्ट करावेत व जी काही मिळकत होईल, त्यावर घरच्या माणसांची गुजराण करावी, असे चालले होते. शेतीचा टीचभर तुकडा मालकीचा ! डोंगराळ शेती, तिथे पिकणार काय ? नाचणी नाही तर भात ! तेही सहजासहजी नाही. मरणाचे कष्ट करावेत तेव्हा कुठे रेताड जमिनीतून पसा पायली धान्य निघायचे. राबणाराच गेला, तेव्हा शेतीचे कष्ट कोण करणार ? काय पिकणार ? काय खाणार ? तंबूच्या आधाराचा खांब एकाएकी मोडला. तंबू कोसळला. संसार कोलमडला. या साऱ्या विचारांनी चिमाबाईला चहूकडून आकाश फाटल्यासारखे वाटले. ती धाय मोकलून रडू लागली. तिच्या डोळ्यातून आसवांची धार वाहू लागली. ती काही केल्या थांबेना. आजूबाजूच्या बायका जमल्या. त्यांनी धीर द्यायचा प्रयत्न केला, पण मुलांकडे पाहून त्यांनाच रडू कोसळले. सारी रडारड ! सांत्वन करण्यासाठी आलेल्या एका म्हातारीने म्हटले,

" चिमा, वल्या अंगानं रडू नगस ! वात हुईल ! बा तर गेलाच, पन आईबी जाईल पोरांची ! पोरं पोरकी हुतील ! त्येंचं वाळवान हुईल ! सगं-सोयरं, सुखाचं शेजारी, दुकाचं (दुःखाचं) कैवारी कोन ऱ्हाई ग बाई ! झालं गेलं इसरून जा ! पोरांच्या तोंडाकडं वगून इसरून जा ! देवाजीची मर्जी ! त्येला कोन काय करनार ? नवं प्वारच बापाच्या मुळावर आलं ! अशी येत्यात पोरं आई-बाच्या मुळावर. . . . ! "

म्हातारीच्या बोलण्याचा परिणाम झाला. चिमाबाईने शोक आवरला. पदराने डोळे पुसले. ती रडायची थांबली, पण तिच्या मनात नव्या पोराबद्दल किंतु आला, तिलाही वाटले, " मूल बाच्या मुळावर आलं ! "

मूल कधी आई-बापांच्या मूळावर येईल का ? छे: शक्यच नाही. असे कधी घडले नाही आणि घडणारही नाही. तथापि भोळीभावडी अज्ञानी माणसे असल्या भ्रामक समजुतींवर विश्वास ठेवतात. तसा मुठे गावच्या लोकांनी ठेवला व म्हणू लागले, " नवं मूल बाच्या मुळावर आलं ! "

मुळावर आलेले मूल कुणाला आवडणार ? ते नावडतेच ठरणार ! प्रत्येक जण त्याला हुडूत् हुडूत् करणार ! या नव्या बाळाच्या नशिबी जन्मताच हा भोग आला. अशा बापाच्या मुळावर आलेल्या नावडत्या मुलाचे कोडकौतुक कोण करणार ? कोडकौतुक राहू द्याच, या बाळाचे बारसेच कोणी घातले नाही. नाव कोणी ठेवले नाही. दिवसामागून दिवस जात होते. बाळ रांगू लागले तरी त्याचा नामकरण विधी काही झाला नाही. तो कधीच झाला नाही. त्या बाळाचे कोणी नाव ठेवले नाही तर बाळाला नाव पडले--

बाळाचा एक थोरला भाऊ होता. तो बालपणीच वारला होता. त्याचा चेहरामोहरा नव्या बाळासारखा होता. आईला वाटले, तोच बाळ परत पोटाला आला, म्हणून ती नव्या बाळाला त्या गेलेल्या बाळाच्याच नावाने हाक मारी, " नामदेव ! "

नामदेव हे बाळाचे खरे नाव नव्हे. खरे नाव कुणी ठेवलेच नाही. बाळ हे निनावीच राहिले, पण त्याला पडनाव मिळाले नामदेव ! नामदेव म्हणूनच सर्वजण हाक मारू लागले. बाळाच्या जन्मकाळचे जसे अघटित नवल घडले,

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... दि: ...


तसेच नवल त्याच्या नावाच्या बाबतीत घडले. जन्मकाळी उपेक्षा, नाव ठेवण्यात उपेक्षा, उपेक्षा बरोबर घेऊन बाळ जन्माला आले.

नाव न ठेवण्यावरच या बाळाची उपेक्षा थांबली नाही तर त्यापुढेही ती गेली. बाळाची आबाळ होत गेल्यामुळे तो सारखा रडायचा ! आईलाही त्यामुळे थोडाफार त्रास व्हायचा. तिने कष्टाची कामे करायला जायचे की बाळाचे करीत राहायचे ? काबाडकष्ट केल्याशिवाय चिमणे जीव जगायचे कसे ? तिकडे जावे तर मूल भोकाड पसरून आकांत करायचे. इकडे आड व तिकडे विहीर अशी तिची स्थिती झाली. तीही माउली परिस्थितीने गांजली व सारा राग बाळावर काढू लागली. आप्त-इष्ट, सगेसोयरे म्हणू लागले, " बाळ अवगुणी आहे, जन्म-ताच बापाला मारलं, आता साऱ्यांनाच टाळील ! सगळ्यांच्याच मुळावर आलेल्या कार्ट्यालाच मारलेलं काय वाईट ! "

बाळाला मारून टाकावे असे सारखे बोलले जाऊ लागले आणि खरोखरीच तसा प्रसंग आला.

चिमाबाई कष्ट करता करता टेकीस आल्या होत्या. त्या पुरत्या वैतागल्या होत्या. त्यांना जीव नकोसा झाला होता. त्या जगत होत्या त्या मुलांसाठी ! त्या मुलांनाही पोटाला मिळण्याची मारामार होऊ लागली. तेव्हा त्यांच्या जिवाला उबग आला. बाळाच्या जन्मापासून साडेसाती पाठी लागली होती. असलं नतद्रष्ट बाळ नाहीसं केलं तर काय बिघडणार आहे ? असे विचार त्यांच्या कानावर पडत ! वैतागाच्या भरात त्याही म्हणत, " अफू घालून मारावं या पोरट्याला ! "

आणि खरोखर पुण्याहून अफूची गोळी कुणी आप्तेष्टाने पाठविली. चिमा-बाईंनी ती घेतली. बाळाला मांडीवर आडवा घेतला. चिमटीत धरलेली अफूची गोळी बाळाच्या टाळ्याला चिकटविण्यासाठी नेत असता त्यांच्या मनात विचार डोकावला, " या गोळीने तरी लागू दे काळझोप ! मोकळी तरी होईन मी एकदाची. बाकीच्यांचं करायला "

गोळी धरलेली चिमूट बाळाच्या तोंडापुढे नेली. बाळ टक लावून आईकडे पाहत होता. आई व्याकुळ नजरेने बाळाच्या चेहरा न्याहाळीत होती. नाइलाजाने

ती आसुरी करणी करायला प्रवृत्त झाली होती. पोटच्या पोराचा घात करायला धजत होती. गोळी तोंडात कोंबायचा निर्धार तिने केला. स्वत:चा श्वास रोखून धरला आणि बाळाच्या ओठाजवळ गोळी नेली. इतक्यात बाळ खुदकन् हसले आणि आईला बिलगले. आई ही आई असते. तिला मायेचा उमाळा आला. वात्सल्याला भरती आली. चेहऱ्यावरील भाव बदलला. अफूची गोळी भिरकावून दिली. बाळाला पोटाशी घट्ट घट्ट धरून ठेवले. डोळ्यातले उष्ण अश्रू बाळाच्या गालावर टपकले. बाळाने वर पाहिले आणि आपल्या चिमुकल्या दोन्ही हातांनी आईचे तोंड कुरवाळिले. मुलाने आईची आसवे पुसली. आईला भडभडून आले. स्वत:वर रागावीत, स्वत:ला दोष देत तिने बाळाला पटकन उचलून घेतले आणि पटकन मुका घेत म्हणाली,

" किती गुणाचं बाळ माझं ! द्येवाच्या गुणाचं पोर हाये माझं ! मला कसली अवदसा आठीवली होती मी. आन् पोराचा घात करीत होती मी.पोरानं साक्शात्कार दिला, माझी आसवं पुसली, खचित् प्वार गुनी हाये ! आश्राप जीवाचं आसवं पुसनारं हाये ! मी गावोगाव फिरेन, मोलमजुरी करीन, वनवास भोगीन, पन ह्या गुनाच्या गुनवंताला—पोटच्या गोळ्याला—वाढवीन. "

# प्रकरण ३ रे

रक्ताचे पाणी करून मुलांचे संगोपन करण्याचे काम चिमाबाईने मोठ्या धैर्याने आणि नेटाने चालविले. घरची जमीन थोडी, पाचसहा खाचरे फक्त. त्य जमिनीवरही सावकाराचा बोजा. सदाशिवरावांनी अडीअडचणीला सावकारा कडून रक्कम काढली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या तेराव्यासाठी चिमा बाईंनी काही रक्कम घेतली होती. सावकाराचा बोजा वाढत होता. तो वाढतच जाणार होता. शेतीत कसायला कोणी नव्हते. एकटी चिमाबाई शेतीच्या कस वटीला कशी पुरी पडणार ? अपुरी शेती, अपुरी मशागत, त्यातून पीकही अपुरे येणार. बाईमाणूस राबराबून पोरांच्या पोटाची चिंता काही ती दूर करू शकत नव्हती. चिंता वाढतच चालली होती. मुले अन्नवस्त्राला पारखी होत होती शेजारीपाजारी, गणगोत हे तर उण्याचे वाटेकरी. शितं असतात, तोपर्यंत भु जमतात. गणगोतांचेही तसेच. संकटकाळात कोणी उपयोगाला येत नाही. चिम बाईला याचा अनुभव आला. रात्रंदिवस कष्ट करून पोरांच्या पोटातली आ ती काही शमवू शकत नव्हती. पुरेसे अन्न पोरांना देऊ शकत नव्हती. तिचे अंत करण तीळ तीळ तुटायचे. पण गरिबांच्या भावनांची कदर कधी कुणी केली आ का ? काही माणसांचा जन्म दुःख भोगण्यासाठीच झालेला असतो. चिमाब

त्याला अपवाद नव्हती. चिमाबाईच्या जीवनाची परवड चालली होती. ती निढळाचा घाम गाळीत होती, परंतु गोळाभर अन्नाला अन् टीचभर वस्त्राला महाग झाली होती. आपल्याला, मुलाला ती दूध देऊ शकत नव्हती. मुलांसाठी दूध असते, हे खरे, पण ते गरिबाच्या मुलाला मिळेलच असे नाही. सदाशिव-रावांची तिन्ही मुले अशी दुधाला वंचीत झाली होती. शेवटचा नामदेव तर दूध कधी बालपणी प्यालाच नाही. त्याला ते कधी मिळालेच नाही. दैन्यामुळे घरी दुभते नव्हते आणि विपन्नावस्थेत दुसरे कोण देणार ? नाचणीची भाकरी आणि तुरीची आमटी मिळायची जिथे मारामार, तिथे दुधाचे नाव कशाला ?

अंगावरचा नामदेव, सहा वर्षांचा सहदेव म्हणजेच सादू आणि नऊ वर्षाचा महादू या तिघांचे ओझे चिमाबाईच्या शिरावर होते. या चिमण्या जीवांना तिला जगवायचे होते. या चिमण्यांना भरविण्यासाठी चिमाबाई कोंबडा आरवल्यापासून ती थेट गाव सामसूम होईपर्यंत राबायची. पण दीड खणाच्या केंबळीत–घरात–नशीबाला बोल लावीत आसवे गाळायची. राबूनही पोटापुरते मिळत नाही तर त्या बिचारीने करायचे काय ? पोरे जगवावीत तरी कशी ? कोंडचाचा मांडा करून आणि मीठभाकरी घालून ती पोरांचे जीव तगवून धरीत होती.

नामदेव तीन एक वर्षाचा झाला असेल. त्यावेळची गोष्ट. तो रडतच उठला. तो खायला मागू लागला. चिमाबाईने पाठीत धपाटा घातला व बाहेर जायला सांगितले. उठल्याबरोबर पोराला खायला कुठले देणार बिचारी ! पोर काही बाहेर गेले नाही. त्याने रडून गोंधळ केला. त्याला सपाटून भूक लागली होती. आपल्या घरी काही नाही, आपण मागू नये हे त्या बालजीवाला कसे उमगणार ? भूक लागली की खावे, असे त्याला वाटणारच. म्हणून तो खायला मागत होता आणि त्याची आई अन्न द्यावयाच्या ऐवजी मार देत होती. नामदेवाचे रडे थांबेना. चिमाबाई कातावली. शिळ्यापाक्याची टोपली खसकन् ओढली आन् रागाने चारदोन नाचणीच्या भाकरीचे तुकडे घंगाळात ठेवून घंगाळ नामदेवापुढे आपटले. नामदेवाचे रडे थांबले. वाळलेले नाचणीचे शिळे तुकडे पाहून त्याला आनंद झाला. आपल्याला खायला मिळणार, याचा तो आनंद होता. भाकरी आली. आता आई कोरडचास वाढेल, याची तो वाट पाहू लागला. पण आई त्याच्याकडे

ढुंकूनही पाहीना. तिचे डोळे पाण्याने डबडबले होते. वाट पाहून नामदेव थकला आणि चिडक्या आवाजात म्हणाला, " आये, भाकरी घातलीस आन् कोरड्यास?

" माज्या हाडाचं करून घालू का ? कुटलं आनू ? " वैतागाने चिमाबाई म्हणाली.

" मग, खाऊ कशासंगं भाकर ? " नामदेव ओरडला.

" खाकी मीटावरूबर, काय झालं त्येला ! "

" घाल की ? "

चिमाबाईने मीठ वाढले. नामदेवाने मीठावरोबर ते नाचणीच्या भाकरीचे शिळे तुकडे खाल्ले. मोठ्या आवडीने खाल्ले. तो आनंदाने बाहेर खेळायला गेला आणि चिमाबाईने मात्र ओक्साबोक्सी रडून पदर ओला केला.

दिवस उगवत होता आणि मावळत होता. चिमाबाईच्या चिंता मात्र मावळत नव्हत्या. त्या वाढतच होत्या. बिचारी जिवाचे रान करीत होती. पण तीन वछड्यांची पोटे काही भरू शकत नव्हती. तिच्या कष्टाला सीमा नव्हती ! ती राकट होती, पण धडधाकट नव्हती. आजारीपणात तिचा एक पाय अधू झाला होता. ती लंगडी झाली होती. पायात व्यंग असूनही ती जीवनासाठी धडपड करीत होती. आपल्या नव्हे तर पोरांच्या. पोरांचे लेंढार नसते तर केव्हाच बिचारीने आपल्या जिवाचे बरे-वाईट करून घेतले असते. तिच्या जीवनात राम उरला नव्हता. पण ती आता मरायची इच्छा असूनही मरू शकत नव्हती. तिचा जीव तीन अजाण मुलांत अडकला होता. त्यांना तिला जगवायचे होते. तेच तिच्या वंशाचे दीप होते. हे दीप विझू नयेत याची तिला काळजी घ्यायची होती. त्यासाठीच ती स्वतः झिजत होती.

पण दिवसेंदिवस तिची परिस्थिती बिकट होत चालली. कठीण समय आला असता कोण कुणाच्या उपयोगी पडतो का ? नाही. चिमाबाईला गणगोतांनी मदतीचा हात दिला नाही. उण्यादुण्यांनी मात्र तिचे काळीज करपून टाकायला त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. हे त्या माउलीला सहन झाले नाही. हजार इंगळ्या डसल्यागत तिच्या हृदयाला वेदना झाल्या. तिला गणगोतात राहणे नकोसे वाटू लागले.

सावकाराचा लकडा त्यात पाठीस लागला. त्याला कळून चुकले की लंगडी चिमाबाई पैसे परत करू शकत नाही. त्याने तगाद्यावर तगादे सुरू केले. वारंवार सावकार दारात दत्त. चिमाबाई मानी होती. तिला मरणापेक्षा जास्त दुःख झाले. असले जीणे जगण्यापेक्षा मरण तिला बरे वाटू लागले.

बरे, दागदागिने भांडीकुंडी विकून सावकार भागवावा म्हटले तर अंगावर फुटका मणी नाही. लंकेची पार्वती होती ती. भांडीकुंडी विकावी म्हटले तर मडक्याशिवाय घरात कसलंच भांडं नाही !

चहूकडून ती कोंडीत सापडली. तिच्या मनाचा पुरता, कोंडमारा झाला. गावी मानाने राहणे तिला अशक्य वाटू लागले. नामुष्कीने व मुर्दाडपणे, चोंबडे-पणाने गावात राहणे तिच्या मानी मनाला पटेना.

ती रात्र रात्र विचारात घालवू लागली. शेवटी तिने मनाचा हिय्या केला. सावकाराला बोलाविले, सावकार आला. त्याला चिमाबाईने सांगितले, " सावकार, तुमच्या रीणात मी राहणार नाही, माज्या कुळीच्या सात पिढ्या नरकात घालणार न्हाई ! "

" चांगली गोष्ट आहे, मग दे की पैसे ! " सावकार मानभावीपणे बोलला.

" पैसं ? पैसं कुटलं देऊ ? दातावर मारायला कवडी न्हाई घरात ! पैका असता तर माजी पोरं नागडी–उघडी कशापायी हिंडली असती ! " चिमाबाई आतडे पिळवटून म्हणाली.

" मग तोड काय काडलीस ? " सावकार धूर्तपणे म्हणाला.

" मी बाई माणूस. त्यात अडाणी. मी काय तोड काडणार! तुमी शानं-सुरतं, ल्हेणारी. काडा तुमीच तोड ! " चिमाबाईने सावकाराचा कावा ओळखला होता. त्याला चिमाबाईची जमीन गिळायची हुती !

" अस्सं होय ! मग त्याला एक उपाय आहे. " सावकार सावकाश बोलला.

" कंचा ? " चिमाबाईने काळजीच्या सुरात विचारले.

" घे शेपन्नास आणखी आणि दे खरेदीखत करून शेताचं ! हो, पोरांची पोटाची काळजी तरी मिटेल थोडे दिवस ! "

"थोडं दिस गेल्यावर काय खातील पोरं ?" चिमाबाईने सावकाराला उलट विचारले.

"मग देवाची मर्जी !" सावकार सुस्कारा टाकीत बोलला.

"आजवर माज्या पोरांची काळजी कुणी घेतली न्हाई आनि फुडंही कोन घेनार न्हाई, हाय मला ठावं. देवाच्या मर्जीवरच ती जगायची ! माज्या पोरांची काळजी घ्याला ह्याय मी मस्त समरथ ! माज्याच्यानं झेपलं तंवर जगवीन आणि ज्या दिशी वाटेल की आता निवनार न्हाई माझ्याकडून, त्या दिशी सोताच्या हातानं मारून टाकीन त्यास्नी, पण कुनाच्या दारात भीक मागायला पाठवायची न्हाई !"

"एवढी हिंमत आहे तर काढ की तूच तोड !" सावकार खवचटपणे म्हणाला.

"हे बगा, घरखर्चासाठीच पैसं काडल्यात, ते काई लई न्हाईत !" चिमाबाईने मुद्याला हात घातला.

"आणि तुझ्या नवऱ्याच्या दिवसाला घेतलेले विसरलीस वाटतं ! तू विसरलीस तरी मी कसा विसरेन !"

"मी इसारले न्हाई आनि मी सूट बी मागत न्हाई ! काडल्यालं पैसं थोडं हाईत. त्येच्याबद्दल श्यात घ्या दोनचार वर्सं लावून नि टाका वळत करून !" चिमाबाईने हिशेबी बोलणे केले. सावकाराला ते रुचले नाही. त्याने आरडाओरडा करायला सुरुवात केली. कांगावा सुरू केला.

लोक म्हणजे चालत्या घोड्यावरच्या गोमाशा. मोडक्या कुपावर पाय द्यायची रीत त्यांची ! लोकांनी सावकाराची तळी उचलली. चिमाबाईला बोल लावला.

शेवटी चिमाबाईला चीड आली आणि ती रागाने म्हणाली, "व्हय वो सावकार, किती दिस तुमच्याकडं जमीन दिली की तुमचं पैसं फिटतील ?"

"बारा वर्स !" सावकारानं सांगितले.

"बरं, करा करार तसा" चिमाबाई बोलली.

सावकार खुषीत आला. त्याने करार केला. कर्जाच्या पोटी बारा साल शेत सावकाराने खायचे. एक दाणादेखील मूळ मालकाला म्हणजे चिमाबाईला मिळायचा नाही !

जुजवी कर्जापायी बारा वर्षे जमीन सावकाराच्या ताब्यात दिली आणि दुसऱ्या दिवशी कोंबडा आरवताच तीन मुलांना घेऊन घर सोडले, गाव सोडले.

## प्रकरण ४ थे

चिमाबाई मुले घेऊन वनवासाला निघाली. तिने मुठे गाव सोडले आणि थेट मुंबई गाठली. मुंबई गोरगरिबांचे मायपोट. मुठे गावची काही माणसे माजगावला होती. तिथे चिमाबाई गेली. त्यांना चिमाबाईवर गुदरलेला प्रसंग पाहून फार वाईट वाटले. चिमुकल्या मुलांच्या सुकलेल्या तोंडाकडे पाहून भडभडून आले. चिमाबाईला त्यांनी धीर दिला. त्यांनीच ओळखीपाळखीचे चार घरची कामे मिळवून दिली. ती मालकिणीची मोलकरीण बनली. दुसऱ्यांच्या घरची धुणी–भांडी करताना तिच्या आतड्याला पीळ पडे. पण मुलांसाठी ती निमूटपणे सारे सहन करी. देव तिची कसोटी पाहत होता. तिने यातना सहन कराव्या, घाम गाळावा आणि मुलांचे पोट भरावे, असा जणू दैवाचा भोग होता. चिमाबाई हा भोग पोटच्या गोळ्यांसाठी भोगत होती. परघरची धुणी धूत होती, भांडी घासत होती. कधी कधी तिचे मानी मन उचंबळून आले की डोळ्यातून गळणारी आसवे घासत असलेल्या भांड्यांच्या मलीन पाण्यात मिसळून जात होती. ती मुकाट्याने आणि मनापासून काम करीत होती. मन मानी असल्यामुळे इतरांकडून बसलेली बोलणी आपणास सहन होणार नाहीत, यासाठी कोणास बोलायचा वाव मिळू नये असे चोख काम ती करीत होती. घाम गाळून जे चार

छदाम मिळतील त्यावर मुलांचा सांभाळ करीत होती. कुणाच्या दारात पोरांना हात पसरायला मात्र पाठवीत नव्हती.

कष्टाळूवृत्ती, सचोटी व प्रामाणिकपणा या गुणांमुळे ती ज्या घरची कामे करीत होती, तेथील लोकांच्या विश्वासाला पात्र झाली होती. त्यांची तिच्यावर माया जडली होती. ते म्हणत——

" आमची चिमा किती सालस, किती कष्टाळू, तिला आळस ठाऊक नाही, कामात कसूर नाही. ती घासून घेईल, पण हसून घेणार नाही. कधी वायफळ बडबडणार नाही. बोलणं बेताचं आणि उचित. चोंबडेपणा तिच्या गावीही नाही. वाटतं, चिमा म्हणजे घरचंच वडिलधारं माणूस, इतक्या आपुलकीनं आणि जपून काम करते ती ! "

लोकांचा लोभ भारी. वैऱ्यावर येऊ नये असला प्रसंग चिमाबाईवर आलेला पाहून त्यांना वाईट वाटले. तिची वणवण करणारी मुले पाहून त्यांचेही अंत:करण तुटू लागले. त्यांनी उंबरशेठच्या चाळीत चिमाबाईला दोन खणी खोली मिळवून दिली. चिमाबाईला निवारा मिळाला. या भाड्याच्या खोलीत चिमाबाई आपल्या पाखरांना कुशीत घेऊन चार घटका पडत असे.

अशा अवस्थेतही चिमाबाईला समाधान वाटत होते. आपण आपली मुले काबाडकष्ट करून जगवितो, त्यांना दुसऱ्याच्या दारात तोंड वेंगाडत जायची पाळी येऊ देत नाही, याचे समाधान होते ते.

पण एकटीच्या मिळकतीवर वाढती तोंडे भागणार कशी ? मोलकरीण मिळवून मिळवून किती मिळविणार ? तिचा म्हादा आता बारा वर्षांचा झाला होता. त्याला कुठे तरी चिकटवून टाकावा असे तिच्या मनात आले. लोकांना तिच्याबद्दल आदर वाटत होता. चिमाबाईने गोष्ट काढताच एकाने म्हटले, " चिमाबाई चिंता करू नका. मी लावतो गिरणीत म्हादाला ! " पण मूल कोवळं आहे, गिरणीतलं काम भारी वाईट, जीव खाणारं ! "

" गरिबास्नी मरणाला भिऊन कसं चाललं ! मराण तर त्यांच्या पाचवीलाच पुजल्यालं असतं ! " कवळं वय म्हणून गप्प बसून प्वाट कसं भरलं ! भीक

...२

मागावी लागंल ! मानानं जगायचं आसलं नि भीकेची झोळी टाळायची असली तर कसलंबी काम कराया होवं ! " चिमाबाईने मनातले सारे बोलून टाकले.

" वरं तर उद्या म्हादा येऊ दे माझ्याबरोबर गिरणीत ! " तो माणूस म्हणाला.

दुसऱ्या दिवसापासून म्हादा गिरण-कामगार बनला. कमरेला उणीपुरी लंगोटी लावलेला मावळा म्हादा कापडाच्या गिरणीचा कामगार झाला !

म्हादाला पगार तोटकाच होता. अडाणी पोराला पगार तो किती मिळणार ? पण मिळणारे पाचसहा रुपये हे लाख मोलाचे वाटले म्हादाच्या आईला. बुडत्याला काडीचा आधार लाभला !

म्हादा रांगेला लागला तरी सादाची काळजी होतीच की चिमाबाईला. सहदेवाचे म्हणजे सादाचे करायचे काय ? शाळेची पायरी तो चढला नव्हता. आठ-नऊ वर्षांचे वय होते. शाळेचे वय होते खरे, पण त्याला शाळेत घालणार कोण ? शाळेत गेला तर आला का खर्च पाटी-पुस्तकांचा, कपडेलत्त्यांचा ! एवढा खर्च करणे चिमाबाईच्या आवाक्याबाहेरचे होते. मग करायचे काय ह्या सादाचे ? हिंडत फिरत, खातपीत सादाने राहावा, असे चिमाबाईला वाटत नव्हते. अशाने तिच्या मागची विवंचना संपणार नव्हती. खेळण्यासाठी का गरिबांच्या पोरांचा जन्म असतो. तो राबण्यासाठी असतो. तिने मनाशी खूप खूप विचार केला. काय करावे सादूचे ? नोकरी लावावी म्हटली तर आठ-नऊ वर्षांच्या पोराला कोण नोकरी देणार ? आणि ते पोर करणार तरी नोकरी कसली ?

पण कसली ना कसली तरी नोकरी सादूने केलीच पाहिजे. त्याशिवाय भागणार नव्हते. शेवटी सादूला चाकरमानी बनवायचे चिमाबाईने ठरविले. याला सांग, त्याला सांग, अशा रीतीने खटपट चालविली.

शेवटी चिमाबाईच्या प्रयत्नाला फळ आले, एका ऑफिसात सादूला घेऊन ती गेली. अंगात कुडते, कमरेस लंगोटी लावलेले एवढेसे काटकोळे पोर पाहून तेथील अधिकारी म्हणाला, " बाई, काय करणार काम हे पोर ! "

चिमाबाईने उत्तर दिले, " तुमी सांगाल ते ! कामाला डरायचं न्हाई प्वार माजं ! त्येच्या लहानपणावर जाऊ नका नी न्हाई म्हणू नका ! "

" शिकायचं वय त्याचं ! " तो अधिकारी म्हणाला.

" पन त्येच्या नशिबात न्हाई ते ! गरिबाच्या पोटाला आल्यावर शिक्शान फिक्शान कुटचं ? जलमल्यापस्नं मरस्तोवर काम ! काम ! काम ! काम केल्याबगर जगायचं कसं ? " चिमाबाईने गरिबाची करुण कहाणीच मांडली.

" मग कोणतं द्यायचं काम ? शिक्षण नसल्यामुळे पोराला कारकून नेमता येत नाही. मोठं नसल्यामुळं श्रमाचं काम देता येत नाही. जाणता नसल्यामुळं टपाल आणि फायली न्या-आणायचं काम त्याच्यावर सोपवता येत नाही. बाई, आता मी काय करू ? तुम्हीच सांगा. "

चिमाबाई चिंतातूर झाली. तिची नजर सहज वर गेली. तिथे कापडाचा पंखा होता. तिने चटकन साहेबाला सांगितले,

" साहेब, ह्यो पंका माजा सादू वडंल दिसभर, त्येच्या जोगतं काम हाय ? आपनास्नी वारा घालील पंका हालवून, तुमी मातुर त्येच्या तोंडात चारा घाला चाकरीला ठेवून घेऊन ! " चिमाबाईच्या बोलण्याचा परिणाम झाला त्या अधिकाऱ्याच्या मनावर व त्याने म्हटले,

" बरं तर राहू दे आजपासून कामावर ! "

आठ-नऊ वर्षांचा सादू त्या दिवसापासून पंखेवाला बनला. साहेबाच्या खोलीच्या बाहेर तो सारखा दोरीने पंखा हालवीत बसलेला असायचा. दिवसभर हेच काम. पंखा हालविणे.

सादू चाकरमानी झाला. महिन्याला दोनचार रुपये मिळवू लागला. हो तेवढीच भर पडली. चारदोन रुपये म्हणजे काही कमी रक्कम नव्हे गरिबाला. गरिबाला एक एक रुपाया कायलीच्या बुडाएवढा वाटत असतो !

म्हादू अगोदरच रांगेला लागला होता. आता सादूही लागला. राहता राहिला नामू ! नामाचे काय करावे ? काय करणार ? तो तर अवघा चार वर्षांचा ! नामाच्या बाबतीत काहीच करता येत नव्हते.

चिमाबाई, म्हादा व सादा सगळीजण कामाला जायची. राहायचा तेवढा नामा. तो आपला चाळीतल्या पोरांत खेळ खेळ खेळायचा ! दिवसभर हाच उद्योग. अंगात कुडते घातलेला नामा कधी गोटया खेळ, तर कधी पतंग उडव,

कटलेल्या पतंगामागे वर बघत धावत सूट, कधी समुद्रकिनारी जा, पाण्यात जाऊन धिंगाणा घाल. कुठेही भटकावे, मोकाट सुटलेल्या जनावरागत. कोण होते नामाला आळा घालायला ? वळण लावायला ?

आईने हे सारे केले पाहिजे खरे, पण तिला कुठे होती सवड ! तिच्यापुढे गंभीर प्रश्न होता मुलांना जगवायचे कसे ? जगल्यावर बाकीचे सगळे ! जगणे हे महत्त्वाचे. म्हणून ती मुलांना जगविण्याच्या खटाटोपात होती. तिला क्षणाचीही उसंत मिळत नव्हती. आपली मुले चांगली व्हावीत, त्यांना वाईट वळण लागू नये, असे तिला कितीतरी वाटे. परंतु गरिबांच्या अशा वाटण्याची कोणी कदर केली आहे का ? कधी ते सफल झाले आहे का ? मुलांना चांगले वळण लावले पाहिजे, त्यासाठी त्यांना शाळेला पाठविले पाहिजे, त्यांच्यावर एरवी देखील देखरेख ठेवली पाहिजे, असे विचार चिमाबाईच्या मनात येत आणि परिस्थितीच्या चटक्यात त्यांची वाफ होऊन ते कुठल्या कुठे निघून जात. गवताची पाती किती उगवतात, किती मरतात, कुणी तिकडे ध्यान दिले आहे काय ? तीच गत गरिबांची ! त्यांच्याकडे कुणी लक्ष दिले आहे का ? ती माणसे जगतात का तर मरण येत नाही म्हणून ! आणि मरतात का तर जगता येत नाही म्हणून. जन्मल्यापासून मरेपर्यंत हा तो काळ जातो, त्या काळात त्यांच्या ललाटी घाम व आसवं, हालअपेष्टा, दुःख यापरते दुसरे काही नाही ! इतर प्राण्यांपेक्षा मानव हा वेगळा प्राणी आहे, असे आपण समजतो. तथापि गोरगरिबांकडे पाहिले की वाटते, हे मानव गटात मोडण्यापेक्षा मानवेतर प्राण्यांच्या गटात त्यांची दुर्दैवाने गणना करावी लागते. कारण मानवेतर प्राणी पोट भरण्यासाठीच धडपडतो. जन्मभर त्याची धडपड तेवढीच असते. गोरगरिबांची स्थिती व मानवेतर प्राण्यांची स्थिती यात काय फरक उरतो ? पोट भरण्यासाठी मरेपर्यंत राबणे हा एकच उद्योग !

चिमाबाईला वाटे, आपली मुले 'माणसे' व्हावीत—चांगल्या वळणाची माणसे व्हावीत. तिला आजुबाजूला जे दिसत होते, ते पाहून तिच्या अंगावर शहारे येत. मनाची उलघाल होई. मुंबई गरिबांचा आधार तसेच गुंडांचे—दादा लोकांचे आगर. मऊ लुसलुशीत हिरवळीमध्ये क्वचित हिरवा विषारी साप दडलेला असावा.—तसे हे दादा लोक. या लोकांचा उद्योग भारी वाईट. ज्याच्यावर दात

धरतील, त्याचा काटा काढतील. एखाद्या माणसाला मारायचे असेल तर ते सुपारी घेत. त्याबद्दल पैसे घेत. आणि मग आपल्या बगलबच्च्यांकडून ठरलेल्या माणसाला मारीत. अगदी दिवसाढवळ्या ठोकीत. असले प्रकार वारंवार होत. चिमाबाईने असाच एक प्रसंग पाहिला होता. एक तरणाबांड गडी खाली मान घालून झपाझप रस्त्याने चालला होता. म्हातारपागडी विभागाचा दादा पान चघळीत व पचापचा थुंकीत बसला होता एका पानाच्या लादीवर. त्याची नजर त्या जाणाऱ्या माणसावर गेली. त्याने मिशीला पीळ भरला आणि तोंडात दोन बोटे घालून जोराने शीळ वाजविली. तो तरणाबांड गडी शीळ ऐकून गांगरला व भीतीने पळू लागला. तोच समोरून दोन धटिंगण आले आणि त्याला जोराचा धक्का दिला. तो गडी ' मेलो ! मेलो ! ! ' म्हणून कोसळला. त्या धटिंगणांनी त्याला ' धर की आपट ' हे सत्र सुरू केले. सुरुवातीला तो गडी खूप ओरडला आणि शेवटी निपचित पडला. तशा अवस्थेत त्या धटिंगणांनी त्याची तंगडी धरून फरफटत, मेलेलं कुत्रं नेतात तसे नेले. बघे खूप जमले होते, पण एकाचा धीर झाला नाही सोडवायला जायचा किंवा ' का मारता बिचाऱ्याला ? ' असे म्हणायचा ! साऱ्यांच्या वाचा बसलेल्या. आले, पाहिले आणि गुपचूप निघून गेले.

चिमाबाईने हे पाहिले. तिचा जीव हळहळला. तिला भीती वाटली. आपल्या जिवाची नाही. मुलांच्या जिवाचीही नाही तर मुलांच्या भवितव्यतेची! असल्या वातावरणात मुले वाढली तर मुलांना असेच वळण लागेल, ती गुंड होतील, दादा होतील आणि निरपराध लोकांना छळतील ! लोकांचे मारेकरी होतील. तिला ही कल्पनाच सहन होईना. तिला आपली मुले लोकांना मारणारी व्हायला नको होती. लोकांना तारणारी व्हायला हवी होती. पण असल्या घाणेरड्या वातावरणात मुलांना रंग नसला तरी वास लागायचाच की, यामुळे ती बेचैन झाली होती. संगतीने मुले बिघडू नयेत म्हणून ती मुलांना कुठे तरी चांगल्यांच्या संगतीत गुंतवायचा प्रयत्न करीत होती. स्वार्थाबरोबर परमार्थ साधावा म्हणून दोन मुलांना नोकरीस लावले होते. आता तिला काळजी होती फक्त नामाची !

नामा लहान असल्यामुळे ती काहीच करू शकत नव्हती. त्या पाच वर्षांच्या नामाला एकटे सोडून ती कामधंद्याला जात होती. उघडानागडा नामा काम

गारांच्या पोरांत खेळत हिंडत होता. होते पोर एवढेसे, गिड्डुकले, हाडकुळे, चपने नि चिवट. चपनी पोरे असतातच मुलखावेगळी. चपना नामा इरेला पडणारा. इरेला पडला की मग त्याला कशाचे भान उरायचे नाही. ईर्षा पुरी केल्याशिवाय सोडायचा नाही. या नामाच्या खोडीमुळे चिमाबाईचा जीव सारखा टांगलेला असायचा. तिला नामाची धास्ती वाटायची.

तिला वाटणारी धास्ती अनाठायी नव्हती. एकदा काय झाले, ही मुले गेली दुपारी हिंडायला. इकडे जा, तिकडे जा, करीत करीत हा पोरांचा तांडा माज-गावातील दारूखान्याजवळच्या धक्क्यावर गेला. या धक्क्याला रेतीचे व लाक-डाचे पडाव लागत. त्या दिवशी एकही पडाव धक्क्याला लागला नव्हता. पाणी खोल होते. पोरांचा तांडा थोडाच स्वस्थ बसणार. कोणी पाण्यात खडा फेकून 'डुबक्' आवाज काढीत होते, तर कोणी सफाईदारपणे दगडाची फेक करून पाण्यावर 'भाकरी' करीत होते. सारे मजेत होते. हसत-खिदळत होते. एका पोराजवळ एक फूल होते. ते त्याने पाण्यात फेकले. समुद्राच्या लाटेबरोबर ते खालीवर हेलकावे खाऊ लागले. मुलांना गंमत वाटली. इतक्यात तो फूल टाक-णारा पोरगा म्हणाला, "काय रे, कोन काडनार फूल ?"

सारी पोरे चूपचाप बसली. कोण टाकणार उडी समुद्रात ? उडी टाकणे म्हणजे मरणे. पोरांना भीती वाटली.

फूल टाकणारा पोरगा जरा टणक होता. त्याने एकेका पोराला विचारले, परंतु प्रत्येक पोराने 'न्हाई' म्हणत मान हलविली. शेवटी पाळी नामावर आली. त्या पोराने नामाला विचारले,

"नामा क़ाडतोस का रे फूल ? का तूबी भित्री भागुबाई !" सात वर्षांचा नामा पटकन म्हणाला, "भागुबाई न्हाई मी. मारतो बग उडी नी काडतो फूल !"

बोलणे संपते न संपते तोच नामाने समुद्रात उडी टाकली नि धरले फूल ! त्याला पोहायला येत होते कुठे ? तो गटांगळ्या खाऊ लागला. बाकीची पण पोरे ओरडली, "नामा बुडाला, ! नामा बुडाला ! !"

रस्त्याने एक तांडेल जात होता. पोरांचा गलका ऐकून तो धावत आला. तशीच टाकली पाण्यात उडी आणि अलगद उचलून आणला नामाला कडेला.

नामाने गटांगळ्या खाल्ल्या होत्या. त्याच्या नाका-तोंडात पाणी गेले होते. तो पाणीही प्याला होता. खारट पाणी पोटात गेल्यामुळे तो ओक ओक ओकत होता. पण तेवढ्यातून नामा झाकली मूठ उघडत म्हणाला, " नाऱ्या, हे बग फूल, काडलं का न्हाई ? "

तांडेलाला कौतुक वाटले. तो म्हणाला, " शाब्बास पठ्ठे ! मोठा धाडसी आणि ईर्षेबाज आहेस तू ! नाव काढशील जगात ! "

नामाने समुद्रात घेतलेल्या उडीचा प्रकार चिमाबाईला इतर पोरांनी पळत पळत जाऊन सांगितला. तिच्या काळजाचे पाणी पाणी झाले. तिने नामाला घट्ट पोटाशी कवटाळिले आणि मनसोक्त अश्रू गाळीत म्हटले,

" तिसऱ्यांदा बचावलं प्वार, मरनाच्या दाडंतनं ! जलमल्या बरुबर सगं-सोयरं पोराला शेलकईत टाकायला निगालं हुतं, मागनं मीच चांडाळणीनं अफूची गोळी बाळाच्या टाळ्याला चिटकवण्यासाठी तोंडापातुर न्हेली हुती आणि आता तर सोताचं पोरानं पान्यात घालून घेतलं ! तिनी येळला काळ आला हुता, पन येळ आली न्हवती. आई तुकाईनंच बाळाची पाट राखन केली. आवंदा जत्रंत खना-नारळानं ओटी भरीन ग आई तुझी ! पान्यात गेल्यालं प्वार झेलून परत आनलंस ! इजा, बिजा, तिजा झाली तीन येळा ! जिवावर बेतलं, पन आई तू कसं तरी निबावून न्हेलंस ! "

शोकावेग कमी झाल्यावर तिच्या मनात विचार आला. ती स्वत:शीच पुटपुटली, " नामाला विनबिरड्याचा ठेवून भागायचं न्हाई ! कुठं तरी कामात गुंतविलाच पायजे. उनाड पोरांच्या नादानं भकाय लागलंय प्वार ! . . . . "

आणि खरंच नामाला चिमाबाईने गुंतवून टाकला कामात एका आठवड्यात ! एका ख्रिस्ताव हपिसराचा जेवणाचा डबा घेऊन जायचं काम नामा करू लागला.

साहेबाने डबा खाल्ल्यावर नामाने डबा उचलला नि निघाला. वेळ दुपारची. एक दीडची. उन रणरणत होतं. रस्ते तापलेले होते. रहदारी मंदावली होती. मोकळा रस्ता बघून ड्रायव्हर मोटारी भरधाव सोडीत होते.

नामा डबा घेऊन हपिसाच्या पायऱ्या उतरला. टीचभर नामाच्या हाती हातभर लांबीचा डबा पाहून कुणालाही सहज वाटायचे, " वा ! मियाँ मूठभर

नि दाढी हातभर ! " दाढीच्या घोळात मियाँचे पाय अडकायचे नि तो कोलमडायचा. नामा डबा सावरीत रस्त्याला लागला. त्याला रस्ता ओलांडायचा होता. त्याने इकडे तिकडे पाहिले. मुळीच वर्दळ नाही. गाडी-घोड्याची चाहूल नाही. झाले, लहानग्या मावळी मर्दाची स्वारी हातातील डबा सावरीत निर्धास्तपणे रस्ता कातरू लागली.

वळवाचा पाऊस अकस्मात येतो. मुळीदेखील कल्पना नसते पाऊस येईल म्हणून. आकाश निरभ्र असते, पण एकाएकी ढग गोळा होतात. विजेचा कडकडाट होतो आणि धो धो पाऊस कोसळू लागतो. तसाच प्रकार घडला. नामा रस्त्याच्या मध्यावर गेला असेल नसेल तोवर सामसूम असलेल्या रस्त्यावर गोंगाट ऐकू येऊ लागला. बैलगाड्यांची धावपळ सुरू झाली. त्यात डॉककडे जाणाऱ्या मालगाड्यांची गडबड. इकडून गाडी, तिकडून गाडी, चोहोकडून जोरजोराने "झ्या ! झ्या ! " नामा गडबडला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी मालगाड्या येत होत्या, अतिशय वेगाने येत होत्या. चल हट् ! असा सावध राहाण्याचा इषारा देत येत होत्या. नामाने एकदा इकडे व एकदा तिकडे पाहिले. त्याला वाटले, दोन्ही गाड्या त्याच्या अंगावर येत आहेत. त्याची पाचावर धारण बसली. तो सैरावैरा धावू लागला. हातात डबा लडलडत होताच. डब्याला बसणाऱ्या झोकामुळे नामाचा तोल गेला आणि रस्त्यावरच नामा धाडदिशी पडला.

गाडीवानाने कासरा ओढला. गाडी खडखडत थांबली. पादचारी लोकांच्या नजरा वळल्या. ते ओरडले,

" अरेरे ! गावलं ! गावलं ! गावलं प्वार गाडीखाली ! "

पण पोर चपळ होतं. पडले होते ते चटकन उठले आणि चपळाईनं पटकन पळाले बाजूला. त्याच्या जिवावर आलेले होते, पण डब्यावर निभावले. नामा निसटला, पण डबा गाडीखाली सापडला, तो साकटला.

नामा घरी आला. त्याने आईला सारे सारे सांगितले. तिला धक्काच बसला. पोर गाडीखाली गेलेच होते, ते तुकाईदेवीनं वाचविले म्हणून तिची तिने करुणा भाकली. नामाला पोटाशी धरले. ढळाढळा रडली. ती म्हणाली,

" नामा किती छळतोस रे मला ! जलमल्यापस्नं छळवाद मांडलास पोरट्या ! जलमताच वाच्या जिवावर उटलास, आणि आता सोताच्याच ! काय करू ? कसं ह्येचं रक्षान करू ! मोकळं ठेवलं पाण्यात उडी घेतंय ! कामाला लावलं गाडीघोड्याखाली गावतंय ! काय करू तरी काय मी ! "

अगतिक झालेली चिमाबाई त्या दिवशी नामाला कवटाळून धायमोकलून रडली. तिला नामाला जगवायचा होता, नामा तर सारखा मरणाच्या दाढेतच वावरत होता. एकातून बचावला की दुसरा प्रसंग तयार ! दुसऱ्यातून निभावला की तिसरा हजर !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों वि: ..................

## प्रकरण ५ वे

'घार फिरे आकाशी, लक्ष परि पिलापाशी' याप्रमाणे चिमाबाई जरी बाहेर गेली तरी तिचे लक्ष नामावर होते. त्यातल्या त्यात कामातून सवड काढून नामावर नजर टाकून ती जात असे. हो, कुठे तरी जायचे पोर आणि पाण्यात घालून घेतले तसे काही तरी अघोरी करायचे ? शिवाय मुंबईच ती. गाडी-घोड्यांची धावपळ चाललेली असायचीच. त्या खाली गावायचे एखादे वेळी !

चिमाबाई नामाला दिनभर कामावर घेऊन जाऊ शकत नव्हती. आपल्या पोराने दिनवाणा चेहरा करून दुसऱ्याच्या दारात भिकाऱ्यागत उभे राहाणे तिच्या मानी मनाला मानवणारे नव्हते. मालकाच्या पोरांनी श्रीमंतीच्या म्हणा किंवा मालकपणाच्या म्हणा तोऱ्यात नामाची आगळीक काढली तर नामा गय करायचा नाही त्यांची. इरेला पडणारे पोर ! त्यात मानी ! प्रकरण पेटायचे आणि नोकरीला मुकायची पाळी यायची ! पोराला घेऊन जावे तर मानहानी आणि कामाची नुकसानी, न घेऊन जावे तर पोराच्या जिवाची व्हायची हानी ! काय करावे बिचारीने ! कात्रीत जीव गावला होता त्या माउलीचा ! 'धरले तर चावते व सोडले तर पळते' अशी स्थिती झाली होती तिची !

तरीही ती नामाला तसाच खेळायला सोडून कामधंद्याला जात होती. पुढे बघून हाताने काम करीत होती आणि मनाने नामाचा विचार करीत होती.

नामा पोरांबरोबर खेळत होता, वावरत होता. गोटचा खेळण्यात तो कोणास हार जात नसे. डाव्या हाताचे मधले बोट ताणून नामाने सोडलेली गोटी (टोंब्या) दुसरी गोटी मारल्याशिवाय राहात नसे. नामाचा नेम औरच ! नेम कधी चुकायचाच नाही. दुसरी गोटी मारणे यासाठी भारी अवधान ठेवावे लागते. अर्थात विशेष बुद्धीशिवाय अवधानाची प्राप्ती होणे शक्य नाही. नामा बुद्धीचाही तल्लख होता.

पण या तल्लख बुद्धीचा पद्धतशीरपणे विकास होण्यासाठी शाळेची गरज होती. तथापि परिस्थिती अनुकूल नव्हती. त्याला शिक्षणाचा लाभ मिळत नव्हता.

जोरदार वाहते पाणी अडचणींनी अडून राहत नाही. ते वळणे, वळसे घेऊन आपला मार्ग काढते. तसेच बुद्धीचेही आहे. शाळा नसली म्हणून नामाच्या बुद्धीची प्रगती अडली नाही. चाळीतील त्याचे सवंगडी कविता म्हणत, त्या नामा ऐके व तोंडपाठ म्हणून दाखवी.

मुले अभ्यासाला बसली की नामा त्यांच्याजवळ जाऊन बसे. ते वाचतील ते लक्षपूर्वक ऐके व वाचताना झालेली चूक ताबडतोब त्यांच्या नजरेस आणून देई !

नामाचा खास सवंगडी हरी. दोघांची गट्टी जमलेली. हरी दुसरीत शिकत होता. दिवेलागण झाली की हरीची आई हरीला अभ्यासाला बळेबळेच बसवायची. हरी अभ्यास करीत होता. धडा वाचीत होता. नामा जवळ बसला होता. पोरगे वाचते की नाही, हे समजण्यासाठी त्याच्या आईने त्याला मोठ्याने वाचायला सांगितले होते. हरी मोठ्याने वाचीत होता.

" सूर्व्याची सवारी सात घोडयांच्या रतातून आबाळातनं जाते. "

" हऱ्या, हऱ्या, चुकलं की रं तुजं ! " नामाने मध्येच तोंड घातले.

" काय चुकलं माजं ! बरुबर हाय ! दाव बगू काय चुकलं ते ! " हरी म्हणाला

" आरं बुकात ' सूर्व्याची सवारी ' लिवल्यालं न्हाई ! " नामा बोलला.

" तर काय लिवलंय रं नामा ? "

" 'सूर्याची स्वारी' आसं लिवलंय ! " नामाने सांगितले.

हरीच्या आईला पोरगे वाचायचे सोडून नाम्याशी बोलत बसले आहे, असे वाटले. तिला राग आला. ती फणकाऱ्याने बाहेर आली आणि तावातावाने म्हणाली,

" नाम्या, तू कशाला येतोस रं हिकडं मरायला ? पोराला अव्यास करू देत न्हाईस माझ्या, तू साळंला जात न्हाईस ते न्हाईस आनि दुसरी जात्यात त्यास्नीबी अब्यास करू देत न्हाईस ! इदर कल्यानी प्वार हाईस बग तू ! याद राक परत हिकडं आलास तर ! अडाणी गाडाव कुटला ! जा ! कर त्वांड काळं ! "

एवढे बोलून ती माऊली थांबली नाही तर तिने नामाचा दंडाला धरले व दरादरा ओढत बाहेर घालविले.

नामाचा जीव कासावीस झाला. तो मुसमुसत घराकडे आला. रडरड रडला. त्याची रड ऐकायला घरी होते कोण ? इतक्यात चिमाबाई कामाहून परत आली. नामाला रडताना पाहून ती मनात चरकली व घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली,

" नाम्या, माज्या लेकरा काय झालं रं ? कुनी मारलं-विरलं का काय ? "

" न्हाई ! "

" न्हाई ? मग डोळं सुजस्तोवर रडलास का रे पाडसा ? " चिमाबाईने आपल्या पाडसाला पोटाशी धरीत त्याची आसवे पुशीत व स्वत: आसवे गाळीत व्याकुळतेने विचारले.

" मला घरातनं हाकलून लावलं ! " नामाने सांगितले व मोठ्याने रडायला सुरुवात केली.

" रडू नगस ! नामा रडू नगस ! सांग कुनी हाकलून लावलं तुला ? "

" हऱ्याच्या आईनं ! "

" का रं ? खोडीबिडी काडलीस काय त्येची ? "

" न्हाई ! "

" मग कारं काडलं तुला वडून भाईर ? "

" हऱ्या वाचत हुता. मी ऐकत हुतो. वाचताना त्यो चुकला ! म्या त्येला म्हटलं, " सुर्व्या न्हवं सूर्या " आसं लिवलंय ! तवा त्येची आई खवाळली नि भाईर वडून काडलं मला ! "

" तुला कसं कळलं त्यो चुकलाय त्ये ! "

" भटजीचा दामू हाय का न्हाई ? "

" हाय की ! मग फुडं ? "

" त्यो बी ह्न्यागत दोनवीत हाय ! "

" आसंल ! मग त्येचं काय ? "

" त्यो ह्योच धडा वाचीत हुता. मी ऐकला हुता. त्यो म्हणत हुता " सूर्याची स्वारी " तसा मी ह्न्याला दुरुस्त केला. काय चुकलं माजं ! "

" काय बी न्हाई ! "

" मग ह्न्याच्या आईनं हाकलून का दिलं मला ! आनि वर म्हनाली, " आडाणी गाडाव ! " नामाला हुंदका आवरेना. तो पुढे म्हणाला, " आये गे, मी शाळंला जानार ! उद्यापस्नं ! "

" काय ? साळंला जानार ? "

" व्हय ! जानारच ! मला ऐकून ऐकूनच सगळं पाट झालंय ! मी पयला नंवर पटकावतो का न्हाई ते तरी बग ! मी आडाणी गाडाव व्हानार न्हाई ! "

चिमाबाई गप्प बसली.शाळेला मुलाला घालावे,असे तिला वाटत का नव्हते ? परंतु वाटून काय उपयोग ! गरिबांच्या वाटण्याला काय किंमत असते जगात ? चिमाबाईला शाळेचा खर्च झेपणारा नव्हता. महिन्याला चार आणे फी, पण ती कोठून द्यायची ! ती चिंताक्रांत होऊन गप्प बसली. परंतु नामाने लकडा लावला.

" आय, मी शाळंला जानार ! आडानी गाडाव व्हानार न्हाई ! "

" बगू उद्याचं उद्या हरी ! आता कोरभर भाकरी घे खाऊन अगुदर ! भुक्यावला असशील ? " चिमाबाई म्हणाली.

" शाळंला घालतो असं कबूल करस्तोवर मी न्हाईच भाकरी खानार ! " चिमाबाईला गहिंवरून आले. ती रड रड रडली. शेवटी म्हणाली,

" नामा, उद्या घालतो साळंत तुला ! दंड लावून लुगडी नेशीन, पर पोराला साळंला घालीन ! आमाला दैवानं लाचारपन आनलं म्हनूनशान त्या ह्न्याच्या आईनं गंगीनं माज्या नामाला भायेर वडून काढलं ! आडानी गाडाव म्हनाली

माज्या पोराला ! हुंदे काय बी माजं आणि दोन घरची भांडी घासीन, पर पोराला साळंत घालीन ! नामा उद्यापस्नं साळंला जा ! "

दुसऱ्या दिवशी चिमाबाई जरा लवकरच कामाला गेली. जाताना नामाला तिने बजावले, " नामा जाऊ नगंस कुटं, आज साळंला घालायचाय तुला. मी जल्दी येते वापस. " नामा हुरळला होता. भेटेल त्या पोराला तो सांगत होता, " मी आजपास्नं शाळंला येणार ! "

दहाच्या सुमारास चिमाबाई परत आली. नामाला आंघोळ घातली आणि म्हणाली, " नामा घाल सदरा, आनि लाव लंगुटी नि चल बिगी बिगी साळंला ! वाडूळ लावू नगंस. कामाला परत जायाचं हाय मला !

" झालं बग आई माजं ! पन आय गे, शाळंला जायचं नी पाटी कुटं हाय ? " नाम्याने शंका विचारली.

" आरं तेवड्यासाठीच येरवाळी कामावर गेले नी आदिली घेऊन आले. लोक मानत्यात म्हनून म्हईना भरायचा आत दिलं त्येनी ! चल आटप लौकर.

अंगात सदरा व कमरेला लंगोटी लावलेला उघडा बोडका नामा आईबरोबर ऐटीने बाहेर पडला. त्याचा चेहरा आनंदाने फुलला होता. जाता जाता त्याला रस्त्यात हरी दिसला. नामाने जोराने हाक मारली, " हऱ्या ! "

" काय रं ! कुटं निगालास ? " हरीने विचारले.

" शाळंला ! " नामा बोलला.

" चल की बिगी बिगी पोरा ! " चिमाबाईने नामाला दटावले, आईबरोबर नामा धांदलीने पुढे सरकला.

" आई, ही बग पाटी ! " एका दुकानाच्या बाहेरच्या बाजूस टांगलेल्या पाट्यांकडे हात करीत नामा म्हणाला.

दोघेही दुकानात शिरले. ही बघ, ती बघ, करीत दहा-बारा पाट्या चिमाबाईने बारकाईने पाहिल्या व शेवटी एक निवडली. चांगली लांबलचक होती ती पाटी. नामालाही ती पाटी आवडली. चिमाबाईने दुकानदाराला विचारले,

" अवो दुकानदार, ह्या पाटीचं किती द्याचं ? "

" तीन आणे ! "

" तीन आणं लई सांगताय बघा तुमी ! "

" बाई, ही पाटी मोठी आहे. तिची किंमत तीन आणेच आहे. ह्या दुसऱ्या पाट्या आहेत कमी किंमतीच्या. . .दोन आण्याच्या ! "

हो ना करता करता अडीच आण्याला सौदा पटला. चिमाबाईने कनवटीची अधेली काढली. दुकानदारास दिली. साडेपाच आणे परत घेतले. नामा पाटी खालीवर पाहात आईबरोबर शाळेकडे निघाला. तो मोठ्या खुशीत होता. शाळेला जायची त्याची इच्छा त्याची आई पुरी करीत होती. तिने पाटी घेऊन दिली होती. नवी कोरी, लांबलचक पाटी घेऊन दिली होती. या पाटीवर तो आता अक्षरे लिहिणार होता.

शाळेत आपण जाणार म्हणून नामाचा आनंद पोटात मावेनासा झाला होता. तो सारखा बोलत होता. आपल्या मनीचे बेत आईला सांगत होता. त्याची आई 'हूं ! हूं ! ' म्हणत हुंकार देत होती.

मायलेकाची जोडी शाळेजवळ आली. इस्रायली शाळा होती ती. इमारत भव्य. पटांगण भव्य. झकपक पोषाख केलेली मुले भरभर पायऱ्या चढून शाळेत शिरत होती. दबकत दबकत चिमाबाई शाळेत शिरली. सोबत नामा होताच. नामा मुलांकडे पाहात होता व आनंदाने हुरळून जात होता. चिमाबाईच्या जिवाला मात्र हुरहुर लागली होती. ती हेडमास्तरांना भेटली. नामाला शाळेत घेण्याबद्दल तिने आर्जवे केली. नाही होय म्हणता म्हणता शेवटी एकदाचे हेड-मास्तर नामाचे नाव दाखल करायला तयार झाले. त्यांनी सांगितले,

" बरं तर बसवा मुलाला बिगरीत ! "

चिमाबाई नामाला घेऊन वर्गाकडे निघाली. नामाकडे हेडमास्तरांचे लक्ष गेले. त्यांनी त्याला न्याहाळले आणि ते काहीशा मोठ्या आवाजात म्हणाले,

" अहो बाई, इकडे या ! "

चिमाबाईच्या उरात धडधडू लागलं ! विघ्न आल्याशिवाय कोणतेच कार्य तडीला जात नाही, असा तिचा अनुभव होता. ती माघार फिरली. हेडमास्तर तिला म्हणाले,

" हे बघा बाई, आमच्या शाळेत नीट कपडे केलेली मुले घेतात. लंगोटी लावलेली, उघडीबोडकी मुले नाही घेत. आज मुलाला परत न्या. उद्या त्याला व्यवस्थित कपडे करून पाठवा. जा आता! "

चिमाबाईने खाली मान घातली. नामाचा विरस झाला. दोघांच्या डोळ्यातून एकदम सरसर पाणी गळू लागले.

हिरमुसल्या नामाला घेऊन चिमाबाई निघाली. ती थेट एका कापड दुकानात गेली. तिने दुकानदारास म्हटले,

" माज्या नामासाठी याक धोतराचं पान काडा ! वाईच हालकंच काडा ! पोरग्याला लंगुटी लावतंय म्हणून साळंत घेत न्हाईत ! "

दुकानदार भला माणूस होता. त्याने घडलेली हकिकत विचारली. चिमाबाईने सांगितली. त्याला कळवळा आला असावा.त्याने एक धोतराचे पान दिले व म्हटले,

" बाई, तुमच्याजवळ किती पैसे आहेत ? "

" साडेपाच आणे. "

" द्या तेवढे नि न्या हे पान ! "

धोतराचा प्रश्न मिटला, पण टोपीचा उरलाच की ! टोपी घ्यायला जवळ काय होते ? चिमाबाई नामाला घेऊन घरी आली. नामाला तिथेच सोडला. ती निघून गेली कामाला. रात्री परत आल्यावर चिमाबाईने एक जुनी पुराणी टोपी धुंडाळून काढली. मगच ती झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी कमरेला धोतर, अंगात सदरा व डोक्यावर टोपी घातलेला नामा मोठ्या ऐटीत शाळेला निघाला. नऊ वर्षांचा नामा धोतर नेसला होता. शाळेत गेल्यावर त्याला बिगरीत बसविण्यात आले व हजरीपटावर नाव चढविले, " नामदेव सदाशिव मोहोळ. "

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थक्रमांक
36602 दि:
92772 नों कि

## प्रकरण ६ वे

जन्मल्यापासून रीतसर नाव न ठेवलेल्या व पडनावाने ओळखल्या जाणाऱ्या पोराचे रीतसर नाव शाळेत नोंदले गेले, " नामदेव सदाशिव मोहोळ. " नामदेवानेही रीतसर अभ्यासाला सुरुवात केली. त्याला खूप शिकण्याची हौस होती. तो जात्याच चलाख होता. त्यात ईर्षेबाज. अर्थातच तो ईर्षेने अभ्यास करू लागला.

त्या शाळेत " श्री गणेशायनम: " पासून शिकवीत नसत. सुरुवात करीत अ आ पासून.

अवघ्या चार दिवसांत नामदेवाने अ आ पासून क्ष ज्ञ पर्यंत सर्व मुळाक्षरे आत्मसात केली. शिक्षक या प्रगतीने चकित झाले.

शिक्षकाने मग क का कि की ची बाराखडी शिकवावयास सुरुवात केली. बाराखडी कशी तयार करावयाची रीत सांगितली. तल्लख डोक्याच्या नामदेवाने रीत पकडली आणि शिक्षकाला त्याच दिवशी सर्व अक्षरांच्या बाराखड्या तयार करून दाखविल्या. शिक्षकाची खात्री झाली की हे नवे पोरगे विलक्षण आहे. ज्या कामात हात घालील ते फत्ते करून सोडील.

. . . ३

जी गोष्ट बाराखडयांची तीच पाढयांची. पाढा तयार करण्याची रीत समजल्याबरोबर नामदेवाने तीसापर्यंत पाढे तयार केले. तोंडपाठ केले. बिगरीतील इतर मुलांच्या मानाने एक महिन्यात नामदेवाची तयारी चांगलीच झाली. तो बिगरीत चमकू लागला.

नामदेवाचे सवंगडी होते तिसरी–चौथीत. त्यांच्यासारखे त्याला फडाफडा वाचायचे होते. झराझरा गणिते करायची होती.

नामदेवाने दिसेल ते व मिळेल ते पुस्तक वाचण्याचा तडाखा लावला. हा हा म्हणता तो अस्खलीतपणे वाचू लागला. बिगरीची अंकलिपी तर पाठच झाली होती. पहिली, दुसरी, तिसरी व चौथी या इयत्तांची पुस्तके तो धडाधडा वाचू लागला. तो फार काळजीपूर्वक वाचत असे. त्यामुळे त्याला जोडाक्षरांचीही मख्खी कळली. जोडाक्षरे वाचणे ही सोपी गोष्ट नाही. बरीच अवघड गोष्ट आहे ती. मी मी म्हणणारी माणसे जोडाक्षरे वाचताना गांगरतात, तिथे पोरासोरांची काय कथा ! तिसरी चौथीतील मुलांना जोडाक्षरे वाचणे हे एक दिव्यच वाटते. जोडाक्षरे लावून वाचावी लागतात. कामगारांच्या मुलांची तर जोडाक्षरे वाचताना हमखास तीरपीड उडे. नामदेवाचे चाळसोबती जोडाक्षरे वाचताना गांगरत. परंतु नामदेव मात्र सफाईदारपणे ती जोडाक्षरे वाचून दाखवी. बिगरीतील नामदेवाकडे तिसरी चौथीतील मुले जोडाक्षर कसे उच्चारावयाचे हे विचारायला येत. सात आठ महिन्यांपूर्वी जो नामा "आडाणी गाडाव" ठरला होता, तोच नामा आता चलाख, हुशार, शहाणा मुलगा ठरत होता. दैवाची करणी दुसरे काय ! बिगरीत असतानाच बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार यात चांगलाच पारंगत झाला. मुलगा बिगरीत, अभ्यास तिसरी–चौथीचा ! शिक्षकांस आनंद झाला. हा मुलगा आपणास श्रेय देणार यात त्यांना शंका वाटत नव्हती.

नामदेव हुशार विद्यार्थी म्हणून शाळेत चमकत होता. त्याचा त्याला अभिमान वाटत होता. शिक्षकालाही अभिमान वाटत होता. मुलाचे कौतुक होत असलेले पाहून चिमाबाईलाही समाधान वाटत होते.

मार्च–एप्रिलचा सुमार. मुठे सोडून चार–पाच वर्षे झालेली. त्यातल्या त्यात थोडासा जम बसलेला. म्हादा व सादा दोघेही नोकरीला लागलेले. साहजिकच चिमाबाईला गावची आठवण येऊ लागली. देवाने पोरांना रांगेला लावले व आपली विस्कटलेली घडी बसविली अशी तिची भावना. देवाला जावे, त्याला नारळाची माळ वाहावी. पोरांना त्याच्या पायांवर घालावे, असा विचार तिच्या मनात आला. तोंडावर देवाची जत्रा होती. लागलीच ती म्हादा, सादा व नामा या लेकरांना घेऊन निघाली. मुठ्याला पोहोचली. सगेसोयरे भोवती जमले. त्यांनी तिच्या धाडसाचे व कर्तेपणाचे कौतुक केले. दिवसामागून दिवस जाऊ लागले. आज निघू, उद्या निघू म्हणत म्हणत महिना-दीड महिना गेला. मुठ्यातून चिमाबाईचा पायच बाहेर निघेना ! शेवटी मनाचा हिय्या केला. आप्तेष्टांचा निरोप घेतला व चिमाबाईने मुठे सोडले व मुंबई गाठली.

दररोजच्या काबाडकष्टाच्या कटकटीतून महिना–दीड महिना तिची सुटका झाली होती. तिच्या मनाला हुषारी वाटत होती. मुंबईत आल्याबरोबर तिच्यापुढे नवी चिंता वाढून ठेवली होती.

नामदेव दुसऱ्या दिवशी शाळेत गेला. त्याला ओळखीचे चेहरे वर्गात दिसेनात. तो गोंधळला. इकडे तिकडे बघू लागला. त्याला त्याचे मास्तर दिसले. त्यांनी हाक मारली, " अरे नामदेव, होतास कुठे तू ? "

" गावाला गेलो हुतो आईबरोबर ! "

" अरे वेड्या, पण घात झाला की तुझा ! परीक्षा झाली ! "

" परीक्षा झाली ? "

" हो, परीक्षा झाली, बाकीची मुलं पहिलीत गेली ! "

नामाला रडू कोसळले. तो हतभागी ठरला. इतका अभ्यास करून तो वरच्या वर्गात गेला नव्हता. कारण परीक्षेस बसला नव्हता.

नामाची व्याकुळ अवस्था पाहून मास्तरांनाही कळवळा आला. ते म्हणाले, " नामा, चल हेडमास्तरांकडे जाऊ ! "

दोघेही हेडमास्तरांकडे गेले. मास्तरनी नामा किती हुषार आहे. सगळ्या मुलांत त्याचा अभ्यास चांगला आहे. शाळेचे नाव काढणारा विद्यार्थी आहे वगैरे

नामाबद्दल हेडमास्तरांना सांगितले. हेडमास्तरही त्याला हुषार विद्यार्थी म्हणून ओळखत होते. त्यांनी नामाला तात्पुरते वरच्या वर्गात बसविले. नामा पहिलीत बसला. परंतु नाव मात्र हजरीपटावर दाखल केले नव्हते. नामा पहिलीत, पण नाव बिगरीत. दिपोटीसाहेब तपासणीस आले की ते नामाची खास परीक्षा घेतील व त्यांनी मान्य केले तर नामाला पहिलीत चढविता येईल.

चिमाबाईला नामाने रात्री घडलेले सारे सांगितले. तेव्हा तिला अतिशय वाईट वाटले. परीक्षा कधी आहे, हे तिला माहीत नव्हते. अडाणी माणसांचे असेच होते. अज्ञानामुळे जीवनात खूप घोटाळे होतात. चिमाबाई देवाला गेली आणि देव पावला म्हणायचा की रुसला म्हणायचा ?

शाळेत नोटीस फिरली. दिपोटीसाहेब शनिवारी तपासणीस येणार म्हणून. नामदेवाला आनंद वाटला. हपिसराला आपली हुषारी दाखवायची संधी चालून आली होती. मास्तरांनी मुलांना धडे वाचून ठेवायला सांगितले. नामदेवाचे सारे तोंडपाठच होते. तो शनिवारची वाट पाहत होता.

शनिवार उजाडला. नामदेव लवकर उठला. शाळेला गेला. शाळा सकाळची होती. घण घण घंटा झाली. पांगलेली मुले आपापल्या वर्गात घुसली व नेमलेल्या जागांवर जाऊन बसली. मास्तरही आज वेळेवर आले होते. जिकडे तिकडे कसे आज शिस्तशीर चालले होते. कुठे गोंगाट नाही, गडबड नाही, जो तो आपल्या कामात गर्क. मास्तरही वर्गावर हजर.

नामदेवाचे मास्तर वर्गावर आले. त्यांनी दिपोटी आल्याची वर्दी मुलांना दिली व उभे कसे राहावयाचे, उत्तरे कशी द्यावयाची, एकदम सर्वांनी उत्तरे द्यायची नाहीत. विचारतील त्यानेच उत्तर द्यावयाचे, अशा सूचना मुलांना दिल्या. मास्तरने वर्गावर नजर फिरविली व विचारले,

" नामदेव मोहोळ कुठे दिसत नाही तो ! "

" तो काय मागं बसलाय ! " पोरांनी एकदम सांगितले.

नामदेव पुढे आला. त्याच्याकडे मास्तराने निरखून पाहिले. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. ते काहीसे रागाने म्हणाले,

" काय रे हे नामदेव ? "

" काय ? " नामदेवाने गोंधळून विचारले.

" काय तुझे हे कपडे ? धोतर किती घाण झालंय, सदरा मेणचटलाय आणि टोपी कळकटलीय ! छी: ! छी: ! कधी धुतोस की नाही कपडे ? "

" धुतो की शनिवारी ! " दर शनिवारी कपडे धुवायचे व तेच आठवडाभर घालायचे !

" अरे वेडचा, आज इन्स्पेक्शन, असले घाणेरडे कपडे घालून आलास ? चांगले घालून यायला काय झालं होतं ? "

" दुसरे कपडे न्हाईतच. एकच सदरा, एकच धोतर व एकच टोपी ! मग कुटली घालू दुसरी ! "

" दुसरे कपडे नाहीत ? "

" न्हाईत ! आईच्यान मास्तर दुसरे कपडे न्हाईत ! "

मास्तरांना वाईट वाटले. ते विचारमग्न झाले. काय करावे हे त्यांना सुचेना. नामदेवामुळे त्यांना शाबासकी मिळणार होती, पण. . . .पण जर का दिपोटीने स्वच्छतेकडे लक्ष दिले नाही, असे म्हटले तर. . . .तर सारेच मुसळ केरात. शाबासकी मिळायची राहायचे बाजूला नि मुलांच्या स्वच्छतेकडे लक्ष नाही म्हणून उलट खरडपट्टी निघायची !

जो तो आपल्या मरणाला भितो. स्वत:वर बेतले की इतरांची पर्वा नाही करीत. मास्तरही याला अपवाद नव्हते.

भरल्या कंठाने मास्तर म्हणाले,

" नामदेव तू घरी जा. दिपोटी माझ्यावर रागावतील, तुझे हे घाणेरडे कपडे पाहून. जरादेखील थांबू नकोस इथं ! येतील इतक्यात ! त्यांच्या नजरेला पडलास तर घात होईल माझा ! जा ! जा ! "

नामदेवाच्या आकांक्षेवर विरजण पडले. त्याला रडू कोसळले. तो ओक्साबोक्शी रडू लागला.

त्याची समजूत काढायला मास्तरांना वेळ कुठे होता ? त्यांनी त्याच्या दंडाला धरले व ओढीत ओढीत शाळेच्या फाटकाजवळ आणून सोडले व परत गेले. दुसऱ्या पोराने नामदेवाची पाटी आणून दिली. फाटकात नामदेव मटकन बसला. मनसोक्त रडला.

ऱ्याच वेळाने उठून घरी गेला. वोथरात तोंड लपवून आसवे ढाळू लागला.

चिमाबाई आली. नामदेवाला अशा अवस्थेत पाहून तिच्या उरात धस्स झाले. घाईघाईने नामदेवाला पोटाशी कवटाळले. ती म्हणाली,

" नामा, काय हुतंय रं तुला ? आंगबिग तापलंय काय ? "

" काईबी हुत न्हाई ! " नामदेवाने हुंदका देत सांगितले.

" मग हुंदका कशापायी माज्या वासरा ? "

" मला शाळेतनं घालविलं ! "

" का रं ? "

नामदेवाने घडलेली सारी हकिकत आईला सांगितली. मायलेकरांनी ढळाढळा आसवे गाळली ! शेवटी चिमाबाई म्हणाली,

" नामा, तुझ्या ललाटी सटवीनं इद्या लिवल्याली न्हाई ! नशीब तुजं ! "
बिगरी पास व्हायच्या आतच नामदेवाची शाळा सुटली. जेमतेम आठ-दहा महिनेच शाळेत गेला नामदेव.

तल्लख बुद्धीच्या, चलाख नामदेवाला गरिबीमुळे शाळेला रामराम ठोकावा लागला.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम 36602 दि:
क्रमांक 2272 नों दि. 10/11/...

## प्रकरण ७ वे

शिक्षणाला वंचित झालेला नामदेव जीवनाच्या वैराण वाळवंटाचा प्रवासी बनला. दहा वर्षांच्या नामदेवाचे काय करावे, हा पेच चिमाबाईपुढे होता. त्या माऊलीचे आयुष्यच मुळी खडतर घटनांनी भरलेले होते. क्षणभर विसावा घ्यायला तिला उसंत मिळत नसे. शाळेत अडकवून नामदेवास रांगेला लावावे, यासाठी तिने केलेला प्रयत्न नियतीने हाणून पाडला. नामदेवाला मोकळा फिरू देण्यास तिचे मन धजत नव्हते. दुसऱ्याच्या घरी जाण्यास नामदेव तयार नव्हता. हरीच्या आईने हाकलून दिल्यामुळे त्याच्या मानी मनावर परिणाम झाला होता.

शेवटी नामदेवाला कुठे तरी कामाला चिकटवून टाकण्याचा बेत तिने केला आणि थोड्या फार खटपटीने तो यशस्वीही झाला.

नामदेवाला नोकरी लागली. स्टँडर्ड ऑईल कंपनीत ऑफिसबॉय म्हणून. दहा वर्षांचा नामदेव नोकरीवर रूजू झाला. स्टँडर्ड ऑईल कंपनी ही अमेरिकन कंपनी. तिचा मॅनेजरही अमेरिकन होता. त्याचे नाव होते मॅक्डोनल्ड. तो मोठा उमदा व उदार अंतःकरणाचा होता. साहेबाच्या खोलीच्या तोंडाशी एक स्टुलावर धोतर, सदरा व टोपी घातलेल्या नामदेवाची बुटकी मूर्ती बसलेली असे.

स्टँडर्ड ऑईल कंपनीची कचेरी फोर्ट विभागात होती. नामदेव राहात होता माजगावातील म्हातारपाखडी विभागात. अंतर फार. चालत जाणे शक्य नव्हते. तेव्हा माजगाव ते बोरीबंदर रेल्वेपास काढला. पगार मिळे सात रुपये, त्यातून पासाला बारा आणे जात. उरायचे सव्वा सहा रुपये. पण हे सव्वा सहा रुपये कष्टाच्या कमाईचे होते. गरिबांना एवढयाशा क्षुल्लक रकमेचादेखील भारी मोठा आधार वाटत असतो.

नामदेव सकाळी लौकर निघायचा. दहाच्या आत कचेरीत पोहोचले पाहिजे, कंपनीची शिस्त कडक. लोकांनी वेळच्या वेळी आलेच पाहिजे. बेशिस्त वागणाऱ्यांना ते थारा देत नसत. नशिबाने मिळालेली नोकरी काळजीपूर्वक टिकविली पाहिजे. यासाठी नामदेव आठ–साडेआठलाच घरातून बाहेर पडे व रात्री सात–साडेसातला परत फिरे.

मुलांनी चार चार तासांनी जेवले पाहिजे. आरोग्याच्या दृष्टीने योग्य. हे सारे खरे, पण हा नियम गरिबांना लागू कसा पडणार ? गरिबांची पोरे घरी कशी राहू शकणार ? कामधाम करण्यासाठी त्यांना बाहेर गेलेच पाहिजे. चार चार तासांनी त्यांना कोण खायला घालणार ? आणि कुठून घालणार ? छे:! गरिबांच्या पोरांनी पोट मारूनच जगले पाहिजे. मिळेल त्या मीठ-भाकरीवर वाढले पाहिजे.

नामदेव कोरडया भाकरी घेऊन बाहेर पडे. दुपारी कचेरीतील सारी मंडळी खाण्यासाठी गेली की हा पिटुकला पोर जवळच्या हॉटेलात जाई व एक पैशाची पातळ उसळ घेई व त्या उसळीबरोबर तो भाकरीचे तुकडे गिळून टाकी. उसळीचा महिन्याला सात-आठ आणे खर्च होई.

नामदेवाची शाळा सुटली तथापि त्याचे वाचन सुटले नाही. त्याला शिकायचे होते, पण त्याला शिकू दिले जात नव्हते ! गरिबीमुळे व शिक्षणाची गोडी आहे की नाही, शिक्षणात गती समाधानकारक आहे की नाही हे पाहण्यापेक्षा मुलाचे कपडे कसे आहेत, ते पाहून दिपोटी काय म्हणेल, अशा बाह्यात्कारी गोष्टींचे स्तोम माजविण्याच्या वृत्तीमुळे नामदेवाच्या शिक्षणाचा त्याच्या इच्छेच्या विरुद्ध बळी घेतला. ज्या गोष्टी दुसऱ्यावर अवलंबून असतात, त्या शाळेसारख्या

बाबतीत नामदेवाचा जीव जरी तडफडत असला तरी मान तुकविण्याखेरीज काही करता येत नव्हते. नामदेव परिस्थितीचा गुलाम असला तरी मनचा राजा होता. वाचनापासून त्यास कोणी वंचित करू शकले नाही. त्याला वाचनाची भारी हौस. जेमतेम दहा–अकरा महिने बिगरीत काढलेल्या नामदेवाने चौथ्या इयत्तेतील मुलाइतकी लेखन–वाचनात प्रगती केली होती. आंतरिक ओढीमुळे झालेली प्रगती ही. माणसाला कोणत्याही गोष्टीची आच असली की ती गोष्ट जलद व चांगली होते. नामदेवास शिक्षणाची आच होती. वाचनाची आच लागली होती. शाळेची कवाडे नामदेवास कायमची बंद झाली म्हणून काही वाचनाची आच तुटली नाही. कंपनीचा गणवेश घालून स्टुलावर बसलेला नामदेव सारखा काही ना काही वाचत बसलेला असे. शालेय पुस्तके सुटली नि त्याच्या हातात भागवत, रामायण, महाभारतासारखी पुस्तके आली. असली पुस्तके नामदेव मन लावून वाचीत असे. वाचनात तो भान विसरून जात असे. त्याची ही तन्मयता पाहून तेथील कारकून मंडळींनाही कौतुक वाटले. तेही नामदेवास छोटी छोटी पुस्तके आणून देत.

नामदेव त्यांच्याशी आदबीने वागे. कारकूनही त्याच्याकडे 'ऑफिसबॉय' या दृष्टीने पाहात नसत. गरिबीमुळे अकाली शिक्षणास पारखा झालेला, कोवळ्या वयात पट्टेवाला बनलेला, हुषार पण कमनशिबी मुलगा अशा सहृदयतेने नामदेवाकडे ते पाहात. आपापल्यापरी या चलाख व हुषार मुलाला मदत करीत. कोणी पुस्तके वाचायला आणून देत तर कोणी त्याची हौस म्हणून ए, बी, सी, डी शिकवीत असत.

'बिगरी'ची परीक्षा देण्याचे देखील ज्याला भाग्य लाभले नाही तो नामदेव कारकून मंडळीकडून ए, बी, सी, डी चे धडे गिरवू लागला. इंग्रजी मुळाक्षरे त्याने हा हा म्हणता आत्मसात केली. तेव्हा कारकून मंडळीनाही अचंबा वाटला त्यांनी धडे शिकवायला सुरुवात केली. त्यातही घोडदौडीने प्रगती झाली. मराठीची कोणतीही परीक्षा न देता इंग्रजीचे अध्ययन नामदेव करू लागला. नामदेवाला खूप खूप शिकायचे होते.

मराठी शिकायचे होते. इंग्रजी शिकायचे होते आणि हिंदीही शिकायचे होते. हौस दांडगी होती. कष्ट करायची तयारी होती, पण स्थिती अनुकूल नव्हती.

दैव आडवे येत होते. ज्याला एखादी गोष्ट आत्मसात करण्याची आंतरिक ओढ लागलेली असते, तो असल्या संकटांनी भिऊन जात नाही. त्याची इच्छा मारली जात नाही. संकटातून मार्ग काढून तो वाटचाल करीत असतो. नामदेवाची शाळा सुटली. ऑफिसबॉयची नोकरी पत्करावी लागली म्हणून काही शिक्षणाची ओढ कमी झाली नाही.

त्याने रात्री शाळेची वाट धरली. दिवसभर नोकरी. नोकरी संपली की तालमीत मेहनत, कुस्ती आणि रात्रीची शाळा असा क्रम चालविला. त्याने म्हातारपाखडी तालमीतच पथारी पसरली.

ऑफिसमध्ये मिळेल ते पुस्तक वाचायचा सपाटा चालविला. नानातऱ्हेची पुस्तके नामदेवाने वाचली. तथापि ऐतिहासिक व पौराणिक पुस्तके त्याला विशेष आवडत. वाचनाच्या छंदामुळे नामदेवाची भाषा चांगलीच सुधारली. विचारांची कक्षा फाकली. पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. रात्रशाळेमुळे लेखन सुधारले.

ही झाली मराठीची कथा. पण इंग्रजीचे काय ? कारकुनांकडून नामदेव लिपी शिकला. धडे समजून घेऊ लागला. थोडे फार इंग्रजी कळू लागले. ऑफिस अमेरिकन कंपनीचे. कंपनीचा कारभार इंग्रजीत चाले. येणारे–जाणारे इंग्रजीत बोलत. नामदेव त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकी. ते काय बोलतात हे समजून घेण्याचा प्रयत्न करी. एखादा अनोळखी शब्द कानावर पडला की त्याचा उच्चार टिपून ठेवी व कारकुनांना त्याचा अर्थ विचारी. अशा रीतीने इंग्रजीचे अध्ययन चालले. पुढे पुढे नामदेव इंग्रजीत बोलण्याचा धाडसाने प्रयत्न करू लागला. सुरुवातीला चुका खूप होत. लोकही हसत, परंतु त्याची खंत नामदेवाने बाळगली नाही. त्याचे दिल खच्ची झाले नाही. तो नाउमेद झाला नाही. उलट झालेली चूक तो दुरुस्त करू लागला. त्याचा इंग्रजी बोलण्याचा सराव वाढत चालला.

स्टँडर्ड ऑईल कंपनीत कामासाठी बरेच गुजराती लोक येत. मोठमोठे शेठ लोक येत. त्यांना इंग्रजी बेताबाताचे येई. ते कंपनीत हिंदी बोलत. मॅनेजर मॅकडोनल्डही मोडक्या तोडक्या हिंदीत त्यांच्याशी बोले. इंग्रजी खालोखाल हिंदी भाषेचा वापर कंपनीत होत असे. नामदेवाने या संधीचा फायदा घेतला. तो या लोकांचे हिंदी ऐकून हिंदी शिकला. हिंदी बोलू लागला. व्यवहारात जेवढी चलती हिंदी लागते, तेवढी हिंदी भाषा नामदेवास येऊ लागली.

नामदेवाच्या इंग्रजी व हिंदी बोलण्याच्या धाडसाचे कौतुकच होई. एवढेसे पोर, त्यात शाळेला मुकलेले. म्हणजे अडाणीच की ! ते परकी इंग्रजी व परप्रांतीय हिंदी भाषा ऐकून शिकते व बोलण्याचा प्रयत्न करते. या त्याच्या प्रयत्नाचे कौतुक लोकांना वाटे. कोणी त्याचा उपहास केला नाही. इच्छा व प्रयत्न असेल तर कोणतीही गोष्ट आत्मसात करता येते, हे नामदेवाला अनुभवाने पटले. त्याची चिकाटी और होती. कोरड्या भाकरीचा तुकडा उसळेच्या तिखट पाण्याबरोबर चघळणारा बुटका नामदेव कमी मोलाची नोकरी करीत होता व लाख मोलाची विद्या संपादित होता.

१९१४ ते १९१८ चे पहिले महायुद्ध सुरू झाले होते. दररोज सनसनाटी बातम्या येत होत्या. जगात उलथापालथी चालल्या होत्या. हिंदुस्थानात लष्करभरती जोरात सुरू होती. नामदेवाचे जीवन मात्र ठरीव साच्याचे बनून गेले होते. घर ते ऑफीस, ऑफीस ते तालीम, तालीम ते रात्रशाळा ! . . . ऑफिसात गणवेश घालून स्टुलावर बसावयाचे. पांडवप्रताप, हरिविजय, असली पौराणिक किंवा शिवाजीराजांची महती गाणारी ऐतिहासिक पुस्तके वाचावयाची. इंग्रजी शिकण्याची धडपड करावयाची. हिंदीत बोलायची खटपट करायची हा क्रम. त्यात बदल नाही.

पण एके दिवशी अकस्मात या क्रमात बदल झाला. नेहमी हसतमुखाने ऑफिसात येणारा व ऑफिसमधील कारकून मंडळींना कुणाशी इंग्रजीत तर कुणाशी हिंदीत बोलून खसखस पिकविणारा नामदेव आज खाली मुंडी घालून स्टुलावर बसला होता. मुसमुसत बसला होता. आज त्याने कोणाला सलाम केला नाही की कोणाशी इंग्रजीत किंवा हिंदीत बोलला नाही.

इतक्यात मॅक्डोनल्ड साहेबांची स्वारी आली. नेहमीप्रमाणे नामदेवाने स्टुलावरून उडी मारून धडपडत उभे राहात सलाम ठोकला नाही. साहेब पुढे गेले. त्यांच्या लक्षात हे आले. ते थांबले. मागे पाहिले. नामदेव खाली मान घालून स्टुलावर बसला होता. तो रडत होता. ते मागे फिरले आणि म्हणाले,

"नामडेव, रोता क्यू रे टू ?"

नामदेवाने वर पाहिले आणि त्याने मोठ्याने हुंदका दिला.

"अरे रोता क्यूं ? बोलो बेटा !"

" साहेब ! " नामदेव बोलण्याचा प्रयत्न करू लागला, पण त्याला पुढे बोलवेना. तो रडू लागला.

" रोना मट नामडेव ! क्या होटा है मुझे कहो ! "

" साहेब, माझा थोरला भाऊ . . "

" हां हां ठोरल्या भाई ! क्या हुआ ? "

" तो गेला . "

" गया ? कहां ? "

" मिलिटरीत भरती झालाय तो ! "

" मिलिटरीट गया ? वहोट अच्छा ! "

" साहेब, आई सारखी रडते आहे. . . . "

" रोनेकी बाट नही ! "

" त्याचा पत्ता लागत नाही कुठं गेलाय तो ! त्याचा पत्ता लागला नाही तर आई जगणार नाही ! "

" ये बाट है ! मा है, वैसा हो शकटा है ! फिर भी डरनकी बाट नही ! मैं पत्ता लगा दुंगा ! रोना मट नामडेव ! "

" साहेब, मिळवता मुलगा गेला. घर बसलं की ! " नामदेव रडू लागला.

" हां हां रो मट नामडेव. टेरा पगार सात रुपय है तो आजसे ग्यारा रुपये टुझको मिल जायेगा ! अच्छा, रो मट ! साहेब निघून गेला. तशाही अवस्थेत पगार अकरा रुपये झाल्याबद्दल नामदेवला बरे वाटले ! त्याने डोळे पुसले.

कबूल केल्याप्रमाणे मॅक्डोनल्डसाहेबाने लष्करी अधिकाऱ्यांकडे चौकशी केली. आणि म्हादाचा–नामदेवाच्या थोरल्या भावाचा पत्ता लावला. तो पलटणीत भरती झाला होता व त्याची रवानगी औरंगाबादेकडे केली होती. तो सॅपर्स व मायनर्समध्ये दाखल झाला होता.

तिथे म्हादा सुतारकी शिकला आणि पुढे इराणला पलटणीबरोबर गेला. तो लढाई संपेपर्यंत तिकडेच होता. लढाई संपल्यावर तो परत आला.

पण गेलेल्या दिवसापासून चिमाबाईच्या डोळ्याचे पाणी खळले नाही. ती सारखी म्हादाची काळजी करायची. त्याची आठवण काढून रडायची. शिकल्या सवरलेल्या माणसांजवळ त्याची चौकशी करायची. लढाईत खूप माणसे मारली

गेली, असे छापून आल्याचे कोणी सांगितले की ती घाबरून गट्ट व्हायची आणि रडून रडून डोळे सुजवून घ्यायची. तिचा पोटचा गोळा लढाईत गेला होता. तिला सारखी भीती वाटायची. म्हादा सुखरूप परत यावा म्हणून ती देवाला नवस बोलायची !

मिळवता मुलगा लढाईवर गेल्यामुळे, तिच्यापुढे सादा व नामा यांवर ती घारीसारखी नजर ठेवायची हे तर खरेच, पण यांचा सांभाळ कसा करायचा हाही पेच तिच्यापुढे होता. पोरे मोठी होत होती. मिळकत घटत होती. तिला मुले जगवायची होती. वाढवायची होती. त्यात नामाला तालमीचा नाद लागलेला. मेहनत, कुस्ती करायचा तो. खुराक कसला देणार ती, पण वाढत्या भुकेला भाकरीचा तुकडा तरी पुढे ठेवला पाहिजे की नको ! ती माऊली खूप खूप राबू लागली. कष्ट करू लागली. तिचा जीव नामावर जडला. तोच तिचा जीव की प्राण झाला.

या साऱ्या उलाढालीत नामदेवाची रात्रशाळा संपली. तो मेहनत, कुस्तीवरच जोर देऊ लागला. प्रोत्साहन दिले अर्देसर वस्तादाने. अर्देसर वस्तादाला नामदेव आवडायचा. भारी चलाख वाटायचा. तालमीत कुस्ती करताना अर्देसर वस्तादाला नामदेवात चमक दिसली. तो म्हणे, " नामा, तू नामांकित पैलवान होशील ! "

अर्देसर वस्ताद स्वत: लंगडा होता. तो हौद्यात उतरून कुस्ती शिकवीत नसे, पण नामदेवाची तो मेहनत घेई. कुस्ती पाही. सूचना देई. प्रोत्साहन देई. या प्रोत्साहनाने नामदेवाला कुस्तीगीर बनविले. आपण पैलवान व्हावे, अशी ईर्षा त्याने बाळगली व तो झटून मेहनत करू लागला. एके दिवशी नामदेवाची कुस्ती ठरली. बारा तेरा वर्षांच्या नामदेवाची कुस्ती ठरली. हीच नामदेवाची पहिली कुस्ती आणि तीही थिएटरात.

नामदेवाने पहिली कुस्ती जिंकली. त्याचा आनंद गगनात मावेना ! कुस्ती चमकदार झाली. लोकांच्या नजरेत बारा-तेरा वर्षांचा नामदेव भरला. त्याच्या कुस्त्या वारंवार होऊ लागल्या.

जशा कुस्त्या होऊ लागल्या, तशी नामदेवाची पैलवान होण्याची ईर्षाही बळावली. तो खूप मेहनत करू लागला. ऑफिसबॉयची नोकरीत अकरा रुपये मिळत होते, ते पैलवानाला कसे पुरणार? तेव्हा जास्त पगाराची नोकरी बघायचे ठरले आणि एके दिवशी नामदेवाने ऑफिसबॉयची नोकरी सोडून तो गिरणीत दाखल झाला.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38802 दि:
क्रमांक 9272 नों दि: 10/8/

## प्रकरण ८ वे

ऑफिसबॉयची अकरा रुपयांची नोकरी सुटली आणि नामदेवास बावीस रुपयांची गिरणीतील नोकरी मिळाली. मिळकत दुपटीने वाढली. पैलवान व्हायचे तर खायला, प्यायला पुरेसे हवे. हो खुराक नसला तरी चालेल, पण मीठ-भाकर तरी भरपूर. अकरा रुपयांत पैलवानकी होणे शक्य नाही, हे ओळखून गिरणीतील नोकरी शोधली. पगार बावीस झाला. पूर्वीपेक्षा खाण्यापिण्याची बरी व्यवस्था होऊ लागली. नामदेव अंगापिंडाने भरू लागला. कुस्तीत चुण-चुणीतपणा दाखवू लागला.

गिरणीचे नाव एम्परर एडवर्ड मिल्स. या गिरणीत घडी खात्यात नामदेव नंबर मार्कर म्हणून नोकरीस लागला. कोणतीही परीक्षा पास न झालेल्या नाम-देवास शिकलेल्या माणसाची नोकरी लागली. चिकाटीने खासगी जी विद्या संपादन केली, त्याचे हे फळ. शिक्षण शाळेतच मिळते असे नव्हे. ते कोठेही घेता येते. इच्छा पाहिजे. जबर इच्छा पाहिजे. जशी इच्छा तसे फळ. नामदेवाची शाळा सुटली, पण विद्येचा व्यासंग सुटला नाही. स्टँडर्ड ऑईल कंपनीत असताना देखील अखंड विद्याव्यासंग चालू राहिला. ग्रंथ वाचनाचे वेड लागले. पुस्तकी

ज्ञान व अनुभवाचे ज्ञान यांचा सुरेख संगम नामदेवाच्या ठायी होऊन व्यवहारी शहाणपण नामदेवाच्या ठिकाणी दिसून येऊ लागले. ते त्याच्या जन्माचे सांगाती बनले.

नंबर मार्कर म्हणून नामदेवाचा जम बसला. त्याला बढती मिळाली. पगारही वाढला. बावीसचा सत्तावीस रुपये झाला. नामदेव खुषीत होता. त्याचा पगार वाढला होता म्हणून नव्हे, तर त्याच्या कुस्त्या वारंवार थिएटरला होत होत्या म्हणून. आठ पंधरा दिवसांत कुस्ती व्हायची, त्यात तो हमखास विजयी व्हायचा. चुणचुणीत पैलवान म्हणून त्याचा लौकिक वाढत होता.

नामदेवाची पहिली कुस्ती बालिवाला थिएटरमध्ये झाली. ती त्याने जिंकली. त्याला पागोटे इनाम देण्यात आले. कुस्ती मारणाऱ्या पैलवानास पागोटे इनाम देण्याचा रिवाज त्यावेळी होता. त्यानंतर अनेक कुस्त्या होऊ लागल्या. थिएटरात होऊ लागल्या. विजयामागून विजय मिळत गेले. इनामात वाढ होत गेली. पागोटच्यावरून पाच रुपये, सात रुपये . . . . दहा रुपये असे इनाम मिळू लागले. लहान जोडीतून नामदेव हळूहळू मोठ्या जोडीत येऊ लागला.

अर्देसर वस्तादाचा लोभ फार जडला. वस्ताद नामदेवास प्रोत्साहन देई व नामदेवाची मेहनत घेई. नामदेवही निष्ठेने मल्लविद्येची सेवा करू लागला. खूप मेहनत करू लागला. तो दररोज पंधराशे बैठक व हजार–बाराशे जोर काढू लागला.

नामदेवाचे क्षेत्र आता गिरण व तालीम असे बनले. जेवणासाठी फक्त तो घरी जाई. नामदेव यावेळी सतरा अठरा वर्षांचा होता. तो आता फाटक्या अंगाचा, बुटका नामा राहिला नव्हता, तर पिळदार बांध्याचा, उंचापुरा उमदा तरुण झाला होता.

त्याचे आयुष्य अशा रीतीने ठीक चालले होते. पण या चालत्या गाड्याला एकदम खीळ बसायची वेळ आली.

गिरणीतील सुपरवायझरने नामदेवाला एका साच्याचा नंबर आणावयास सांगितले. नामदेव दुसऱ्या कामात गुंतला होता. ते काम आटोपल्यावर तो साच्याकडे गेला. नंबर पाहिला आणि सुपरवायझरकडे गेला. निरोपासरशी काम झाले नाही, म्हणून सुपरवायझर चिडला होता. नामदेवास पाहताच तो

अद्वातद्वा बोलू लागला. नामदेवाने घडलेली हकिकत सांगितली, पण तो ऐकूनच घेईना. उलट त्याचा राग वाढतच गेला. रागाच्या भरात त्याने फटकन शिवी हासडली. नामदेवाच्या मानी मनाला ते रुचले नाही. दोघांचा खटका उडाला आणि नामदेवाने तिथेच सुपरवायझरला सांगितले, "मला असली नोकरी नको ! हा मी चाललो ! " असे बोलून नामदेव निघूनही गेला.

नामदेवाची वागणूक प्रेमळपणाची होती. गिरणीतील लोक त्याच्यावर प्रेम करीत. कामगारांना जसा तो आवडे, तसाच तो अधिकाऱ्यांनाही आवडे. साऱ्यांना वाईट वाटले. त्यांनी सुपरवायझरला दोष दिला.

नामदेव नोकरी सोडून बाहेर पडला खरा, पण त्याच्यापुढे पुढे काय ? याची चिंता होतीच. जगात सगळी सोंगे आणता येतात, पण पैशाचे सोंग नाही आणता येत. पैशाशिवाय जगात पानही हालत नाही, याची पुरती जाणीव नामदेवाला होती.

रात्री तालमीत सगळी माणसे जमली. त्यात नामदेवाच्या नोकरीचा प्रश्न निघाला. सर्वांनाच काळजी वाटली. म्हातारपाखडीचा होतकरू पैलावान वाया जाऊ नये, याची चिंता वाटत होती. खूप भवती नि भवती झाली. कुणी काय सुचविले, तर कुणी काय सुचविले. शेवटी ठरले मात्र असे की, नामदेवाने कापड खात्यात कामास जावे. भाऊ सादोबा तिथे होताच. त्याने गिरणीतील लोकांची इच्छा काय आहे, तेही सांगितले.

दुसऱ्या दिवशी नामदेव आपल्या गिरणीत गेला. कापडखात्यात त्याला तावडतोब नोकरी मिळाली. सादोबाच्या देखरेखीखाली नामदेव साचे चालवू लागला. नंवर मार्करची नोकरी सोडली नि दैवाने साचेवाल्याची दिली. या बदलामुळे नामदेवाचे आर्थिक नुकसान मुळीच झाले नाही. उलट फायदाच झाला. सत्तावीस रुपये पगार मिळत होता, त्या ऐवजी आता चाळीस रुपये मिळू लागला.

आठ तास गिरणीत काम करावे. सकाळ–संध्याकाळ मेहनत, कुस्ती करावी व उरलेला वेळ वाचनात घालवावा, असा दिनक्रम नामदेवाचा असे. वाचनात– विशेषत: वीर पुरुषांची चरित्रे वाचनात नामदेव मग्न असे. तालमीतील इतर पैलवान घोरत पडत असत, त्यावेळी नामदेव वाचनात गढलेला असे. इतर

पैलवान नामदेवाची वाचनाच्या वेडाबद्दल टिंगलही करीत. परंतु नामदेवाने ते कधी मनावर घेतले नाही. तो आपला वाचनात गुंग !

नामदेवाने साऱ्यावर सहा महिने काम केले. या सहा महिन्यांत त्याच्या प्रकृतीवर थोडाफार परिणाम झाला. होता. पैलवानी पैशाला प्रकृतीस अपायकारक धंदा करून भागणार नाही. परंतु नोकरी न करून कसे भागेल ? मोठा पैलवान होण्याची जबरदस्त इच्छा होती, पण गिरणीतील नोकरीही सोडता येत नव्हती. पेच पडला, कोडे पडले आणि हे कोडे अकस्मात सुटलेही.

नामदेवास पैलवान करावा, यामागे नियतीचा हात असावा, असे वाटते. कारण मल्लाला नको ती गिरणीतील नोकरी सोडण्याचा नामदेव व त्याचे वस्ताद अर्देसर युसफ छोटुलाल आणि इतर पैलवान मंडळी यांचे विचार चाललेले असता नेमका एक योगायोग घडून आला.

नामदेवाची कुस्ती ठरली होती. ती चुरशीची होती. थिएटर गच्च भरले होते. कुस्ती सुरू झाली. प्रतिस्पर्धी कच्च्या गुरूचा चेला नव्हता. तो काहीसा भारीच होता. नामदेव झटपट व चलाखीने कुस्ती करणारा म्हणून लौकिक पावला होता. तेव्हा त्याला अलीकडे भारी जोडच मिळत असे. लुंगेसुंगे पैलवान त्याच्याशी लढायला धजत नसत.लढत खडाखडी झाली. डावपेचावर डावपेच सुरू झाले. थिएटर चैतन्याने मुसमुसले. नामदेवाचा जोडीदार चढाईचा खेळ खेळत होता. नामदेव शांतपणे त्याचे डावपेच ओळखीत होता व तोड देत होता. कुस्तीला रंग भरत चालला. लोक आतुरतेने पाहू लागले. नामदेवाचा प्रतिस्पर्धी चिडत चालला. त्याने केलेला प्रत्येक डाव नामदेव निष्प्रभ करू लागला. लोक टाळ्या वाजवू लागले. प्रतिस्पर्धी खूप चिडला व अविचाराने नामदेवावर तुटून पडला. त्याचे पवित्रे चुकले. नामदेवाने संधी साधली. पट काढला आणि डोळ्याचे पाते लवते न लवते तोच त्या भारी जोडीदारास चारी मुंड्या चीत केले. तीस रुपयांचे इनाम मिळाले. त्यावेळी तीस रुपयांचे इनाम म्हणजे फार मोठे इनाम समजले जात असे. अर्देसर वस्तादानी तर मिठीच मारली नामदेवाला. अनेकांनी बक्षिसे दिली. थिएटरमधील झाडून साऱ्या लोकांनी नामदेवाची वाहवा केली. शाबासकी देणाऱ्या लोकांत श्रीरंग ठाकर होता. त्याला नामदेवामध्ये काही न्यारीच चमक दिसली.

बोलता बोलता खुर्देसर वस्तादानी सांगितले, "काय सांगू, माझा पठ्ठा गिरणीत काम करतोय, त्यानं त्याच्या शरीराची खराबी होते. त्याला जर दुसरीकडं काम मिळालं असतं तर यापेक्षा दुप्पट जोडीत लढविला असता. असा होनेवाला है मेरा पठ्ठा ! "

" असं ? मग माझ्याकडं पाठवा. मी घेतो त्याला कामावर ! " श्रीरंग ठाकर म्हणाला.

नवसाला देव पावला. पडत्या फळाची आज्ञा घेऊन नामदेव दुसऱ्याच दिवशी ठाकरांकडे गेला. कामावर रूजू झाला. गिरणीतला त्याचा भोग संपला. गिरणीला कायमचा रामराम ठोकला.

नामदेव लोखंडी जथ्यात हुंडेकरी म्हणून ठाकरांकडे नोकरीस राहिला. दरमहा पगार पन्नास रुपये. कारनॅक बंदरावरून व्यापाऱ्यांचा माल रेल्वेत भरून योग्य त्या गावी पाठविणे हे काम नामदेव करू लागला. या कामाला विद्येचाच उपयोग झाला. मालाच्या नोंदी ठेवणे, पावत्या घेणे, हे जसे विद्येचे काम होते, तसेच मालाची वर्गवारी करणे, हमालांना काम विभागून देणे व मालाची योग्य ती व्यवस्था करणे हे संघटनेचे, चातुर्याचे व शक्तीचे काम होते. हे काम करताना नामदेवास बुद्धीचा, शक्तीचा फार उपयोग झाला. तसेच चातुर्यही पणास लागले. श्रीमंत व्यापाऱ्यांशी संबंध आला. त्यांच्याशी बोलावे कसे, वागावे कसे, काम झटपट करून खूष करावे कसे याचे ज्ञान मिळाले. व्यवहारज्ञानात नामदेव पारंगत होत चालला. पुढील आयुष्यासाठी ही अनुभवाची मोलाची शिदोरी होती. ही शिदोरी नामदेव एक वर्षभर संपादीत होता.

जरी नामदेव लोखंडी जथ्यात मालाची ने–आण करण्यात गढलेला होता, तरी त्याचे खरे लक्ष होते मल्लविद्येकडे. नामवंत मल्ल होण्याची ईर्षा त्याने बाळगली होती. ती पार पाडण्यासाठी तो नोकरीचे निरनिराळे पर्याय शोधीत होता. हुंडेकऱ्याची नोकरी ही त्यातीलच एक. किंवहुना मल्लविद्येच्या कारणेच त्याने ऑफिसबॉयची नोकरी सोडली व गिरण कामगार बनला. तीही नोकरी मल्लविद्येला मारक असल्यामुळे तीही सोडली व बंदरावरील हुंडेकरी बनला. सारे लक्ष मेहनत, कुस्तीकडे. एक वर्षात नामदेवाची मल्लविद्येत खूप प्रगती

झाली. खूप कुस्त्या तो लढला. पैलवान म्हणून खूप नावलौकिक झाला. नामवंत पैलवान होण्याचे नामदेवाचे स्वप्न साकार होऊ लागले.

मुलाचा उत्कर्ष होत असलेला पाहून चिमाबाईला आनंद होई. नामदेवाच्या ठायी तिच्या आशा-आकांक्षा गुंतल्या होत्या. नामदेवाने नाव कमवावे, त्याने मोठा पैलवान व्हावे, अशी तिची मनोमन इच्छा असे. नामदेवाला काही उणे पडू नये म्हणून ती खूप खूप राबत असे. स्वत: राबून, घाम गाळून पोटच्या गोळ्यास ती वाढवीत होती, पैलवान करीत होती. थिएटरात ज्या दिवशी नामदेवाची कुस्ती असे, त्या दिवशी ही माऊली उपास करी. पाणीदेखील घेत नसे. देवाची प्रार्थना करी. " माझा नामा कुस्ती मारू दे. त्यो मोटा पैलवान होऊ दे. " नामदेवाच्या कुस्तीचा निकाल ऐकल्यावरच ती देवापासून उठे. अशी तिची भक्तीची भावना होती. आईचे हृदय असे वेडे असते. या हृदयातील वात्सल्याला त्रिभुवनात तुलना नाही. आई ती आईच. आणि आईची माया ती आईची माया ! दुसरी कसलीही माया आईच्या मायेची बरोबरी करू शकत नाही. नामदेवही कुस्तीला जाण्यापूर्वी आईच्या पायांवर डोके ठेवून जाई व आल्यावर आईच्या पायांवर मस्तक ठेवी.

नामदेव उफाड्याचा दिसू लागला. भरदार भासू लागला. नावलौकिक मिळवू लागला. त्याला अठरावे सरून एकोणीसावे वर्ष लागले. चिमाबाईच्या मनात नामाला उजवून टाकावे, असे आले. तिने आपल्या गावाकडच्या भागात " नामासाठी न्हवरी हेरून ठेवा " निरोप पाठविले. मुंबईतही मावळातील मंडळीत विचारपूस केली. तिची खटपट चालूच होती. नामावर तांदूळ टाकायला ती आतुर झाली होती. मुलाचे दोन हाताचे चार हात करून ती त्याच्या देण्यातून मोकळी होणार होती. आपले कर्तव्य बजावावयास ती सज्ज झाली होती. तिने सूतसंधान बांधले व नवरी पाहण्यास मावळात जायचे ठरविले.

नामदेव कुस्ती जिंकून आला. त्याने आईच्या पायांवर डोके ठेवले. चिमाबाई म्हणाली, " नामा, कुस्तीचा फड मारलास तसा. सौसाराचाबी फड मार म्हंजे झालं ! "

" म्हंजे काय ग आई ? "

" औंदा तुजं लगीन करायचं ! "

" माझं, आणि लगीन ? छे: ! "

" कारं, काय ल्हान हाईस आता ! चांगलं मिसरूड फुटलं तरी लगीन नको म्हणतोस ! तुला लग्नाबगार तसाच ठेवला तर जग हासल की मला ! "

" तसं न्हवं ग आई, मला पैलवान हुयाचं आहे ! "

" मग हो की, कोन नको म्हनंतंय ? "

" लगीन झाल्यावर कसला पैलवान हुनार मी ? "

" का रं ! काय झालं ! मानुस सवसाराला लागलं की संपलीच पैलवानकी आसं का समजता रं तुमी ! उलट ज्येला पैलवान हुयाचं हाय, त्यो हुनारच. तेवडी पोटतिडीक पायजे हं ! ज्येला पोटतिडीक न्हाई त्यो निमताला कारण धुंडीत बसतो. पैलवान का झाला न्हाईस रं ? आसं इचारलं की म्हंतो, " काय करनार मी, माजं झाल लगीन ! लगीन नसतं तर लई मोटा पैलवान झालो असतो ! '

मायलेकराची अशी बराच वेळ हुज्जत चालली. नामदेवाला आई म्हणते ते पटत होते आणि ' लग्न केलं की कुस्ती संपलीच ' या जनवाणीची भीती वाटत होती. म्हणून तो आढेवेढे घेत होता. शेवटी चिमाबाईने निक्षून सांगितले,

" नामा, तुज्यावर औंदा अक्षता टाकल्या की होईन मरायला मोकळी ! आईनं पोराचं लगीन केलं न्हाई, आसं न्हाई म्हणवून घ्याचं मला. डोळ्यादेकत तुज्यावर तांदूळ टाकायचं ठरविलंय म्या ! "

चिमाबाईचे निर्वाणीचे बोल ऐकून नामदेव काही बोलला नाही. तो उठून तालमीत निघून गेला.

अर्देसर वस्तादाला ही बातमी कळली. त्याने नामदेवाची समजूत घातली. आईच्या इच्छेप्रमाणे वागायचा सल्ला दिला. मग नामदेव लग्नास तयार झाला. चिमाबाई मावळात गेली नि पाथरशेतच्या वरघड्यांची मुलगी पसंत करून आली.

लग्न ठरविणे सोपे असते, पण पार पाडणे महाकठीण कर्म. लग्नाला का एका गोष्टीची गरज लागते ! नाना गोष्टी, नाना व्यवधाने सांभाळावी लागतात लग्नाचे वेळी. लग्न करायचे म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, वगैरे वगैरे खर्चाच्या बाबी तातडीने उभ्या राहतात.


## प्रकरण ९ वे

पैलवान पांडुरंग शिराळकर यांच्याबरोबर नामदेव मल्लांच्या काशीला करवीरला येऊन दाखल झाला. मोठा व नामांकित पैलवान होण्याची उमेद उरात बाळगून नामदेव करवीरी आला. पांडुरंग शिराळकर वचनाचा सच्चा. वचन दिल्याप्रमाणे प्रख्यात लाल आखाड्यात नामदेवाची सोय केली.


राजर्षी शाहू छत्रपती चारपाच वर्षापूर्वी दिवंगत झाले होते. तथापि तालमींचा षोक मात्र पूर्ववतच चालला होता. जंगी पैलवान करवीरी होते. शेकडो छोटे मोठे पैलवान निरनिराळ्या तालमीत घुमत होते. शक्तीची उपासना करीत होते....

लाल आखाड्याला नामदेवाच्या रूपाने मल्ल विद्येचा एक निस्सीम उपासक लाभला. निष्ठेने नामदेव मल्लविद्येची साधना करू लागला. मल्लविद्येतील जेवढी कला हस्तगत करता येईल, तेवढी करण्यास त्याचा जीव आसुसला होता. कुस्त्या पाहून, कुस्त्या खेळून व त्याचप्रमाणे इतर जाणत्या ज्येष्ठ पैलवानांकडून नामदेव कला शिकत होता. आता त्याच्यामागे कसलाच व्याप नव्हता. नोकरीची धावपळ नव्हती, की संसाराची तशी काळजी नव्हती. त्याचे काम एकमार्गी झाले होते. कुस्ती करणे हेच ते काम. एकाग्रतेने नामदेव मल्लविद्या संपादित होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्था
अनुक्रम 8802 दि
क्रमांक 1272 नों दि



पैलवान नामदेव सदाशिव मोहोळ



श्री. मामासाहेब मोहोळ यांचा कुटुंब परिवार

लेकी, सुना, जामात, पुत्र–पौत्रादिक

कोल्हापूरला गेल्या गेल्या नामदेव तयारीला लागला आणि दोन-तीन महिन्यांत पहिल्याच्या दुप्पट जोडीचा पैलवान झाला. तिकडील मैदानात, फडात तो लढू लागला. मुंबईत आल्यापासून त्याच्या मनात एक इच्छा दबून होती. ती म्हणजे पुण्यात कुस्ती लढण्याची. कोल्हापुरात चमक दाखविता येऊ लागल्याबरोबर ही इच्छा बळावली. प्रत्येकाला आपल्या विभागात आपल्या कर्तृत्वाचे तेज दाखविण्याची इच्छा असणे हे साहजिकच आहे. नामदेवालाही तसे वाटे. शिवाय पुण्यात त्या काळी काही प्रसिद्ध पैलवानही होते. त्यांच्याशी लढत देण्याइतपत नामदेवाची तयारी होत होती.

कोल्हापुरच्या पैलवानांना राजाश्रय होता. काहींना लोकाश्रय होता. त्यामुळे त्यांना खुराक मिळे. नामदेवाला कोण खुराक देणार ? घरची गरिबी. त्यात पैलवान होण्यासाठी नोकरी सोडलेली. लक्ष्मीची अवकृपाच होती म्हणाना. तथापि आईची पूर्ण कृपा होती. नामदेवाची आई लौकिकदृष्ट्या दरिद्री होती, परंतु तिच्या ठायी अलौकिक उदारता होती. तीही ईर्षेबाज होती. तिला मुलाला पैलवान करायचे होते. ती नामदेवाला करवीरच्या पैलवानांच्या मेळाव्यात पोरका पडू देण्यास तयार नव्हती. तिने स्वतःच्या कमाईतून व गिरणीत जॉबर झालेल्या दुसऱ्या मुलाच्या–सादोबाच्या कमाईतून दरमहा चाळीस रुपये नामदेवास पाठविण्यास सुरुवात केली. भारी पैलवान बनत चाललेल्या नामदेवाच्या दाढेला चाळीस रुपयांचा खुराक कसा पुरणार ? आणि तो भरदार मल्ल कसा होणार ? परंतु या चाळीस रुपयांच्या छोट्या रकमेच्या पाठीशी आईच्या वात्सलतेचे छत्र होते. त्यामुळे नामदेवास हे चाळीस रुपये चारशे रुपयांसारखे गुणकारी ठरले.

नामदेवाला आता भरपूर फुरसत मिळत असे. या फुरसतीचा उपयोग वाचनासाठी तो करी. वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके तो भराभर वाचून काढी. वाचनामुळे राजकीय घडामोडींचे विचार त्याच्या मनावर संस्कार करीत. गांधीजींच्या आंदोलनाचा प्रभाव नामदेवाच्या मनावर फार पडत असे. गांधीजींना नामदेव देवासमान मानी.

कोल्हापुरात उणीपुरी दोन वर्षे मल्लविद्येची आराधना नामदेवाने केली. अनेक कुस्त्या केल्या. पटके, फेटे, इनाम मिळविले. रोख रकमेच्या निकाली

कुस्त्याही केल्या. परंतु नामदेवाचे मन कोल्हापुरास रमले नाही. ते सारखे पुण्यांकडे ओढ घेई. पुण्यात कुस्ती व्हावी ही जबरदस्त इच्छा. पुणे विभागातील खेडोपाड्यांतून संचार करावा. तेथील लोकांत मिसळावे. तेथील हगाम्यात कुस्त्या कराव्यात, अशी मनाला ओढ

या ओढीनेच नामदेवाला पुण्याला खेचले. पुण्यात नामदेवराव करपे नावाचे गृहस्थ होते. ते कुस्ती शौकिन होते. पुण्यातील निंबाळकर तालमीशी त्यांचा निकटचा संबंध. करपे यांनी नामदेवास पाचारण केले. नामदेव पुण्यास आला. निंबाळकर तालमीचा पैलवान बनला. श्री. करपे यांनी मदतीचा हात दिला.

यावेळेपावेतो चांगला लढवय्या पैलवान म्हणून नामदेवाचे नाव झाले होते. त्याने इनामाची शंभर रुपयांची सीमा केव्हाच ओलांडली होती. जंगी पैलवानात त्याची गणना होऊ लागली होती.

नामदेव जिद्दीने लढणारा होता. त्याला पुणे विभागात कुस्त्या करण्याची मनापासूनची इच्छा होती. खुद्द पुण्यात कुस्त्या व्हाव्यात अशी तीव्र मनीषा होती. नुसत्या कुस्त्या व्हाव्यात अशी आस त्यास लागली नव्हती, तर कुस्त्या माराव्यात अशी होती. नुसती इच्छा बाळगून भागणार नाही, त्यासाठी खूप परिश्रम घेतले पाहिजेत, याची जाणीव नामदेवास होती. म्हणून तो कसून मेहनत, कुस्ती करीत होता.

नामदेव पुणे विभागातील खेडोपाड्यांतून कुस्तीसाठी फिरे. तेथील हगाम्यात, फडात लढे व बक्षिसे पटकावी. त्या हगामातील कुस्त्यांमुळे नामदेवास लढतीचा सराव तर झालाच, त्याशिवाय त्याची हिंमतही वाढली. काही पैलवान तालमीत चांगले लढतात, पण सार्वजनिक मैदानात लढताना घाबरतात. दिल टाकतात. मैदानाची त्यांना भीती वाटते. नामदेवाची मैदानाची भीती चेपली होती. त्याची हिंमत वाढली होती. तालमीत कुस्ती जितक्या मोकळेपणाने करावी तितक्या मोकळेपणाने तो मैदानात कुस्ती करी. किंबहुना अधिक हिंमतीने व त्वेषाने तो लढे.

हगाम्यात व फडात अनेक कुस्त्या नामदेवाने केल्या. त्याचे नाव लोकांच्या तोंडी झाले. चार पैसेही मिळू लागले. तथापि तो वाट पाहात होता ती पुण्यात कुस्ती होण्याची.

आणि ती संधीही चालून आली. वानवडीला कृष्णा ऊर्फ किसन खाडे हा पैलवान होता. त्याची तयारी चांगली होती. त्याची लढतही प्रेक्षणीय असे. कुस्ती शौकिनांनी नामदेवास विचारले, " लढतोस का किसन खाड्याबरोबर ?" नामदेवास संधी हवी होती. नामवंत पैलवानाबरोबर लढायची संधी हवी होती. ती चालून आली होती. त्याने एकदम होकार दिला. किसन खाडे विरुद्ध नामदेव मोहोळ ही कुस्ती ठरली. हीच नामदेवाची पुण्यातील पहिली करारी कुस्ती होय.

करारी कुस्ती ठरल्या दिवसापासून नामदेवाने मेहनत-कुस्तीची जारीची तयारी चालविली. रात्रंदिवस त्याच्या मनात कुस्तीचे विचार घोळत असे. डाव कसे करावेत, याचा विचार तो करी. आपण खाली आलो तर सुटून कसे जायचे, आपण वर असलो तर किसनवर कोणता डाव करायचा, किसनचे पेटंट डाव कोणते, तो कुठे घसरतो, तो पवित्रे कसे टाकतो, याचा नामदेव बारकाईने अभ्यास करी. नामदेवाचे वाचन जबरदस्त होते. वाचनामुळे कोणत्याही गोष्टीचे विश्लेषण करण्याची व कोणत्याही गोष्टीची सांगोपांग अभ्यास करण्याची कला त्याला कळून चुकली होती. नामदेवाने किसनने आजवर केलेल्या कुस्त्यांचा त्याने केलेल्या डावांचा, त्याच्या ताकदीचा पुरा अभ्यास केला व या सर्व गोष्टी जमेस धरून आपण कोणते डावपेच केले पाहिजेत, हे त्याने ठरविले. वाचनामुळे खरोखरीच नामदेवाच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. वाचनामुळे पद्धतशीर विचार करण्याची शक्ती त्याच्या ठिकाणी आली. ही विवेचक व विवेक शक्तीच त्याच्या यशाचे मर्म होय. नामदेव आडदांडपणे कधी लढला नाही. आपला प्रतिस्पर्धी कसा आहे, काय करतो, त्याची ताकद किती, डाव कोणते, या सर्वांचा तो शांतपणे विचार करी व त्यावर तोडगा शोधे. मल्लयुद्धात याची फार आवश्यकता असते. मल्लयुद्ध हे युद्धच आहे. युद्धात आडदांडपणा, आतताईपणा केल्यास नाश होतो. विचारपूर्वक आखणी व रचना केल्यास जय मिळतो. नामदेव हा कुशल सेनानीप्रमाणे कुस्तीची आखणी करीत असे. विचारपूर्वक आखणी करण्याची वृत्ती नामदेवाच्या ठायी बाणली आहे. तीच त्याच्या आयुष्यात अत्यंत यशस्वी ठरली. कुशल रचनाकार म्हणून नामदेव आयुष्यात यशवंत झाला.

मैदानाची तारीख जवळ येत चालली. जाहिरात काढली. ती जाहिरात मुद्दाम पुढे देत आहोत.

# मल्लांची विरश्रीची जंगी कुस्ती

## इनाम रुपये ३५०   इनाम रुपये ३५०

## जागा:—पुणें, किर्लोस्कर थिएटर.

रविवार तारीख १३ माहे मार्च सन १९२७ रोजीं दिवसां ५॥ वाजतां



**वानवडी येथील**
प्रसिद्ध पहिलवान
**कृष्णा सोपाना खाडे.**

**निंबाळकर यांचे**
तालमींतील पहिलवान
**नामदेव सदाशिव मोहळ.**

सरकारी करासह ति. दर:—खुर्ची ११४, तळमजला ८९, दुसरा मजला ८७ व तिसरा मजला ८४.

प्रेक्षकांस सूचना:—प्रवेशद्वारावर दोन इसमांनी लंगोट बांधण्यास आखाड्यांत यावें. २ कुस्तीचे मध्यें जाण्याची सक्त मनाई आहे. ३ कोणी कोणत्याही तऱ्हेचा अमल करून येऊ नये ४ ऊंस, काठी वगैरे मारक हत्यार आणूं नये. ४ आमची मुभा नसेल त्यास आंत घेतले जाणार नाहीं. ५ विडी ओढण्याची सक्त मनाई आहे. ६ गैरवर्तन करणारास पैसे परत न देतां बाहेर घालविलें जाईल. ७ जागेबद्दल तक्रार चालणार नाहीं. ८ व्यवस्थापक सवडीप्रमाणें दर वाढवितील. ९ बोर्डावर लिहिलेल्या व ठरलेल्या कुस्तीचे पैलवानाशिवाय इतरांस जाण्याची सक्त मनाई आहे. १० एकदां आंत घेतलेल्या इसमास पुन्हा बाहेर सोडलें जाणार नाहीं. ११ रात्री ... वाजेपर्यंत चालू राहील. पुढें चालणार नाहीं.

तिकीटें मिळण्याचे ठिकाण:—१ शंकर सदाशिव जाधव यांचे सायकलचे दुकानीं, शुक्रवार पेठ ५६३ सडेकाबर, पुणें. २ नरसिंगसा मल्हारसा कल्याण टेलर, २६ मिठगंज पुणें ३ सदाशिव गणपत क्षीरसागर यांचे दुकानीं कुलवंतप्रमाणे धर्मशाळा, पुणें.

कंत्राटदार:-महादेव सापाना.

प्रो-दत्त प्रिंटिंग वर्क्स, बुधवार पेठ, पुणें शहर.

बावीस वर्षांचा नामदेव कोणत्या जोडीत लढत होता, याची चांगली कल्पना या जाहिरातीवरून येते. त्याचप्रमाणे कुस्तीचा जनतेला किती जबरदस्त षोक होता, याचीही कल्पना येते. तद्वतच १९२७ सालची कुस्ती संबंधीची माहिती मिळते. साडेतीनशे रुपयांचे इनाम. त्या काळचा विचार करता ही रक्कम फार मोठी आहे. तिकिटाचे दरही माफक म्हणजे चार आण्यापासून चौदा आण्यापर्यंत. यावरून कुस्त्यांना किती गर्दी जमत असेल याचीही कल्पना येते. कुस्ती हा जनतेचा जिव्हाळ्याचा मर्दानी खेळ आहे. प्राचीन काळापासून आजतागायत हा जिव्हाळा जनतेने कायम ठेवला आहे. अनेक करमणुकींची साधने अस्तित्वात आली---सिनेमा, नाटके...वगैरे वगैरे, पण कुस्त्यांची ओढ जनतेच्या मनातून कमी झाली नाही.

तेरा मार्च १९२७. कुस्तीचा दिवस. पुण्यातील किर्लोस्कर थिएटर प्रेक्षकांनी गच्च भरून गेले. दुपारी एक–दोन वाजल्यापासून थिएटरकडे लोकांची रांग लागली होती. रंगीबेरंगी फेट्यांनी थिएटर फुलून गेले होते. ठीक साडेपाच वाजता कुस्तीला सुरुवात व्हायची तिकडे प्रेक्षकांचे डोळे लागले होते ते किसन–नामदेवाच्या कुस्तीकडे. कुस्ती चुरशीची होती आणि मुदतीची होती. कुस्तीला मुदत दिली होती वीस मिनिटांची. वीस मिनिटांची लढत. कुस्ती निकाली होती.

• नामदेवाने पुण्याच्या आसमंतात ज्या कुस्त्या केल्या होत्या व जो लौकिक मिळविला होता, त्यामुळे कुस्ती-शौकिनांची उत्कंठा वाढली होती. नामदेवाची लढत पाहायला ते आतुर झाले होते.

नामदेव व किसन आखाड्यात उतरले. त्यांनी शड्डू ठोकले. दंड थोपटले. सलामी देऊन एकमेकांस भिडले. सुरुवातीपासूनच कुस्ती रंगली. झणपणीची झाली. डावखोरा नामदेव हिंमतीने व कौशल्याने लढला. किसनच्या डावावर प्रतिडाव करू लागला. पहिली दोन मिनिटे अशी झटापटीत गेली. नामदेवाने पाहिले, किसनचा पवित्रा चुकला आहे. क्षणाचा विलंब न करता त्याने एकेरी पट काढला आणि पटकन किसनला धरून आणला. लोकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. टाळ्यांचा आवाज हवेत विरतो न विरतो तोच नामदेवाने लवंदर

काढून किसनला चीत केले. किसनला मारले. चारी मुंढे चीत मारले. प्रेक्षकांनी एकच टाळयांचा गजर केला. पुण्यातील पहिली करारी कुस्ती नामदेवने जिंकली. मोठ्या कौशल्याने जिंकली. विजेसारखा नामदेव तळपला. लोकांच्या मनात भरला. नामदेवाचे पुण्यात नाव झाले. नामदेव नामवंत पैलवान झाला.

नामदेव—विजयी नामदेव बाहेर आला. त्याने तावडतोब एक माणूस मुठे गावी पाठविला. त्याच्याबरोबर निरोप दिला, " आई, मी कुस्ती जिंकली ! " नामदेवाची आई मुठे गावी आली होती. कुस्तीच्या दिवशी ती अमृतेश्वराच्या मंदिरात देवाची करुणा भाकित बसली होती. मुलाच्या कुस्तीच्या दिवशी ती सकाळपासून तोंडात पाण्याचा थेंबही न घेता देवाच्या पायाशी धरणे धरून बसत असे. हा तिचा रिवाज होता. आजही ती तशीच बसली होती. मध्यरात्रीचा माणूस तिथे पोहोचला. नामदेवाने कुस्ती मारल्याचे त्याने चिमाबाईला सांगितले, तेव्हा तिचा आनंद गगनात मावेना. तिने देवाला भक्तिभावाने लोटांगण घातले आणि घरी येऊन उपास सोडला. आईची ही भक्तिभावाची शक्ती नामदेवाच्या पाठीशी होती. मातेची ही उदात्त शक्ती पाठराखण घेऊन नामदेव यशाच्या पायऱ्या चढत होता.

संसारी नामदेव मल्ल म्हणून गाजत होता. संसार थाटल्यामुळे त्याच्या मल्लविद्येच्या उपासनेला खंड पडत नव्हता. मल्ल म्हणून त्याची कीर्ती पसरत होती. तो वरच्या जोडीत लढत होता. खेडोपाडयांत फिरत होता. लढत होता. बिनजोडीचे बक्षीस मिळवीत होता.

याच वेळी मणिराम किराड वस्ताद यांच्या तालमीत एक लढवय्या पठ्ठा होता. अमीरसाहेब सुन्नामिया मण्यार त्याचे नाव. बहोत तेजदार पठ्ठा. या मण्यारशी नामदेवाची कुस्ती ठरली. इनाम ठरले रुपये चारशे. मोठी चुरशीची कुस्ती. दोन्ही पैलवान पुण्यातीलच. इभ्रतीची कुस्ती. मग लोकांचा लोंढा काही थिएटरमध्ये मावणार नाही, म्हणून मैदान ठरले डेक्कन जिमखान्यावर घ्यायचे. या कुस्तीची जाहिरात पुढे दिली आहे.

# मल्लांची जंगी कुस्ती.

## इनाम रुपये ४०० इनाम रुपये ४००

पडेल त्यास कांहीं नाहीं.

कुस्ती चितपट झाल्याशिवाय सोडविली जाणार नाहीं.

## जागा—डेक्कन जिमखाना, पुणें.

**रविवार ता. १९ माहे आगस्ट सन १९२८ रोजीं दिवसां ५॥ वाजतां**

निंबाळकर यांचे तालमींतील प्रसिद्ध पहिलवान नामदेव सदाशिव मोहोळ.



मागेराम किराड वस्ताद यांचे तालमींतील प्रसिद्ध पहिलवान अमीरसाहेब सुन्नामिया मण्यार.

## तिकीटांचें दर— ७ व ४ आणे.

प्रेक्षकांस सूचना:—लढणाऱ्याबरोबर दोन इसमांनीं लंगोट बांधण्यास आखाड्यांत यावें. २ कुस्तीचें मध्यें जाण्याची सक्त मनाई आहे. ३ कोणी कोणत्याही तऱ्हेचा अंमल करून येऊं नये व ऊंस कांठी वगैरे मारक जिनस आणूं नये. ४ आमची खुषी नसेल त्यास आंत घेतले जाणार नाहीं. ५ गैरवर्तन करणारांस पैसे परत न देतां बाहेर घालविलें जाईल. ६ जागेबद्दल तक्रार चालणार नाहीं. ७ व्यवस्थापक सवडीप्रमाणें दर वाढवितील ८ घोडांवर पंचाखेरीज व ठरलेल्या कुस्तीचें पैलवानाखेरीज इतरांस जाण्याची सक्त मनाई आहे. ९ एकदां आंत घेतलेला इसमांस पुन्हां बाहेर सोडले जाणार नाहीं. १० फ्री पास ३ वाजेपर्यंत चालतील पुढें चालणार नाहींत.

तिकीटें मिळण्याचीं ठिकाणें:—शंकर नामदेव हगवणे, रेमार्केटजवळ दाण्याचे दुकान.

रावजी विष्णु कोंढाळकर, निंबाळकर तालमीजवळ, सदाशिव पेठ.

मल्हारी बाळाजी सावळे, गोविंदराव नकाते यांचे हॉटेल शेजारी, सदाशिव पेठ.

शुक्रे यांचे दुकानी, लक्ष्मीरोड समोर, बेलबागेजवळ.

कुस्तीच्या दिवशीं दोनच्या पुढें डेक्कन जिमखाना.

नामदेव पांडुरंग करपे, कंत्राटदार,

निंबाळकर तालीम.

कलाप्रद प्रेस, ६६६ सदाशिव पेठ. पुणें.

१९ ऑगस्ट १९२८ रोजी ही कुस्ती डेक्कन जिमखान्यावर झाली. हजारो लोक कुस्ती पाहण्यास आले होते.

मल्ल मैदानात उतरले. त्यांनी खंब ठोकले. लढतीला सुरुवात झाली. खडाखडी कुस्ती दहा मिनिटे चालली. कुस्ती निकाली होती. तिला तीस मिनिटांची मुदत होती. नामदेवाने चपळाई केली. एकेरी पट काढला आणि अमीरला धरून आणला. ताबडतोब एकलंघी करून अमीरला उताणा करणार इतक्यात कुस्ती सोडविण्यात आली. पुण्यात नाव गाजले.

नामदेवाचे नाव गाजले खरे, पण त्याला जोड मिळेना. जोड देताना विरुद्ध बाजूचे लोक फार चिकित्सा करू लागले. ठरण्याबद्दल वाटाघाट व्हायची, मग लढणारा पैलवान माघार घ्यायचा.

नामदेव मल्ल विद्येची निष्ठापूर्वक उपासना करीत होता. त्याचप्रमाणे तो वाचनाचाही उपासक होता. फावल्या वेळात तो वाचन करीत असे. रोज रात्री झोपण्यापूर्वी एखाद्या पुस्तकाची पाचपन्नास पाने वाचल्याशिवाय तो झोपी जात नसे. वाचनामुळे त्याच्या ठिकाणी संयम व विवेक आला. कोणत्याही गोष्टीची कार्यकारण मीमांसा करण्यात तो गढून जात असे. आपल्या कर्तव्याविषयीही तो जागरूक असे. पैलवान म्हटला की तो सांसारिक कर्तव्याविषयी बेफिकीर असायाचा. उदासीन असायाचा. पण नामदेव त्याला अपवाद होता. नामदेवाने संसार नेटका केला. पैलवान, भारी पैलवान असूनही संसाराकडे तो दुर्लक्ष करीत नसे. संसारामुळे त्याच्या मल्लविद्येत कोणतीही अडचण आली नाही. त्याचे मोठा मल्ल होण्याचे ध्येय साध्य होत गेले.

संसार म्हटला की, अनेक उपाधी असायच्याच. कुस्त्या करून मिळणारा पैसा पैलवानकीस व संसारास पुरत नसे. तेव्हा नामदेवाने व्यवसाय करण्याचे ठरविले. भांडवल जवळ नाही, तेव्हा काय व्यवसाय करावा, याचा विचार करता करता त्यास कल्पना आली, कडब्याचा व्यापार करावयाची.

झाले. नामदेव कडब्याचा व्यवसाय करू लागला. थोडे दिवस हा व्यवसाय केल्यावर नामदेवास कळून आले की हा व्यवसाय वाटतो तितका फायदेशीर नाही. दिला व्यवसाय सोडून.

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3CC02 दि:
71 72 ठोकोबीपाच



मग पानपट्टीचे व सोडालेमनचे दुकान काढले. शनीच्या पाराजवळ हे दुकान होते. दुकान त्यातल्या त्यात ठीक चालले होते. पोटापुरते मिळायचे. कशीबशी तोंडमिळवणी व्हायची. तसा नामदेवाचा संसार छान चालला होता.

संसाराच्या वेलीवर १९३० साली एक फूल उमलले. नामदेवाला मुलगी झाली. नामदेव वयाच्या पंचवीसाव्या वर्षी बाप झाला.

संसार वाढू लागला, म्हणून काही तालमीचा नाद सुटला नाही. कुस्तीची उपासना नामदेव करीत होता. तो उपासनेला वंचित झाला नाही. परंतु जोडच मिळत नसल्यामुळे त्याला व्यवसायात अधिक लक्ष घालावे लागले. पोट पाठीशी लागलेले असते ना ? ते रिकामे राहू देत नाही. सारखे काही ना काही करावयास माणसाला भाग पाडते.

नामदेव व्यवसायात अधिक लक्ष घालू लागला. तालमीचा त्याचा संबंध सुटला होता, असे नव्हे. तथापि तो आता व्यावसायिक व प्रापंचिक बनला होता.

इतक्यात एक घटना घडली. अगदी अनपेक्षित. पुण्यातील निंबाळकर तालमीतील काही मंडळी लग्नाकरिता सातान्यास गेली होती. पैलवान मंडळी पैलवान मंडळींना भेटल्याशिवाय कसे राहतील ? पाणी नेहमी आपली पातळी शोधीत असते. जो तो आपली मंडळी शोधीत असतो. पैलवानांच्या गप्पाछप्पा चालल्या. बोलता बोलता सातारकर म्हणाले, " आमच्या पापा उंबरला तुमच्या पुण्यात जोड नाही. " झाले. हा आव्हानाचा प्रश्न आला. तसाच तो पुण्याच्या प्रतिष्ठेचाही होता. पुणेकरांना सातारकरांचे बोलणे रुचले नाही. उलट झोंबले. ते एकदम म्हणाले, " असं कसं म्हणता ? बिनजोडीचा तोडा तुम्हांला देण्यास पुण्यात झुंजार मल्लाचा तुटवडा पडला नाही ! " पुणेकर असे म्हणाले तेव्हा त्यांच्या नजरेपुढेनामदेव होता. पापा उंबरशी लढणारा केवळ नामदेवच होता. तोच आता पुण्याची प्रतिष्ठा राखायला समर्थ होता. त्याच्यामुळेच पुणेकरांनी सातारकरांच्या बढाईला ठणठणीतपणे पायबंद घालायचे धाडस केले. सातारकरही काही कमी नव्हते. त्यांनी ओळखले होते की नामदेव मोहोळच्या जिवावर पुणेकर बढेजाव माजवीत आहेत, पण नामदेव मोहोळ आता प्रापंचिक झाला असून, त्यात तो गुरफटत चालला आहे. म्हणून ते म्हणाले, " असं जर आहे तर होऊन जाऊ द्या पकड ! बसल्या बैठकीला ठरवून टाका मैदान ! "

...५

सातारा येथील नामांकीत पापा उंबर पैलवान व पुण्यांतील प्रख्यात लढवय्या पैलवान नामदेव सदाशिव मोहोळ यांच्या जंगी कुस्तीचा प्रचंड योग आला आहे. तरी कोणीही पैलवान शोकी अशी संधी दवडणार नाहींत.

# -: प्रचंड मल्लयुद्ध :-

**इनाम रु. ८७५** **इनाम रु. ८७५**

## जागा—डेक्कन जिमखाना, पुणें.

**रविवार ता. १७ मे १९३१ रोजीं दिवसां ५॥ वाजतां.**

पुणें येथील निंबाळकर यांचे तालमींतील जवान पट्टा पहिलवान
**नामदेव सदाशिव मोहोळ**



सातारा येथील गुलाम वस्ताद यांचे तालमींतील प्रसिद्ध लढवय्या पहिलवान
**पापा उंबर पैलवान**

## तिकिटाचा दर फक्त ४ आणे.

**प्रेक्षकांस सूचना:**—लढणाऱ्याबरोबर दोन इसमानी लंगोट बांधण्यास आखाड्यांत यावें. २ कुस्तीचेमध्यें जाण्याची सक्त मनाई आहे. ३ कोणी कोणत्याही तऱ्हेचा अंमल करुन येऊ नये व ऊस, काठी वगैरे मारक जिन्नस आणूं नये. ४ आमची खुषी नसेल त्यास आंत घेतले जाणार नाहीं. ५ विडी ओढण्याची सक्त मनाई आहे. ६ गैर वर्तन करणारांस पैसे परत न देतां बाहेर घालविले जाईल. ७ जागेबद्दल तक्रार चालणार नाहीं. ८ व्यवस्थापक सवडीप्रमाणे दर वाढवतील ९. कुस्ती ३० मिनिटानंतर सोडविली जाईल. आखाड्यात कुस्तीचे पैलवानाखेरीज करुन इतरास जाण्याची सक्त मनाई आहे १० एकदां आंत घेतलेल्या इसमांस पुन्हां बाहेर सोडले जाणार नाहीं. ११ फ्री पास ३ वाजेपर्यंत चालतील पुढें चालणार नाहीं.

तिकिटें फक्त जिमखान्यावरच मिळतील.

कंत्राटदार,
**शंकर बगाजी गायकवाड, उर्फ गवळी**

Shri Datta Printing W. Poona.

सातारकरांनी सरळ मुद्यालाच हात घातला. पुणेकरांनी ताबडतोब मैदान ठरविले. पापा उंवर पैलवान विरुद्ध नामदेव सदाशिव मोहोळ.

पापा हा उमर ऊर्फ उंवर पैलवानाचा मुलगा. उमर पैलवान हा मागील पिढीतील नामांकित पैलवान. पापाही उत्तम लढवय्या होता. आता ठरलेले पुण्याचे मैदान ईर्षेचे ! अर्थात उमर पैलवानाने आपल्या देखरेखीखाली पापाची तयारी करून घेण्याचा क्रम चालविला.

१७ मे १९३१. रोज रविवार. डेक्कन जिमखान्यावर भर दुपारपासून माणसांची ही रीघ लागली होती. पुणे–सातारा लढत पाहायला लोक उत्सुक होते. कुस्ती चुरशीची व आव्हानाची होती. माणसे इरेस पेटलेली होती.

मल्ल मैदानात उतरले. पापा धिप्पाड शरीराचा, उंचापुरा मल्ल होता. नामदेव बुरुजवंद शरीराचा होता.

कुस्तीची सलामी झडली. एकमेक एकमेकाची ताकद आणि कुवत अजमावीत होते. पहिली दहा बारा मिनिटे अशी खडाखडी होण्यात गेली. मग मात्र नामदेव चढाईचा खेळ खेळू लागला. त्याने संधी साधून एकेरी पट काढला व पापास खाली घेतले. सुटून जाण्याची पापाने खूप धडपड केली. शिकस्त केली, पण नामदेव पापाच्या चांगलाच खनपटीला बसला होता. पापाची सारी धडपड तो वायफळ करून सोडी. पापा नामदेवाच्या कचाट्यातून सुटण्याचा प्रयत्न करायचा आणि नामदेव तो हाणून पाडायचा. असा क्रम चालला. शेवटी पापा दमात उखडत चालला. नामदेवाने हे हेरले. त्याने लवंदर काढून पापास मारण्याचा बेत केला. पण पापाही काही कच्च्या गुरूचा चेला नव्हता. तो कसलेला लढवय्या होता. तो नामदेवाच्या डावाच्या आहारी गेला नाही. तो निसटला व पळू लागला. मुदत संपण्याच्या अगोदर सातारकर मंडळींनी कुस्ती सोडविण्याचा आग्रह धरला. कुस्ती सोडविण्यात आली. सातारकर व पुणेकर दोघांची इभ्रत वचावली. पुणेकरांनी आव्हान स्वीकारले आणि पुण्यास मैदान घेऊन तोडीस तोड दिली. बिनजोडीचा तोडा नाही दिला सातारकरांना. नामदेवामुळे हे शक्य झाले. नामदेवाची त्यांनी पाठ थोपटली. या कुस्तीत तसा नामदेव भिस्सा ठरला होता.

पुण्यातील या नामांकित कुस्त्याशिवाय पुण्याबाहेरील नामांकित पैलवानां-बरोबर नामदेवाने कुस्त्या केल्या. यदु गावडे याच्याशी कुस्ती झाली. तीत गावडेला नामदेवाने दोनचार मिनिटांत मारले. रामचंद्र भोयावरोबरची कुस्ती बरोबरीची झाली. अवसरीच्या हगाम्यात नाशिकचा पैलवान बाळकिसन आला होता. नामदेवाने त्याच्याशी झुंज दिली व त्याला मारले.

जुन्नरजवळ ओतूर गाव आहे. तेथील हगामा प्रसिद्ध. मोठे मोठे पैलवान तेथे येत. पंजाबमधील कर्तारसिंग पैलवान तिथे आला होता. मोठे इनाम उपटावे हा तर हेतू होताच, शिवाय बिनजोडीचे इनामही घेऊन जावे, अशी त्याची मनोमन इच्छा होती. कर्तारसिंगाशी लढायला कोणी तयार होईना. नामदेव पुढे झाला. जुंपली कुस्ती दोघांची. अटीतटीची. पाऊण तास निकराची लढत झाली. अतिशय प्रेक्षणीय. नामदेवाने कर्तारसिंगाचा मद उतरविला. त्याचे हाल हाल केले. शेवटी कुस्ती बरोबरीने सुटली. नामदेवाचे समाधान झाले नाही.

दुसऱ्या दिवशी शिळा हगामा होता. नामदेव सकाळीच मैदानात उतरला व खंब ठोकू लागला. लोक जमले. पैलवान जमले. कर्तारसिंग आला, पण कर्तारसिंग नामदेवाशी लढायला धजला नाही. अर्थात त्याही मैदानात नामदेवाला बिन-जोडीचे बक्षीस मिळाले. अजिक्यपद मिळाले.

नामदेवाने शेवटची कुस्ती काळा जोगी किंवा काळा खलाशी याच्याशी केली. ती हडपसर येथे झाली. काळा खलाशी हा नामवंत पैलवान. उत्तम लढवय्या. कोल्हापुरचा प्रख्यात पैलवान शिवाप्पा मुत्नाळे याच्याबरोबर तो लढला होता. शिवाप्पाच्या हातून तो नऊ वेळा सुटून गेला होता. मोठा कुशल कुस्तीगीर होता तो. अशा हुन्नरबाज लढवय्याशी पकड घेतली नामदेवाने. दोन्ही पैलवान डावपेचात तरबेज. डावपेचांवर डावपेच. तोडीस तोड. फार रंगली कुस्ती. सारख्याला वारखे भेटले होते. कुस्ती पाहून लोकांच्या डोळ्याचे पारणे फिटत होते. कुस्ती तासभर चालली होती. या वेळात नामदेवाने दोनदा काळा खलाश्याला धरून आणले. दोन्ही वेळा तोही पठ्ठा सुटून गेला. पंच कुस्ती सोडवायला तयार होईनात. मग लोकांनाच राहावेना, हो चांगले पैलवान असले म्हणून किती वेळ लढणार ? लोकच मैदानात घुसले व त्यांनी कुस्ती सोडविली.

नामदेवाची ही शेवटची कुस्ती. नामदेव यानंतर लंगोट कसून मैदानात लढतीसाठी उतरला नाही. त्याने दोनशेवर कुस्त्या केल्या. त्यांतील केवळ दोनच तो हरला. बाकीच्या मारल्या. काही बरोबरीने सुटल्या. त्याची मोठा पैलवान होण्याची इच्छा परमेश्वराने पुरविली होती. पागोटे इनामापासून ८७५ रुपये इनाम मिळेपर्यंत तो लढला. पुण्याला कुस्ती करण्याचीही हौस त्याची दैवाने पुरविली होती. एवढेच नव्हे तर या विभागातील सर्वश्रेष्ठ मल्ल म्हणून त्याची ख्याती झाली होती. जे मिळवायचे ते मिळविले आणि मग नामदेवाने कुस्तीच्या आखाड्याला रामराम ठोकला आणि तो व्यवसायाच्या रंगणात उतरला.

## प्रकरण १० वे

१९३२ साली नामदेवाने प्रत्यक्ष कुस्तीला कायमचा रामराम ठोकला. परंतु त्यावेळी त्याचे लक्ष देशातील इतर घडामोडींनी व्यग्र झालेले होते. नामदेव खंदा वाचक होता. दररोज नियमितपणे वृत्तपत्रे व इतर पुस्तके तो वाचीत असे. वाचनाचा त्याच्या मनावर कळत नकळत खूप परिणाम झाला होता. विशेषत: ऐतिहासिक पुस्तकांच्या आणि त्यातल्या त्यात शिवरायांच्या मर्दुमकीच्या कथांनी नामदेवाचे मन भारून गेले होते. देशाभिमानाची भावना अंत:करणात प्रज्वलीत झाली होती. देशासाठी आपण काही तरी करावे, असे त्याला वाटत होते. देशात गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यासाठी होमकुंड पेटले होते. हजारो तरुण अहमिहकेने स्वातंत्र्य होमात स्वत:चा बळी देण्यासाठी पुढे येत होते. १९२९ साली संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडला व पास करून घेतला. त्यामुळे चैतन्याची एकच लाट सबंध देशभर उसळली. महात्माजींनी १९३० साली असहकाराची चळवळ पुकारली. आसेतु हिमाचल भारत खवळून उठला. इंग्रजी सत्तेला हा लोकप्रक्षोभ पाहून हादराच बसला. भारतातील प्रत्येक तरुण स्वातंत्र्य संग्रामात उडी घ्यायला आसुसला

होता. ज्याच्या मनात देशाभिमान जागृत झाला नाही, असा करंटा तरुण त्यावेळी सापडणे शक्य नव्हते.

मिठाच्या सत्याग्रहासाठी भारताच्या नंग्या फकिराने दांडीकडे प्रयाण केले. दांडीला मिठागरात उभे राहून त्यांनी मूठभर मीठ हाती घेऊन मिठाचा सत्याग्रह केला. साऱ्या भारताला अगस्तींची आठवण झाली. एका आचमनात सारा समुद्र अगस्तींनी पिऊन टाकला. त्याप्रमाणे मूठभर मीठ हाती घेऊन गांधीजींनी ज्याच्या राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही, अशा समुद्र व भूमीच्या इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. बलाढ्य इंग्रजी सत्तेने पाशवी मार्गांचा अवलंब केला. महात्माजी व इतर पुढाऱ्यांची धरपकड झाली. देशात एकच खळबळ माजली. तुरुंग भरून गेले. देश पेटून उठला. इंग्रजांना हा प्रक्षोभ आवरता आवरेना. तरुण रक्त उसळून उठले. देशासाठी सडा शिंपडायला उतावीळ झाले. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तळहातावर शीर घेऊन असहकाराच्या चळवळीत भारताचे तरुण–तरुणी जिवेभावे सामील झाल्या.

उसळत्या रक्ताच्या नामदेवाचे मन स्वस्थ बसेना. ते बेचैन झाले. आपणही स्वातंत्र्य संगरात उडी घ्यावी अशी उत्कंठा लागली. मर्द मल्ल असा मागे कसा राहील ? मल्ल नामदेव राजकीय चळवळीत खेचला जाऊ लागला.

स्वदेशीचा पुरस्कार व परदेशी कपड्यांची होळी, हा चळवळीचा एक भाग होता. गावोगावी परदेशी कपड्यांच्या मोठमोठ्या होळ्या पेटत होत्या. परदेशी कपड्यांची होळी म्हणजे ब्रिटिश गुलामगिरीला दिलेला भडाग्नी होता. पुण्यातही रस्तोरस्ती, चौकाचौकात परदेशी कपड्यांच्या होळ्या धगधगत होत्या.

नामदेव मोठा पैलवान झाला होता. तरुणांचा आवडता झाला होता. त्याला देशात माजलेला असंतोष दिसत होता. वाचनामुळे कायदेभंगाच्या चळवळीमागील भूमिका समजत होती. गांधीजींची तत्त्वप्रणाली व पंडितजींचे अपूर्व शौर्य यांचा परिणाम त्याच्या मनावर झाला होता. देशासाठी आपली शक्ती व बुद्धी खर्च करावी, अशी भावना त्याच्यात निर्माण झाली होती. तो गांधीजींच्या काँग्रेसचा पाईक बनला होता. एकीकडे तो तालमीत बलोपासनेसाठी घुमत होता, तर दुसरीकडे तो तरुणांच्या ताफ्यात काँग्रेसचा विशेषतः कायदेभंगाचा प्रचार

व प्रसार करण्यासाठी चौकाचौकातून, गल्लोगल्लीतून घुमत होता. चरितार्था-साठी पानपट्टी—सोडालेमनचे दुकान काढले होते, तेथे तरुणांचा मेळावा जमे. नामदेव तळमळीने कायदेभंगाची कहाणी सांगे. तो एक प्रकारे चळवळीचा शाहीर बनला होता. तरुणांचे नेतेपण आपोआपच त्याच्याकडे आले होते.

देशाभिमानाचा आवेग दिवसेंदिवस वाढत चालला. तो अनावर झाला. त्या सरशी नामदेव उठला. त्याने गेल्या पंधरा—सतरा वर्षात मैदाने मारून मिळविलेले भारी किंमतीचे बनारसी फेटे, जरीची जाकिटे आणि एरव्ही वापरत असलेले सव्वीस नंबरच्या मलमलीचे सदरे व जानपिली धोतरे यांची भर चौकात होळी केली व खादीच्या कपड्यांचा अंगिकार केला. खादी वापर-ण्याचे हे व्रत गेली तीस-पस्तीस वर्षे अखंडपणे चालविले आहे.

एवढ्याने मावळी मर्दाचे समाधान होईना. आपण अधिक काहीतरी केले पाहिजे, असे मल्ल नामदेवास वाटे. असहकाराची चळवळ फोफावत होती. लाठीमार, गोळीबार ठिकठिकाणी चालू होते. धरपकडीचे सत्र सुरू होते. चळवळ दडपण्यासाठी जो जो पाशवी दडपशाहीचा अवलंब सरकार करीत होते, तो तो चळवळ दुप्पट जोराने उफाळत होती. गावोगावी प्रभातफेऱ्या निघत होत्या. हातात झेंडे घेऊन प्रभातफेऱ्या काढायला नामदेवाने सुरुवात केली. या प्रभातफेऱ्या पोरासोरांच्या नव्हत्या. पैलवानांच्या होत्या. पोलि-सांच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. तालमीं जर चळवळीत सामील झाल्या तर त्यांना आवरणे मुष्किल होईल, याची पुरती जाणीव सरकारला होती. सरकारने तालमीत ही चळवळीची आग भडकण्यापूर्वी विझविण्याचा धूर्त डाव टाकला.

नामदेव निंबाळकर तालमीचा पैलवान. रावजी कोंडाळकर हे वस्ताद. शिवाय काही पंच मंडळी. रावजी कोंडाळकर व पंच मंडळी यांच्यामागे पोलि-सांचा ससेमिरा लागला. तुमची तालीम चळवळीचे केंद्र आहे. तुमचे पैलवान प्रभातफेऱ्या काढतात. सरकार विरुद्ध प्रचार करतात. कपड्यांच्या होळ्या करतात. तेव्हा तालमीला कुलूप ठोकू व तुम्हा म्होरके मंडळींना अटक करून तुरुंगात डांबू, अशी पोलिसांनी धमकी दिली. झाले, ही मंडळी लटपटली.

त्यांनी नामदेवास परावृत्त करायचा प्रयत्न केला, पण जेव्हा नामदेवावर फारसा परिणाम होत नाहीसे दिसले, तेव्हा त्यांनी दमदाटीही द्यायला मागेपुढे पाहिले नाही.

गांधीजींनी मांडलेल्या सत्याग्रहाने उग्र रूप धारण केले होते. तरुणांचे जथेच्या जथे सत्याग्रहात सामील होत होते. सत्याग्रहींच्या अटकेच्या बातम्यांनी वर्तमानपत्रांची पानेच्या पाने भरून येत होती व वाचक तरुणांची अंत:करणे स्वातंत्र्य होमात बलिदान करण्यासाठी सिद्ध होत होती.

नामदेवाने ठरविले, आपणही जथा घेऊन जायचे व सत्याग्रह करायचा. हा हा म्हणता बातमी पसरली. कुणी कौतुक केले, कुणी वेड्यात काढले, पण नामदेवाने तिकडे लक्षच दिले नाही. तो आपला निराळ्या धुंदीत होता.

इतक्यात नामदेवाची आई चिमाबाई पुण्यास अकस्मात आली. मुठ्याहून विचारी तातडीने निघून आली होती. तिला कळले होते की तिचा 'नामा' तुरुंगात जाणार आहे म्हणून. नामाला पोलीस पकडणार व त्याला तुरुंगात घालणार या कल्पनेने तिच्या काळजाचे पाणी पाणी झाले होते. बातमी समजल्यापासून तिच्या डोळ्याचे पाणी आटले नव्हते. तिने अन्नपाणी वर्ज्य केले होते. गाय जशी वासराकडे धाव घेते, तशी ती माऊली लेकराकडे धावली होती. नामदेव भारी पैलवान खरा, पण तो जगाला, मातेला नव्हे. ते आईला लेकरू वाटे.

चिमाबाईने नामाला आल्या आल्या कवटाळले. त्याची दोन्ही हातांनी माया घेतली. त्याला आसवांनी न्हाऊ घातले आणि विचारले, " लेकरा, काय आरंबलयस रे तू ? तुरंगात जानार म्हणून समजलं मला. तुला आसं काय करायचं आसंल तर मला अगुदर अफू आनून दे. माज डोळं मिटल्यावर मग खुशाल वाटेल ते कर. तू तुरंगात गेल्यालं माज्याच्यानं बगिवणार न्हाई ! तळहाताच्या फोडागत तुला वाडविलाय त्यो काय पुलिसाचा मार खान्यासाठी का तुरंगाच्या अंधाऱ्या कोठडीत सडत पडण्यासाठी ? लई हाल करत्यात रं बाबा तुरंगात. जनावरागत वागिवत्यात, बडीव बडीव बडिवत्यात ! चक्की फिसाय लावत्यात ! न्हाई, माज्या जिवात जीव असस्तोवर मी तुला तुरंगात जाऊ देनार न्हाई ! " चिमाबाई जीव तोडून बोलत होती. घळघळ

अश्रू ढाळत होती. नामदेवाच्या डोळ्यांना पाण्याची धार लागली होती. त्याला आपल्या आईने खाल्लेल्या खस्ता आठवल्या. त्याला हुंदका आवरेना. तो एकदम ओरडला, " आई ! "

नामदेवाला कुरवाळीत चिमाबाई व्याकुळतेने म्हणाली, " माजा नामा ! माजा नामा ! "

" आई, तुझ्या शब्दाबाहेर मी नाही ! "

" तसं नगं बोलूस पाडसा ! मला वचन दे, माज्या जिवात जीव असस्तोवर चळवळीत पडनार न्हाई ! तुरंगाची वाट धरनार नाही ! "

" आई, तुझ्या पायाची शपथ घेऊन सांगतो, तू हयात असेपर्यंत मी सत्याग्रहात जाणार नाही. "

" माजा शाना नामा त्यो ! " चिमाबाईला गहिवर आला. तिने नामाला पोटाशी धरला. दोन्ही हातांनी माया घेऊन त्याच्या कानशिलावर हातांची बोटे कडाकडा मोडली.

अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ लो. दि. ..............

## प्रकरण ११ वे

राजकीय चळवळीच्या उंबरठ्यावरून नामा परत फिरला व उद्योगाला लागला. परमेश्वर करतो ते भल्यासाठी, याची प्रचीती नामदेवाला नंतर आली. नामदेवाच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य ! कष्ट तर पाचवीलाच पुजलेले. नामदेवाच्या बालपणी पाचवीही पुजली नव्हती, की त्याचे बारसेही झाले नव्हते. मात्र कष्टसायास जन्मापासून सांगाती आले होते. अमाप श्रम करून गुजराण करावी लागे. रात्रंदिवस काबाडकष्ट करावे व उदरनिर्वाह करावा, अशी स्थिती. कुस्त्यांवर चार पैसे मिळायचे, पण ते पैलवानाच्या खाण्यापिण्यालाच जायचे. त्यात नामदेव संसारी. एक मुलीचा बाप झालेला. तसा मागचा आधार आईच्या मायेखेरीज काही नाही. मुठ्याला इवलाले केंबळी घर. तेही कालाच्या प्रभावाने पुरते चंद्रमौळी बनलेले. अशा निष्कांचन माणसाने देशाभिमानाने प्रेरित होऊन स्वातंत्र्य संगरात उडी घेतली असती तर त्याच्या जीवनाचे सार्थक झाले असते की नाही, कोणास ठाऊक. मात्र एक गोष्ट निश्चित झाली असती. नामदेवाच्या संसाराला आग लागली असती व त्यात त्याच्यावर अवलंबून असलेली घरची मंडळी होरपळून निघाली असती.

नामदेव देशाभिमानाने पेटला होता. भावनेचा आवेग आवरणे त्याला अशक्य झाले होते. त्याने स्वातंत्र्य संगरात उडी घेण्याचा निर्णयही घेतला होता. तथापि अशा मोक्याच्या वेळी आईच्या रूपाने देव धावून आला आणि नामदेवाला परावृत्त केले. नामदेवाच्या आयुष्यातील सर्व घडामोडी लक्षात घेता आईने नामदेवाच्या जीवनाला फार मोठी व योग्य कलाटणी दिली असेच म्हणावे लागेल. या कलाटणीमुळे नामदेव अधिक व्यवहारी बनला. संसाराकडे अधिक लक्ष देऊ लागला. आपली शक्ती व बुद्धी आर्थिक स्थैर्य कसे प्राप्त होईल, यासाठी खर्च करू लागला. भावनेला विवेकाची जोड मिळाली. नामदेवाच्या आयुष्यात भावना व विवेक यांचा सुंदर संगम झाल्यामुळे एक प्रकारचे मनोहारित्व आले आहे. यामुळेच नामदेवास नेटका संसार करूनही देशाची अधिक चांगल्या प्रकारे सेवा करण्याची संधी प्राप्त झाली.

नामदेव आपले दुकान भले की आपण भले अशा रीतीने वागत होता. मोकळ्या वेळात गांधीजींच्या वाङमयाचे पारायण करीत होता. गांधी-वाङमयाचे विलक्षण वेड त्यास होते. नामदेवाची दैवते चार. शक्ती–युक्ती–सेवा यांचे प्रतिक असलेला हनुमान, भारतीय स्वातंत्र्याचे जनक महात्मा गांधीजी, भारताचे शिल्पकार पंडित नेहरू आणि युगपुरुष छत्रपती शिवराय ! या सर्वांच्या ठायी नामदेवाची अनन्य साधारण निष्ठा. या लोकांच्या आचार-विचारांचा पगडा नामदेवावर पडलेला. अजूनही तो तसाच आहे. या लोकांची चरित्रे वाचणे, त्यांचे किंवा त्यांच्या संबंधीचे वाङमय वाचणे यात नामदेव तल्लीन होऊन जात असे. या वाचनामुळे नामदेवाच्या अंत:करणात देशबांधवांविषयीच्या कर्तव्याचा स्फुलिंग सदैव धगधगत राहिला. त्याला चेतना मिळत गेली. परिस्थितीमुळे स्फुलिंगाचे रूपांतर ज्वालेत होऊ शकले नाही एवढेच. परिस्थिती पालटताच मात्र हा स्फुलिंग प्रफुल्ल झाला.

नामदेव नेकीने संसार करीत होता. सुखाचा संसार होण्यासाठी अधिक पैशांची गरज असते. तो अधिक पैसे मिळविण्याचा व्यवसाय धुंडाळीत होता.

आणि अकस्मात तशी संधी चालून आली. ध्यानी-मनी नसता आली. ज्या क्षेत्राशी सुतराम संबंध नाही, अशा क्षेत्रात प्रवेश करण्याची संधी आली. नियतीचा हात कोणकोणते चमत्कार घडवील याचा पत्ता लागत नाही.

त्यावेळी पुण्यामध्ये परांजपे मोटार सर्व्हिस होती. त्याचे मालक श्री. परांज
या परांजप्यांचा स्नेहसंबंध निंबाळकर तालमीतील काही निवडक मंडळीं
होता. या मित्रमंडळींनी नवीन धंदा सुरू करावयाचा बेत केला. कोणी काय सुच
विले, तर कोणी काय सुचविले, खूप खल झाला आणि शेवटी " फिरता सिनेमा
म्हणजे टुरिंग टॉकीज काढायचे ठरले. त्याकाळी ' टुरिंग टॉकीज ' हा बरकती
धंदा होता. टुरिंग टॉकीज काढण्याच्या योजनेत श्री. परांजपे, श्री. यशवंतरा
गायकवाड, श्री. बापूसाहेब गोन्हाडे, श्री. माधवराव येवले इत्यादि मंडळी होतं

विचार करता करता या मंडळींना कळून चुकले की, टुरिंग टॉकीजसा
जितके अधिक भागीदार असतील तितके चांगले. भांडवलही वाढेल व कामा
माणसेही मिळतील. होता होता सोळा भागीदार झाले. प्रत्येकाने एक हज
रुपयांचा शेअर घेतला. भांडवल जमले सोळा हजार.

मंडळी टुरिंग टॉकीजची जमवा जमव करीत असता त्यांच्या ध्यानात आ
की फक्त भांडवल असून, फिरता सिनेमा किफायतशीर होणार नाही. कष्टा
पडेल ते जोखमीचे काम पेलणारा, थिएटरच्या दरवाजावर करडी देखरेख ठे
णारा व गावोगावच्या फुकट सिनेमा पाहवयास सोकावलेल्या गुंडांना दहश
बसविणारा माणूस भागीदार असल्याशिवाय फायदेशीर धंदा होणार नाह
शिवाय खर्चातही खूप बचत केली पाहिजे. तंबू ठोकणे, उतरणे, गाड्या भर
व परगावी साहित्य नेणे हाही प्रश्न जिव्हाळ्याचा आहे.

निंबाळकर तालमीतील मंडळींच्या समोर हा विचार येताच नामदेवा
मूर्ती डोळ्यासमोर उभी राहिली. प्रामाणिकपणाने, आपुलकीने राबणा
चतुर व कर्तव्यदक्ष नामदेव पैलवान जर या भागीदारीत आला तर आपव
धंदा यशस्वी होईल असे त्यांना वाटले. त्यांनी लागलीच नामदेवाला विचार
नामदेवाने विचार केला. खूप विचार केला आणि होकार दिला.

होकार दिला खरा, पण एक हजार रुपयांचा शेअर भरावयाचा कसा
मूळ मुद्यावर गोष्ट आली. शेवटी माधवराव येवले यांनी पाचशे रुपये उस
द्यायचे कबूल केले. नामदेवाने कुस्त्या करून पानपट्टीचे दुकान विकून पाच
जमा केले आणि एक हजाराचा शेअर भरला. नामदेव टुरिंग टॉकीजचा भा

दार झाला. हा योग बापूसाहेब गोऱ्हाडे यांच्यामुळे जुळून आला. एकूण भागीदार झाले सतरा. टुरिंग टॉकीजचे नाव ठेवले ' महाराष्ट्र टुरिंग टॉकीज. '

नामदेवाने टुरिंग टॉकीजबरोबर गावोगावी फिरावे असे ठरविण्यात आले. सर्व कामाची जबाबदारीही अर्थातच नामदेवावर टाकण्यात आली. या कामासाठी पगार ठरविण्यात आला. दरमहा वीस रुपये. जेवणखाण कंपनीचे. जेऊन खाऊन वीस रुपये पगारावर राहाण्याचे नामदेवाने मान्य केले. ही रक्कम अर्थात संसारास अपुरी होती. परंतु धाडस केल्याशिवाय नशीब काढता येणार नाही, हे ओळखून नामदेवाने नशिबाची परीक्षा पाहावयाचे ठरविले.

एकोणीस नोव्हेंबर, एकोणीसशे बत्तीस रोजी कार्तिक एकादशीच्या दिवशी ' महाराष्ट्र टुरिंग टॉकीज ' ने देवाची आळंदी येथे पहिला खेळ लावून मुहूर्त केला.

नामदेवाच्या आयुष्याच्या गाडीने आणखी एकदा रूळ बदलले. या निराळ्या मार्गाने त्याच्या आयुष्याची गाडी जाऊ लागली.

महाराष्ट्र टुरिंग टॉकीजचा फिरता संसार. आज एक गाव तर दोनतीन दिवसानी दुसरा. असा क्रम सततचा. खंड पडून भागणारे नव्हते. कारण टॉकीजबरोबर आठ भागीदार होते. शिवाय आचारी, वाढपी आणि बिगारी. सुना दिवस गेला की खर्च डोक्यावर बसला. खेळ बंद राहिला म्हणून खर्च बंद थोडाच होणार ? भूक थोडीच थांबणार. खर्च नियमित होतच राहाणार. तेव्हा मिळकतही नियमित होत गेलीच पाहिजे. सुरुवातीला पुणे जिल्हा घेऊन टॉकीज कुलाब्याला गेली.

नामदेवाचे दैवत हनुमान. निष्ठेने घेतलेले काम पार पाडायचे व्रत अंगी बाणलेले, सिनेमा धंद्यात नामदेवाला त्या गुणाचा फार उपयोग झाला. तसेच पैलवानी पेशाचाही उपयोग झाला. नामदेव तंबू ठोकणे, सोडणे, मशीनरी काढणे, बसविणे, मालट्रक भरणे, डोअरकिपर म्हणून काम करणे, गुंडांवर सक्त नजर ठेवणे इत्यादि कामे मन:पूर्वक करू लागला.

नामदेवाच्या वाचनाचा व उंचापुऱ्या व प्रभावी व्यक्तिमत्वाचाही या टॉकीजला उपयोग झाला. राखावी बहुतांचि अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।। हे बोधवचन तंतोतंत जर कुठे लागू पडत असेल, तर टुरिंग टॉकीजच्या धंद्यात. परवाना

देणारे अधिकारी, गावचे पाटील, वतनदार, वजनदार लोक यांच्याशी चतुराईने वागून त्यांना खूष ठेवावे लागे. नामदेवाचे वजन या लोकांवर एकदम पडे. गोरापान, पिळदार बांध्याचा उमदा हसरा तरुण पाहून ते त्याच्याकडे पाहात राहात आणि नामदेवाच्या सौजन्यशील व चतुर बोलण्याने ते विरघळून जात. नामदेवाचा कार्यभाग अर्थातच साधला जाई. एवढेच नव्हे तर गावोगावी असल्या थोर-मोठ्या मंडळींशी सलगी होई.

गाव तिथे उकिरडा असायचाच. सज्जनांबरोबर दुर्जनही असायचेच. गावगुंड नसलेला गाव सापडायचा नाही. या गावगुंडांचा नमुना काही औरच असतो. त्यांना कायदेकानू कळत नाही असे नाही. कळतात पण ते धाब्यावर बसवून लोकांना दहशत बसविण्यात त्यांना मर्दुमकी वाटते. पौरुष वाटते. त्यांना आवरणे किंवा काबूत ठेवणे हे वाटते तितके सोपे नाही. यांच्यापुढे भले भले थकले आणि हात जोडून बाजूला झाले. गावगुंड ही अस्सल इरसाल असामी असते. या गावगुंडांना कोठेही जाण्याचा आणि काहीही करण्याचा छंद असतो. कोण त्यांना अडविणार ? अडविणारा मग अब्रूने कसा राहणार ? सिनेमा तर गावगुंडांचा आवडता करमणुकीचा प्रकार. फुकट सिनेमा पाहणे हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क. गावात सिनेमा आपण चालू देतो हा त्या सिनेमा चालकावर आपण उपकार करतो, अशी त्यांची भावना. फिरत्या सिनेमाच्या चालकांना जर कोणाची भीती वाटत असेल तर या गावगुंडांची !

परंतु महाराष्ट्र टुरिंग टॉकीज याला अपवाद होती. या टॉकीजच्या चालकांना गुंडांची भीती वाटत नव्हती. गुंडांवर जरब ठेवणारा महापुरुष टॉकीजचा चालक होता. मांत्रिकाला बघून जशी भुते भिऊन जातात, तशी नामदेव पैलवानाला बघून गावगुंड तोंड काळे करीत. नामांकित भारी पैलवान म्हणून नामदेवाचा लौकिक चोहिकडे पसरला होता. त्यामुळे नामदेव पैलवानाची टॉकीज असे समजल्याबरोबर पालीला पाहून विंचवाने नांगी टाकावी तशी अवस्था गावगुंडांची होई. ते टॉकीजकडे त्रास देण्यासाठी यायला धजत नसत. व्यक्तिमत्त्वाचा, बलोपासनेचा प्रभाव हा ! संरक्षणाचा पाया बलोपासना आहे. निर्बलाला कुणीही छेडावे. नामदेवाने जी बलोपासना केली त्याचा फायदा टॉकीजला झाला. धंदा सुरळीत चालू लागला. बरकत येत चालली.

नामदेवाच्या दाबातच गावगुंड दबले जायचे. असे असले तरी नामदेव या गुंडांशी कधी अरेरावीने वागला नाही. तो त्यांच्याशी सौजन्याने वागे. त्यांच्याशी वागताना आपले व्यवहारचातुर्य पणास लावी. कोणाचीही हेटाळणी न करता, कोणालाही दमदाटी न देता, कोणालाही सहसा न दुखविता तो गोड बोलून आपला कार्यभाग साधी. त्यामुळे या गावगुंडांपासून ते गावप्रमुखांपर्यंत सर्वजण नामदेवाची वाखाणणी करीत. त्याच्याशी सलगी ठेवण्याचा प्रयत्न करीत. हे लोक नामदेव पैलवानास नामदेवराव म्हणत. नामदेवाचा नामदेवराव या लोकांनीच केला.

सिनेमाचा हा फिरता प्रपंच डोक्यावर घेऊन मजल दरमजल करीत नामदेवराव दोन वर्षेपर्यंत पुणे जिल्ह्यातून कुलाबा जिल्ह्यात, तिथून अहमदनगर जिल्ह्यात फिरले आणि मग १९३४ साली खानदेशाकडे मोर्चा वळविला व धुळे जिल्ह्यात निशाण रोवले.

खानदेश ही संपन्न भूमी. लोक दिलदार व रसिक. सिनेमाचे शौकी. सिनेमा पाहायला गाव लोटायचे. एके एके ठिकाणी चार चार महिने मुक्काम पडायचा. पैसाही खूप मिळायचा. सदा थिएटर गच्च भरलेले असायचे.

१९३२ ते १९३४ या दोन वर्षांच्या जमाखर्चाचा आढावा भागीदारांनी घेतला. फायदा चांगलाच झाला होता. परंतु तो फार लोकांत विभागला जात होता. प्रत्येकाच्या वाट्याला थोडा थोडा येत होता. एक टॉकीज कमावणार, खर्चवेच वजा जाता जो फायदा उरणार तो सतराजण वाटून घेणार! एका टॉकीजच्या जिवावर सतराजण जगणार! खानदेशात टॉकीजला भरमसाट फायदा होत होता. एक एका गावी महिना महिना, दोन दोन महिने, चार चार महिने टॉकीज चालत असे. तेव्हा या संधीचा फायदा घेण्याच्या व भागीदारांना जास्त फायदा मिळविण्याच्या इराद्याने भागीदारांनी निर्णय घेतला—'दोन टुरिंग टॉकीज करावयाच्या! भागीदारांचे दोन विभाग करायचे आणि प्रत्येक विभागाने आपली टुरिंग टॉकीज चालवायची!"

खानदेशात पैसा अमाप मिळत होता. मग निर्णय अंमलात आणायला उशीर कसला? एकाच्या दोन टॉकीज झाल्या. खानदेशात दोन्ही टॉकीज संचार करू लागल्या. पाण्यासारखा पैसा मिळू लागल्या. दोन वर्षे खानदेशात मुक्काम ठोकला. पैसाच पैसा मिळाला.

पैसा हा वाईट आहे. वास्तविक तो वाईट असण्याचे कारण नाही. पैशा-शिवाय पानही हालत नाही. असे ज्याला जगात स्थान व मान तो पैसा वाईट कसा असेल ? विचार करता पैसा वाईट नाही. तो चांगलाच आहे. तो बिचारा सारखा झिजत असतो. लोकांच्या उपयोगी पडण्यासाठी अक्षरश: झिजत असतो. इतका झिजतो की शेवटी तो चालत नाही ! मग पैसा वाईट कसा ? नाही, नाही, पैसा मुळीच वाईट नाही. पैसेवाला वाईट आहे ! माणसाला पैसा मिळाला की त्याची सांपत्तिक स्थिती सुधारते आणि त्याची बुद्धी मात्र सुधा-रायच्या ऐवजी चळते. सर्वांच्या बाबतीत असे घडते असे नव्हे. अपवाद असतातच. पैशामुळे माणसाला एक प्रकारची धुंदी येते. त्या धुंदीचे पर्यवसान अंदाधुंदीत होते. दुसऱ्यास तुच्छ लेखण्यात होते. म्हणून शाहणेसुरते, साधुसंत म्हणतात, पैसा कलहकारी आहे.

महाराष्ट्र टुरिंग टॉकीजच्या भागीदारांत मतभेद झाले. ते वाढत चालले. शेवटी असल्या झंझटात व कचाकचीत राहण्यापेक्षा बाहेर पडलेले बरे, असे ठरवून जे भागीदार बाहेर पडले त्यात नामदेवराव होते.

१९३२ ते १९३६ च्या अवधीत नामदेवरावांनी फिरत्या सिनेमाची धुरा मोठ्या हिंमतीने व कौशल्याने पेलली. महाराष्ट्र टुरिंग टॉकीज ही कंपनी १९३६ साली फुटली. परंतु नामदेवरावांनी चार वर्षांत जो या धंद्याचा अनुभव मिळविला होता, तो मात्र चांगलाच रुजला व यथावकाश उगवला. तो काही वाया गेला नाही.

नामदेवरावांना विविध स्वभावाचे मानवी नमुने पाहायला मिळाले. नुसते पाहायला नाही, तर हाताळायला ! कारण या ना त्या निमित्ताने लोकांशी प्रसंग यायचा. तेव्हा वेगवेगळ्या तऱ्हेच्या लोकांशी कसे वागावे याचे अनुभव-सिद्ध ज्ञान नामदेवरावांना प्राप्त झाले. हा सर्वात मोठा लाभ झाला. माणसे कशी हाताळावीत, याचे कौशल्य अशा वेळी नामदेवराव शिकले. पुढील आयुष्यात ते फार उपयोगी पडले. सुष्ट-दुष्ट प्रवृत्तींना काबूत ठेवण्याची कला प्राप्त होणे हे एक वरदानच मानले पाहिजे. टुरिंग टॉकीजच्या निमित्ताने दैवाने हे वरदान नामदेवरावांना दिले.

. . . ६

महाराष्ट्र टुरिंग टॉकीजच्या भागीदारांत वादंग माजले. नामदेवरावांना मन:स्वी वाईट वाटले. अहोरात्र राबून उजगारीला आणलेल्या धंद्यात पैशाचा ओघ सुरू झाल्याबरोबर कलीने प्रवेश केला. नामदेवरावांना या सगळ्या गोष्टींचा वीट आला. त्यांनी एक घाव दोन तुकडे या न्यायाने आपली वाटणी घेतली व भागीदारी संपुष्टात आणली.

१९३२ ते १९३६ ही चारपाच वर्षे फिरण्यात, राबण्यात, धंद्याचा जम बसविण्यात गेली खरी. परंतु याच काळात नामदेवरावांची आर्थिक स्थिती सुधारत गेली. हातात पैसा खेळू लागला.

पैसा मिळू लागल्याबरोबर जर नामदेवरावांनी कोणती गोष्ट केली असेल तर मुठचाचे आपले घर दुरुस्त करण्याची व आईला मुंबईहून गावी आणून ठेवण्याची. आईवर नामदेवरावांचे जिवापलीकडे प्रेम ! आईने मोलमजुरी करून त्यांना वाढविले होते. पोरकेपण भासू दिले नव्हते. लाचारपणाची बाधा लागू दिली नव्हती. आईने हलकी सलकी कामे केली, घाम गाळला आणि नामदेवाला पैलवान केला होता. आईने खाल्लेल्या खस्तांची जाणीव नामदेवरावांना होती. म्हणून तर आईच्या आठवणीसरशी त्यांचे अंत:करण भरून येते. डोळे पाणावतात. आई ती आईच. आईची माया ती आईची माया. तिला दुनियेत तुलना नाही. नामदेवरावांनी आईला मुठचाला स्वत:च्या घरात आणून ठेवले. धंद्यात पैसे मिळू लागल्याबरोबर आईला गावी आणले. ती बिचारी आता म्हातारी झाली होती. दम्याचा विकारही जडला होता. काम होत नव्हते, तरी पण ती करीत होती. आता तिचा नामा पुरेसे पैसे मिळवू लागला होता. नामाने तात्काळ आईला कामाच्या व्यापातून मोकळे केले. ज्या गावातून रातोरात बाहेर पडावे लागले होते, त्याच आपल्या गावात मानाने बाई आली. तिला फार आनंद झाला.

त्यानंतर गावातील वाण्याचे घर विक्रीला निघाले. नामदेवरावांनी ते साडेतीनशे रुपयांना घेतले. जुनाट घर. पडायला झालेले पाडून टाकले व छानपैकी दुमजली घर बांधले. माडीवर झोपाळा बांधला. आईसह या नव्या घरात प्रवेश केला आणि नामदेवरावांनी प्रथम कोणती गोष्ट केली असेल तर ती म्हणजे आपल्या आईला झोपाळ्यावर बसविले व स्वत: झोके दिले. मायलेकाच्या

भावना उचंबळून आल्या. दोघांच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहू लागल्या. नामदेवरावाची आईवरील नितांत भक्ती पाहून गावकरी देखील गहिवरले. त्यांनी नामदेवरावाचे कौतुक केले.

नव्या घरात चिमाबाई वर्षभर राहिल्या. साठीचे वय. दम्याचा विकार. थकला भागला जीव. कष्टाचे सार्थक झाल्याचे माऊलीने पाहिले. मुले रंगा-रूपाला आलेली पाहिली. ती रांगेला लागलेली पाहिली. तिला समाधान वाटले आणि तिने त्याच समाधानात एक दिवस इहलोकीची यात्रा संपविली.

आईच्या देहांताच्या वेळी नामदेवराव आईजवळ होते. ते ओक्साबोक्शी रडले. आईच्या आठवणींनी त्यांना बेचैन केले. नामदेवरावाच्या शिरावरील वात्सल्याचे छत्र कायमचे गेले.

नामदेवरावांनी शोक आवरला. आईचे क्रियाकर्म यथासांग केले. तेराव्या दिवशी साऱ्याच गावाला जेवण घातले. ज्या उभ्या गावाला चिमाबाई घासभर अन्नाला महाग झाली होती, त्याच उभ्या गावात त्या माऊलीच्या तेराव्याला पोटभर जेवायला घातले. काळाची करणी अगाध आहे, हेच खरे !

## प्रकरण १२ वे

नामदेवरावांनी महाराष्ट्र टुरिंग टॉकीजची भागीदारी सोडली आणि वसई गाठली. काही तरी उद्योग धंदा केला पाहिजे ना ? वसईला परांजपे यांची टुरिंग टॉकीज होती. ती चौघांनी विकत घतली. वसईला एक वर्ष व्यवसाय केला. दुसऱ्या टुरिंग टॉकीज भिवंडीला गेली.

वसई हे फिरत्या सिनेमाचे फायदेशीर केंद्र होते. तिथे मोहोळ–परांजपे यांनी तळ दिला. तिथे त्यांनी टुरिंग टॉकीज सुरू केली. नामदेवराव नेहमीप्रमाणे खूप राबत होते. कुशलतेने कारभार करीत होते. लोकांशी मनमिळाऊपणाने वागत होते ते स्वत: वसईत लोकप्रियझाले होते व त्यांचा धंदाही जोरात चालला होता. १९३८ साली प्रख्यात सिनेव्यवसायी श्री. बाबुराव पै यांनी वसईला पक्के थिएटरबांधायचे ठरविले. बांधकामास सुरुवात झाली. बाबुरावांना बांधकामावर देखरेख करता येणे शक्य नव्हते. त्यांना दक्षतेने देखरेख करणारा इसम हवा होता. बाबुराव चतुर व व्यवहारी. त्यांच्या नजरेतून नामदेवराव मोहोळ सुटले नाहीत. नामदेवरावांची चिकाटी, कष्टाळूवृत्ती, नेकी व काम करून घेण्याची

हातोटी त्यांना पसंत होती. त्यांनी नामदेवरावाकडे शब्द टाकला. नामदेव-रावांनी तो खाली पडू दिला नाही. झाले, नामदेवरावांच्या देखरेखीखाली वसईच्या थिएटरचे बांधकाम सुरू झाले. नामदेवराव दिल्या शब्दाला जाग-णारा मर्द माणूस ! ते आपल्या टॉकीजबरोबर भिवंडीला गेले नाहीत. ते वसई-लाच राहिले. थिएटरच्या बांधकामावर देखरेख करू लागले. इतक्या तन्मयतेने ते देखरेख करीत, इतक्या बारीक सारीक गोष्टीत ते लक्षपूर्वक पाहात की जणू ते स्वतःचेच थिएटर बांधीत आहेत.

नामदेवरावांच्या सचोटी, चिकाटी व कामाची हातोटी इत्यादि गुणांचा बाबुराव पै यांना थिएटरच्या बांधकामामुळे अनुभव आला. बाबुराव नामदेव-रावांचे चाहते बनले. हा योग परांजपे यांच्यामुळे घडून आला.

थिएटर बांधून तयार झाले. नाव ठेवले " प्रभात. " हे प्रभात टॉकीज बाबुराव पै वसईला येऊन चालविणार नव्हते. ते त्यांना शक्यही नव्हते. जबाब-दार व प्रामाणिक इसमांकडे ते चालवावयास द्यावयाचे होते. बाबुरावांच्या मनात परांजपे–मोहोळ यांचा विचार आला. त्यांनी तसे विचारताच दोघांना सांगितले, " आपल्या इच्छेच्या बाहेर आम्ही नाही. " परांजपे–मोहोळ यांनी बाबुराव पै यांजकडून थिएटर चालवावयाला घेतले. नामदेवराव मोहोळ व दत्तोपंत परांजपे पक्क्या थिएटरचे चालक बनले. पक्क्या थिएटरच्या रूपाने त्यांच्या सिनेमा धंद्यातील स्थैर्याला सुरुवात झाली. गावोगावची भटकंती संपली. नामदेवराव वसईकर बनले. मुठ्या खोऱ्यातील मुठ्याचे नामदेवराव वसईकर झाले असले तरी तिकडची ओढ कमी झाली नव्हती. आपला गाव, आपला भाग, यासंबंधीचा जिव्हाळा काही वेगळाच असतो. मुठाखोरे हे नामदेवरावांचे खोरे. तिकडील सर्व मंडळी संबंधीत. तिकडच्या मंडळींना नामदेवरावांच्या कर्तृत्वाबद्दल अभिमान वाटायचा. नामदेवरावांच्या वागणुकीने व आपुलकीने ती मंडळी भारून गेली होती.

त्यावेळी भोर संस्थान होते. मुठोखोरे हा संस्थानी मुलूख. खालसा हद्दीत राजकीय आंदोलन जोसात होते. संस्थानांनाही त्याची झळ पोहोचली होती.

संस्थानातून प्रजासभा, प्रजापरिषदा स्थापन झाल्या होत्या. त्यांनी लोक-जागृती केली होती. राजकीय हक्कांसाठी चळवळी चालल्या होत्या. राजाने एकतंत्री कारभार करण्याचे दिवस संपत आले होते. प्रजातंत्राने राज्यकारभार चालवावा अशी त्यांची मागणी होती. तसे दडपण दिवसेंदिवस वाढत चालले होते. राजांनीही काळाची पावले ओळखली होती.

भोर संस्थानातही प्रजासभा चळवळ करीत होती. प्रजासभेचे सूत्रधार होते शेटे व पोतनीस. चळवळीच्या वाढत्या दडपणामुळे संस्थानिक हैराण झाले होते. चळवळ दडपण्यासाठी ब्रिटिशांच्या पावलांवर पाऊल टाकून पाशवी मार्गाचा अवलंब संस्थानिक करीत होते. लाठीहल्ला, जमावावर घोडे घालणे असले प्रकार चालले होते. अटकेचे सत्र सुरू होतेच, पण जनता दाद देत नव्हती. भीत नव्हती. ती उलट दुप्पट जोराने उसळी मारून जोमाने चळवळ करीत होती. फोडा व झोडा या भेदनीतीचा अवलंब राजे लोक करीत होते. जे लोक भेदे ठरत होते, त्यांना लोक वाळीत टाकीत होते. त्यांची कोंडी करीत होते. राजे लोकांनी चळवळ दडपण्यासाठी नाना युक्त्या, नाना क्लृप्त्या काढून केलेली वळवळ कुचकामी ठरत होती.

शेवटी चाणाक्षपणे अधिकाराचा तुकडा लोकांच्या तोंडावर टाकून आपली सत्ता कायम ठेवण्याचा धूर्त डाव संस्थानिक खळत होते. त्यांपैकी एक डाव म्हणजे लोकनियुक्त कायदेमंडळामार्फत संस्थानचा कारभार चालविण्याचा देखावा हा होय.

भोरच्या अधिपतींनी १९४० साली लोकनियुक्त कायदेमंडळामार्फत संस्था-नचा कारभार चालविण्याची घोषणा केली. अर्थात निवडणुका घेणे आलेच. निवडणुकीसाठी विभाग पाडण्यात आले. प्रजासभेच्या नेत्यांनी निवडणूक लढविण्यासाठी व ती जिंकण्यासाठी कंबर कसली. हमखास निवडून येणारे उमेदवार उभे केले पाहिजेत. निवडणुकीत अडचणी फार. लोक अडाणी. भाग डोंगराळ. अनेक गावांतून प्राथमिक शाळाही नव्हत्या. मग शिक्षित माणसे असणार कोठून ? दारिद्रय तर कमालीचे. अशा स्थितीत उमेदवार शोधणे ही सोपी गोष्ट नव्हती. कायदेमंडळात येणारा उमेदवार कच्च्या दिलाचा

असता कामा नये. सामना धूर्त संस्थानिकांशी द्यायचा होता. सत्ता टिकविण्यासाठी त्यांची धडपड चालणारच. कावेबाजपणा ते करणारच. साहजिकच होते ते. सहजासहजी शेकडों वर्षे भोगलेली सत्ता कोण जाऊ देईल ?

भोरच्या परिसरातील कोंढूर, मुठाखोरे व कोळवणखोरे असा एक मतदार संघ होता. या मतदार संघातून कोणास निवडणुकीस उभे करावे, असा पेच पडला. खूप विचारविनिमय झाला. शेवटी कार्यकर्त्यांच्या बैठकीत निर्णय घेतला. " नामदेवराव मोहोळ यांना या विभागातून उभे करावे. "

निर्णय झाला खरा, परंतु नामदेवराव दूर वसईला. वसईकर बनलेले. बाबुराव रायरीकर हे कार्यकर्ते होते. त्यांनी नामदेवरावांना गाठले. सारी स्थिती सांगितली व उमेदवार म्हणून उभे राहण्याचा आग्रह केला.

नामदेवराव आपल्या व्यवसायात मग्न झाले होते. तथापि राजकीय आकर्षण कमी झाले नव्हते. परिस्थितीमुळे ते राजकीय आंदोलनापासून बाजूस राहिले होते. ही चालून आलेली संधी नामदेवरावांनी दवडली नाही. त्यांनी होकार दिला. नामदेवराव निवडणुकीत प्रजासभेचे उमेदवार म्हणून उभे राहिले. त्यांच्या देहस्वभावाप्रमाणे त्यांनी कोंढूर, मुठाखोरे व कोळवण खोरे या आपल्या मतदार संघात दौरा काढला. प्रत्येक गावात ते गेले. गावकऱ्यांना जमवून त्यांच्याशी चर्चा केली. भाषणे दिली. भाषणे देण्याचे बाळकडू नामदेवरावांना या डोंगराळ भागातूनच मिळाले. नामदेवरावांची आत्मीयता व सरळपणा यांचा प्रभाव लोकांवर पडला. त्यांनी प्रचंड बहुमताने नामदेवरावांना निवडून दिले आणि नामदेवरावांनी राजकीय जीवनात प्रवेश केला. बाबुराव रायरीकर यांनी यावेळी अतिशय कष्ट घेतले.

भोर कायदेमंडळात असताना नामदेवरावांनी खूप काम केले. लोकांची रास्त बाजू उचलून धरली. विरोधकांचे डावपेच चतुराईने उधळून लावले. हे सारे करीत असता अघोरी उपायांचा अवलंब मात्र त्यांनी कधी केला नाही. नामदेवराव पट्टीचे लढवय्ये. कुस्तीची मैदाने त्यांनी गाजविली, तशीच राजकीय मैदानातही जिद्दीने लढत दिली. लढत देत असताना आक्रस्ताळीपणा त्यांनी कधी केला नाही. शांतपणे जे करावयाचे ते करावयाचे. कटुता निर्माण

होऊ द्यायची नाही. माणसे दुखवायची नाहीत. व्यवहारात मिळालेला अनुभव त्यांना राजकीय जीवनातही उपयोगी पडला. ते माणसे जोडतात, तोडत नाहीत. यशाच्या गर्वाने फुगून जात नाहीत. त्यांचा बोलण्या–चालण्यात, वागवागणुकीत कधी तोल जात नाही. समतोलपणा हे त्यांच्या जीवनाचे मर्म आहे. यशाचे मूळ आहे.

या सर्वांचा परिणाम असा झाला की प्रजा परिषदेने जी भोर कायदेमंडळाची दुसरी निवडणूक लढविली, त्यासाठी नामदेवरावांना एकमताने उमेदवार म्हणून निवडण्यात आले आणि मतदारांनीही आपल्या उमेदवारास भरघोस पाठिंबा दिला. हीही निवडणूक नामदेवरावांनी जिंकली. राजकीय आखाड्यात ते कुस्त्या मारू लागले. त्याही क्षेत्रात ते पायरी–पायरीने वर चढू लागले.

आपल्या मतदार संघात त्यांनी संघटनेचे व जागृतीचे मनात भरण्याजोगे कार्य केले. चिकाटीने व ध्येयवादीपणाने काम करीत राहायचे हा त्यांचा बाणा. फारसा गाजावाजा न करता काम तडीस नेणे त्यांना आवडते. ते एक प्रकारे प्रसिद्धीपराङ्मुखच आहेत. पुष्कळ वेळा असे दिसून येते की, एखाद्या गोष्टीचा गाजावाजा वर्तमानपत्री प्रसिद्धी फार होते आणि मुळात मात्र त्या गोष्टीचा फारसा पत्ता नसतो. डोंगराएवढी प्रसिद्धी आणि उंदराएवढे काम ! याचा अर्थ असा नव्हे की कामाला प्रसिद्धी मिळू नये, मिळावी नव्हे मिळालीच पाहिजे. आजचे युग प्रसिद्धीचे आहे. एका ठिकाणच्या कामाचा दुसऱ्या ठिकाणच्या लोकांना मार्गदर्शक म्हणून उपयोग होतो. परंतु प्रसिद्धी अवास्तव नसावी.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि १९४८ साली भारताचे पोलादी पुरुष सरदार पटेल यांच्या खंबीर धोरणामुळे व कुशल कारवाईमुळे भारताच्या नकाशावरील सहाशेवर असलेले संस्थानी पिवळे ठिपके नाहीसे झाले. संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली. भोर संस्थान पुणे जिल्ह्याचा भाग बनले. नामदेवरावांचा मतदारसंघ मुळशी तालुक्यात समाविष्ट झाला. साहजिकच मुळशी तालुका काँग्रेस कमिटीत नामदेवरावांना क्रियाशील, धडाडीचा कार्यकर्ता म्हणून मानाचे स्थान मिळाले.

१९३६ साली नामदेवराव वसईला आले. ते तेथेच राहिले. १९३९ साली त्यांनी प्रभात थिएटर चालवायला घेतले. ते पुरते वसईकर बनले. १९४८ पर्यंत

ते वसईतच राहिले. गावाकडच्या राजकीय घडामोडींकडे त्यांचे लक्ष होते. त्यांत ते भागही घेत होते. भोर कायदेमंडळात ते एकदा नव्हे तर दोनदा निवडूनही आले. याचा अर्थ नामदेवराव पुण्याकडील राजकारणात केवळ भाग घेत होते, असा नव्हे. ते वसईच्या राजकारणातही ओढले जात होते. " पानी तेरा रंग कैसा ? जिसमें मिलावे वैसा । " नामदेवरावांची गत तीच. ते वसईत राहिले. वसईकर बनले. तो भाग त्यांनी आपला मानला. तेथील वातावरणाशी ते समरस झाले. तेथील राजकारणात ते ओढले गेले. वाचनामुळे व प्रत्यक्ष चळवळ पाहिल्यामुळे राजकारणात पडण्याची त्यांच्या ठिकाणी जी ऊर्मी निर्माण झाली होती, ती वारंवार उचंबळत होती. आईच्या मायेच्या दडपणामुळे आणि आर्थिक स्थितीचा विचार करून दाखविलेल्या संयमामुळे ही ऊर्मी उग्र रूप धारण करू शकत नव्हती. चर्चा करणे, प्रसार करणे यापुरते त्यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य मर्यादित झाले होते. त्याला आता वाट मिळण्याची वेळ येऊन ठेपली होती. राजकारणाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारातही त्यांनी लक्ष देण्यास सुरुवात केली.

नामदेवराव सुरुवातीपासूनच काँग्रेसचे भक्त. त्यांची निष्ठा कधी ढळली नाही. वसईला देखील त्यांनी काँग्रेसचा प्रचार प्रामाणिकपणाने करण्यास सुरुवात केली. वसईचे राजकारण तसे म्हटले असता कुबट झाले होते. विरोधी पक्ष प्रबळ झाला होता. नामदेवरावांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. संघटनेतील शैथिल्य घालविण्याचा प्रयत्न केला. नव्या विचारांची, नव्या दमाची माणसे संघटनेत आणली. त्यांना सूत्रधार केले. पदाधिकारी केले, आपण मात्र अधिकारांच्या जागांपासून ते अलिप्त राहिले. हे नामदेवरावांचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ते लोकांत अधिक मान्यता पावतात, लोकादरास पात्र होतात आणि मग लोक आपणहून त्यांना मान देतात, मानाची जागा देतात. नामदेवराव परके असूनदेखील वसई तालुका काँग्रेस कमिटीमध्ये आणि ठाणे जिल्हा काँग्रेस कमिटीमध्ये पदाधिकारी झाले. एकंदर शिक्षण व आर्थिक स्थिती लक्षात घेता वसईसारख्या कोकणातील मुरब्बी गावी घाटावरील नामदेवरावांनी आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात जे बस्तान बसविले ते त्यांच्या कर्तृत्वाची निशाणीच समजली पाहिजे.

वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ देशभर फार जोरात चालली होती. सत्याग्रहात भाग घेण्यासाठी तडफदार ध्येयनिष्ठ लोक नावे दाखल करीत होती. नामदेवरावांना स्वस्थ वसवेना. सत्याग्रहात नाव दाखल करण्याची त्यांना अनिवार इच्छा होती. पुण्यात असताना त्यांनी पूर्वी एकदा नाव दाखल केले होते. परंतु त्यावेळी आईच्या आग्रहामुळे त्यांनी ते मागे घेतले होते. आता आईच्या मायेच्या पाशातून ते मोकळे झाले होते. तिला दिलेले वचन त्यांनी तंतोतंत पाळले होते. आईला दिलेल्या वचनातून ते मुक्त झाले होते. सत्याग्रह करायला ते मोकळे होते. त्यांनी १९४० साली वैयक्तिक सत्याग्रहात नाव दाखल केले. वसई तालुका कॉंग्रेस कमिटीची सूत्रे हाती घेतली. तोच वैयक्तिक सत्याग्रह थांबला. सत्याग्रह करण्याची नामदेवरावांची इच्छा अपूर्ण राहिली.

पुढे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील निर्णायक कसोटीचे १९४२ साल उगवले. भारताच्या प्रवेशद्वारात–मुंबईत भारतीय पुढाऱ्यांची बैठक भरली. महात्माजींनी ब्रिटिशांना उद्देशून "चले-जाव"ची घोषणा केली. साऱ्या भारतभर अभूतपूर्व अशी रणधुमाळी माजली. जाळपोळीचे असंख्य प्रकार घडू लागले, वाहतुक विस्कळीत झाली, आगगाडीच्या रुळांच्या फिश-प्लेटस् काढून टाकल्या गेल्या, तारायंत्रांच्या तारा तोडल्या गेल्या. सरकारविरुद्ध जनतेचा असंतोष शिगेला पोहोचला. ब्रिटिशांचा राज्यकारभार लुळा पडू लागला. संत्रस्त झालेल्या सरकारने ८ ऑगस्टला धरपकड सुरू केली. नामदेवराव त्यावेळी मुंबईला आले होते. बैठकीत काय आदेश मिळतो, याची ते वाट पाहात होते. आदेश मिळताच जनतेने जो प्रलय मांडला, त्यात नामदेवराव सामील झाले. त्यांच्यावर पकड वॉरंट निघाले. ते भूमिगत झाले. मुंबईहून ते निसटले आणि पुण्यास आले. पोलीस मागावर होते. त्यांना वाटले, नामदेवराव वसईला गेले. वसईला त्यांनी कसून शोध चालविला. पण नामदेवराव पोलिसांना झुकांडी देऊन पुण्याला आले होते.

काही दिवसांनंतर नानासाहेब कुंटे वगैरे भूमिगत कार्यकर्त्यांनी मुंबईला गुप्त बैठक घेतली. नामदेवराव बैठकीला हजर राहिले. बैठकीत भूमिगताच्या मदतीसाठी फंड गोळा करण्याचे ठरविण्यात आले. रात्रीच्या गाडीने गुपचूपपणे नामदेवराव वसईला गेले. पोलीस पाळतीवर होतेच. त्यांनी सावज बरोबर

हेरले. नामदेवरावांना अटक केली व ठाण्याच्या जेलमध्ये स्थानबद्ध करण्यात आले. थोड्या दिवसांनंतर त्यांना वरळी जेलमध्ये हलविण्यात आले.

नामदेवरावांच्या अटकेमुळे त्यांच्या पत्नीच्या मनावर फार मोठा आघात झाला. चारपाच मुलांचा संसार. कर्ता पुरुष तुरुंगात गेलेला. कधी घडले नव्हते असे घडलेले. कधी पाहिले नव्हते ते पाहण्याचे नशिबी आलेले. छळाच्या ऐकीव वातम्यांनी विचारीचे मन गांगरून गेले. ती झुरणीला लागली. दिवसेंदिवस खचत चालली. औपधांचा काही उपयोग होईना. शारीरिक रोगावर औषधांचा उपयोग होऊ शकतो, मानसिक रोगावर नाही. जानकीबाईंचा रोग मानसिक होता. औषधांचा उपयोग होत नव्हता. त्या खंगत चालल्या होत्या. क्षयावर जाण्याचे लक्षण दिसत होते.

नामदेवरावांना पत्नीची ही अवस्था कळली. ते बेचैन झाले. तिला पाहण्याची उत्कंठा त्यांना लागली, पण राजबंदी ते. त्यांना भेटण्याची सवलत कोण देणार ? अडचण आली की त्यातून मार्ग निघतो. त्याप्रमाणे नामदेवरावांनी या अडचणीतून मार्ग काढला. त्यांची दाढ एकाएकी दुखू लागली. ठणका मारू लागल्या. दाढेत चांदी भरल्याशिवाय गत्यंतर नाही, असे त्यांनी सांगितले. दाढेत चांदी भरण्याचे निमित्त करून ते डॉक्टरकडे आले. तिथे त्यांची पत्नी अगोदरच आली होती. तशी योजनाच करण्यात आली होती. पत्नीची खालावलेली प्रकृती पाहून नामदेवरावांना मनःस्वी वाईट वाटले. पत्नीच्या डोळ्याचे पाणी खळत नव्हते. पत्नीने निक्षून सांगितले, " तुम्ही जर लवकर सुटून आला नाहीत तर मी काही जगणार नाही. तुमची माझी ही शेवटची भेट. " पत्नीचे हे निर्वाणीचे उद्‌गार ऐकून नामदेवरावांचे अंतःकरण पिळवटून निघाले. त्यांनी आजारी पत्नीला औषधपाणी करण्यासाठी पॅरोलवर सोडण्यासाठी सरकारकडे अर्ज केला. सरकारने त्यांना कळविले, " राजकारणात भाग घेणार नाही, असे कबूल करीत असाल तर करू सुटका. "

नामदेवरावांनी तशाही अवस्थेत " ते कदापिही शक्य नाही " असे कळविले. सरकारने नामदेवरावांना फक्त पंधरा दिवस पॅरोलवर सोडले.

एक वर्षाची शिक्षा भोगून नामदेवराव बाहेर पडले. वसईला राहून थिएटर चालविणे व राजकीय उलाढाल्या करणे यात ते गुंग झाले. १९४४ साल उजाडले.

थिएटरमधील त्यांचे भागीदार श्री. परांजपे यांना नामदेवरावांनी राजकीय चळवळीत घेतलेला भाग आवडला नाही. नामदेवरावांच्यामुळे प्रभात टॉकीजमागे पोलिसांचा ससेमिरा लागला होता. धंद्याच्या दृष्टीने पोलिसांचे हे लचांड चांगले नाही, असे परांजप्यांना वाटे. नामदेवरावांना ते त्याबद्दल दोषही देत होते व चळवळीतून अंग काढून घेण्यास सांगतही होते. नामदेवरावांच्या मनावर चळवळीची जबरदस्त पकड बसल्यामुळे ते चळवळीशी संबंध तोडायला तयार नव्हते. त्यांनी चक्क परांजप्यांना सांगितले, "मी जातो लोकउठाव करायला. तुम्हीच चालवा हे थिएटर. भागीदारीचे मला दहा हजार रुपये द्या म्हणजे झाले." परांजपे म्हणाले, "दहा हजार ही काही योग्य रक्कम नाही, योग्य रक्कम आठ हजार आहे. आठ हजार तुम्ही मला द्या नि थिएटर तुमच्या-कडे घ्या किंवा मी तुम्हांला देतो व थिएटर मी घेतो."

योगायोग मोठा विचित्र, त्या दिवशी वसईतील एक मित्र नामदेवरावांना भेटला. त्याने नामदेवरावांना खिन्नतेचे कारण विचारले. जे घडले होते ते नामदेवरावांनी सांगितले. तेव्हा तो मित्र म्हणाला, "एवढंच ना, काही काळजी करू नका. मी देतो आठ हजार रुपये उसने. घ्या ते थिएटर. लक्ष्मी आहे ती लक्ष्मी !"

परांजप्यांना नामदेवरावांनी आठ हजार रुपये दिले व त्यांची भागीदारी तोडून टाकली. वसईच्या प्रभात टॉकीजचे एकमेव संचालक नामदेवराव झाले.

डोक्यावर कर्जाचा डोंगर असल्यामुळे आणि सबंध व्यवहार तोंडी असल्यामुळे लवकरात लवकर मित्राची घेतलेली रक्कम देऊन टाकणे नामदेवरावांना जरुरीचे वाटले. ते धंद्याशी एकाग्र झाले. सर्व काम एकटेच करू लागले. ऑपरेटिंग, फिल्मबुकिंग, अकाऊंट ताब्यात घेणे इत्यादि कामे ते स्वतःच पाहू लागले.

धंद्यात खूप फायदा होऊ लागला. मित्राची घेतलेली उसनवार रक्कम कृतज्ञतापूर्वक परत केली. चार पैसे गाठीशी झाले. दिवसेंदिवस त्यात भर पडत चालली.

बाबुराव पै यांच्या कार्याचा व्याप मोठा. त्यांनी काही कारणामुळे वसईचे प्रभात थिएटर विकून टाकायचे ठरविले. नामदेवरावांनी त्या थिएटरसाठी

घेतलेले कष्ट, धंद्यात बसविलेला जम आणि चालवावाबयाला दिलेल्या थिएटरचे कराराप्रमाणे दिलेले वक्तशीर पैसे इत्यादि सर्व गोष्टी लक्षात घेऊन बाबुराव पै यांनी नामदेवरावांना थिएटर विक्रीचा मानस सांगितला व तुम्हीच ते घ्यावे, अशी माझी इच्छा आहे, असेही सांगितले.

नामदेवरावांच्या मनात ही लक्ष्मी सोडायची नव्हती. परंतु थिएटर विकत घेण्याइतकी त्यांच्याजवळ रक्कमही नव्हती. बाबुराव पै यांनी खूप सवलतीच्या दरात थिएटर देण्याचे मान्य केले. यावेळी श्री. गोडसे नामदेवरावांच्या मदतीला आले. त्यांनी पंचवीस हजार रुपये कर्ज देण्याचे कबूल केले. बाकीची रक्कम नामदेवरावांनी पदरची घालून बाबुराव पै यांचेकडून प्रभात थिएटर खरेदी घेतले. नामदेवराव थिएटरचे मालक झाले. १९४६ सालची ही घटना.

मालक झाले हे खरे, पण डोक्यावर हिमालयाएवढचा कर्जाचा डोंगर होता. नामदेवराव खरे हिंमतबाज. कर्जाच्या बोजाने ते गडबडले नाहीत की गडगडले नाहीत. रात्रंदिवस धंद्याच्या बरकतीसाठी राबले. अगदी मनःपूर्वक राबले आणि अवघ्या दोन वर्षांत दिला कर्जाचा बोजा उडवून.

थिएटरच्या धंद्यातले मर्म नामदेवरावांच्या चांगलेच ध्यानी आले होते. दुसरे एखादे थिएटर कुठे तरी उभे करावे, अशातऱ्हेचे विचार त्यांच्या मनात घोळत होते. नवीन थिएटर बांधण्याच्या दृष्टीने गोरेगाव किफायतशीर होईल, असे त्यांना वाटले. गणपतराव वर्तक हे नामदेवरावांचे एक स्नेही. ते नामदेवरावांना नेहमी म्हणायचे, " वसईशिवाय अन्य ठिकाणी थिएटर बांधण्याची योजना काढा की नामदेवराव. " नामदेवरावांच्या विचारांना चालना मिळाली. गोरेगावला थिएटर बांधण्याचा बेत दोघांनी निश्चित केला. नामदेवराव कामाच्या राशीला लागले. सरकारी परवाना मिळविला. युद्धजन्य परिस्थितीमुळे बांधकामासाठी लागणारे साहित्य नियंत्रित दरात मिळू शकले नाही. भरमसाट किंमत देणे भाग पडले. भिंती कुडाच्या घातल्या, इलेक्ट्रिक फिटिंगचे काम पुरे झाले, पण विजेचा पुरवठा केला जात नव्हता. परिश्रमाबरोबर अफाट पैसाही खर्च झाला होता. अडचणीमागून अडचणी निर्माण होत होत्या. गाडी रुळावर येत नव्हती. विजेच्या अभावी थिएटर सुरू होत नव्हते. वर्तक गांगरून गेले होते. होती नव्हती तेवढी जन्माची कमाई या धंद्यात घालून आपण फसलो

तर नाही ना, असा विचार त्यांच्या मनात आला असणे शक्य आहे. नामदेवराव आपले शांत. संकटातून मार्ग काढण्यात त्यांचा जन्म गेलेला. ऑईल इंजिन व जनरेटर पैदा केले आणि थिएटर सुरू केले.

सुरुवाती सुरुवातीला थिएटर फार तोटयात गेले. लोक मुंबईला जायचे, तेथून सिनेमा बघून यायचे. नवे नवे चांगले चांगले चित्रपट मुंबईत प्रथम लागायचे. गोरेगावच्या थिएटरची मिळकत फारच कमी व्हायची. त्यात बसवलेले ऑईल इंजिन फुटले. बुडत्याचा पाय खोलात गेला. वर्तक घाबरून गेले. नामदेवराव त्यांना म्हणाले, " गणपतराव घाबरून किंवा गांगरून हा धंदा नाही करता येणार. संकटांशी मुकाबला करीतच हा धंदा करावा लागतो. माझ्यावर विश्वास ठेवून तुम्ही या धंद्यात पडलात, तेव्हा तुम्हाला जर खरोखरच धंद्याची भीती वाटत असेल तर तुम्ही घातलेले पैसे मी परत करीन. घाबरून जाण्याचे बिलकूल कारण नाही. "

नामदेवरावांचे आत्मविश्वासाचे उद्‌गार ऐकून वर्तक गप्प बसले. वर्तकांना धीर आला. नामदेवरावांनी कुठून तरी इंजिन पैदा केले. थिएटर सुरू केले. हे थिएटर थोडयाच दिवसांत चांगली कमाई देऊ लागले.

सिनेधंद्यात नामदेवरावांचे बस्तान अतिशय उत्तम बसले. या धंद्यातील अनुभव पाठीशी असल्यामुळे बिनदिक्कतपणे आगेकूच करण्यास त्यांना संकोच वाटत नसे. आणखी एखादे थिएटर मिळाले तर त्यांना हवे होते. इतक्यात वाईचे थिएटर विक्रीस निघाले. वाईच्या थिएटरचे मालक होते, माधवराव येवले. नामदेवरावांनी येवल्यांना गाठले. बोलाचाली झाली आणि ते थिएटर नामदेवरावांनी १९५४ साली खरेदी केले.

फिरत्या सिनेमाबरोबर पोटापाठीमागे भटकत फिरणाऱ्या नामदेवरावांनी कष्टसायास करून संकटांशी मुकाबला करून मोठ्या धीराने, चिकाटीने आणि चतुराईने एक नव्हे, दोन नव्हे, तर तीन थिएटरे मालकीची केली. जादूची कांडी फिरवून केलेली ही किमया नव्हे, तर निढळाचा घाम गाळून खेचून आणलेली ही लक्ष्मी होय. ही खरी श्रमाची लक्ष्मी. श्रमावर लक्ष्मी प्रसन्न होते, याचे हे प्रत्यंतर. श्रमता श्रमता कसोटीच्या वेळी थकून न जाता अखंड श्रमत राहाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38802 दि: 9/8/71
क्रमांक 9292



हे लक्ष्मी प्राप्तीचे व्रत आहे. आयत्या वेळी लोक गांगरतात, मध्येच प्रयत्न सोडून देतात. साहजिकच त्यांच्या कपाळी श्रमसाफल्याचे सुख लाभत नाही. उलट वैफल्याची दु:खद जाणीव पदरी पडते. दोष लक्ष्मीचा नाही, माणसाचा आहे. नामदेवरावांनी कष्टाचे व्रत धोरणीपणाने शेवटपर्यंत तडीस नेले, म्हणून त्यांच्यावर लक्ष्मी प्रसन्न झाली.

उद्योगधंद्याचा व्याप वाढत गेला. दिवसेंदिवस तो वाढत जाणार हे ओळखून आणि घरची मंडळी धंदा सांभाळण्यास असल्याशिवाय धंदा सफल होत नाही, हे जाणून घरातील मंडळींवर जबाबदारीचे जू वाटून दिले. नामदेवरावांना फक्के माहीत होते की, करणाऱ्याचा धंदा असतो, बघणाऱ्याचा नव्हे.

पहिले वहिले मानाचे वसईचे थिएटर चालविण्याची जबाबदारी त्यांनी आपल्या थोरल्या मुलावर—मधुकरवर सोपविली. त्याला धंद्यात गुंतवून टाकले. वाईचे थिएटर ‘ न्यू चित्रा टॉकीज ’ थोरले जावई श्री. सुर्वे यांच्यावर ते चालविण्याची जबाबदारी सोपविली. सुर्वे यांना थिएटरमध्ये प्रॉपर्टीसह भागीदार केले. गोरेगावचे ‘ गोरेगाव टॉकीज ’ गणपतराव वर्तक व स्वत: नामदेवराव यांच्या संयुक्त संचालकत्वाखाली चालविण्याची व्यवस्था केली. दुसरे जावई—करपे यांनाही सिनेमाच्या धंद्यामध्ये थिएटरवर ठेवले आहे.

कामाची विभागणी केली. जबाबदारीची वाटणी झाली. जो तो कसून प्रयत्नाला लागला. प्रत्येकाने मिळवावे व पोट भरावे. अशी जरी ही कल्पक योजना असली तरी नामदेवरावांची घारीसारखी बारीक नजर प्रत्येक थिएटरच्या बारीक सारीक व्यवहाराकडे असते. मुलगा मधुकर व जावई सुर्वे हे दोघेही कर्ते आहेत. आपला धंदा पद्धतशीरपणे करीत आहेत. तरी त्यांनाही अजून दररोज थिएटरसंबंधीची हकिकत नामदेवरावांना कळवावी लागते. नामदेवरावही लक्षपूर्वक ती माहिती वाचून योग्य ते मार्गदर्शन तातडीने करीत असतात.

नामदेवरावांना तीन मुलगे व तीन मुली. तिन्ही मुलींची लग्ने झाली असून, त्या सुस्थितीत आहेत. तिघे मुलगे मधुकर, सदानंद व अशोक. तिघेही शिकलेले आहेत. मधुकराचा विवाह पुण्यातील मन्वन्तर दैनिकाचे संपादक व पुण्यातील नामवंत हनुमान प्रेसचे मालक श्री. नारायणराव कोकाटे यांच्या कन्येशी—कुसूमशी—झाला असून, त्यांना आता तीन मुले आहेत. एक मुलगा व दोन मुली.

सदानंदचे लग्न कै. काशीनाथ यादवराव टोणपे यांच्या शीला नावाच्या कन्येशी नुकतेच झाले आहे. सदानंद हा महाराष्ट्रातील पट्टीचा क्रिकेटपटू आहे. क्रिकेटच्या खेळाचे विशेष शिक्षण घेण्यासाठी तो विलायतेलाही गेला होता. अनेक क्रिकेटच्या सामन्यांतून तो महाराष्ट्राच्या वतीने खेळत असतो. रणजी ट्रॉफी सामन्यात सदानंद चमकत आहे.

तिसरा मुलगा अशोक हा अद्यापि कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे.

नामदेवरावांना मुली तीन. शांताबाई, पार्वतीबाई व हेमलता. शांताबाईचा विवाह हनुमंत सुर्वे, पार्वतीबाईचा विवाह पुरुषोत्तम करपे आणि हेमलतेचा विवाह विश्वासराव मुळाणे यांच्याशी झाला आहे.

नामदेवरावांचे थोरले जामात श्री. सुर्वे हे महाराष्ट्रातील पिढ्यान् पिढ्यांच्या रीतीरिवाजानुसार आपल्या सासऱ्यांना ' मामा ' म्हणत. निंबाळकर तालमीतील लोकही मामा म्हणत. लोकही मग नामदेवरावांना मामा म्हणू लागले. आता तर सगळेच लोक नामदेवरावांना मामासाहेब मोहोळ या नावानेच ओळखतात. मामासाहेबांच्या आयुष्यात पडनावांना एक वैशिष्टयपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. लहानपणी त्यांचे नाव कुणी ठेवलेलेच नाही, ते पडलेले नाव आहे आणि या पडलेल्या नावांची मालिका नामापासून मामापर्यंत चालत आलेली आहे.

मामासाहेबांचे संसारी जीवन सुखी व संपन्न आहे. त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. ती चांगली राहावी, अशी योजनापूर्वक त्यांनी आखणी केली आहे. संपत्तीच्या प्रमाणेच संततीच्या बाबतीतही ते दैववान आहेत.

बोलणे कमी, पण करणे अधिक या सदरातील लोकात मामासाहेबांची गणना करावी लागेल. जे विवेकाला पटेल, जे सर्वांना सुखाचे होईल ते निग्रहाने करणे व त्याचा गाजावाजा न करणे हे मामासाहेबांचे ब्रीद आहे.

मामासाहेबांना हुंडा घेणे पसंत नाही. लोक जेव्हा अभिमानाने सांगतात की माझ्या मुलाला इतका हुंडा मिळाला किंवा इतका हुंडा घेतल्याशिवाय अमक्याची मुलगी पसंतच करणार नाही, तेव्हा मामासाहेबांना मनोवेदना होतात. ते शांतपणे पण व्याकुळतेने म्हणतात, " विवाह म्हणजे काय बाजारपेठ आहे म्हणून मुलाला जास्तीत जास्त भाव यावा, यासाठी पालकाने धडपड

करावी ? विवाह म्हणजे दोन जिवांची जुळणी. जन्मोजन्मींच्या गाठी ! तिथे योग्य अयोग्यतेचा वाव असावा. भावनेला मान असावा. पैशाच्या व्यवहाराला थारा नसावा. माणसासाठी पैसा आहे. पैशासाठी माणूस नाही ! ”

मामासाहेब उपदेशाचे डोस कोणाला पाजीत बसत नाहीत. जे पटते, ते करून मोकळे होतात. त्यांनी आपल्या दोन मुलांचे विवाह केले. पण हुंडा नाही घेतला. ठराव नाही केला. मुलाला मुलगी पसंत पडली, मुलीला मुलगा पसंत पडला की झाले ! ठरले लग्न. बाकीच्या गोष्टींना फारसे महत्त्व नाही. ठराव नाही, आराव नाही. मामासाहेब शुभमंगल करून मोकळे ! आपणास वाटेल तशी आपण मुलांची हौस करावी. दुसऱ्या बाजूनेही त्यांना वाटेल तशी हौस करावी. कुणावर कुणाचे दडपण नाही. मानपानाची भांडणे नाहीत. सारे संतोषाचे वातावरण. मुलीच्या पालकाला आर्थिक बोजा सक्तीने घ्यायला लावण्यात निर्दयता आहे, असे त्यांना वाटते.

मुलींच्या विवाहाबाबतही त्यांचा असाच विधायक दृष्टिकोन आहे. जावई पसंत करताना ते कसोटी लावतात, ती त्याच्या कष्टाळुपणाची. कष्टाळू, निर्व्यसनी, चिकाटीचे व प्रामाणिक तरुण त्यांनी जावई म्हणून पसंत केले आहेत. शिक्षण आणि सांपत्तिक स्थिती या गोष्टी त्यांना गौण वाटतात. आजचा श्रीमंत उद्या गरीब होतो. आजचा गरीब उद्या लखपती होतो. सुखाचा संसार करण्यासाठी श्रमाला न हटण्याचा गुण हवा. मामासाहेबांनी आपल्या तिन्ही जावयांची निवड या कसोटीवर केली आहे. ही अनुभवावर आधारलेली कसोटी आहे. ती फलदायी होणारच. त्यांचे तिन्ही जावई सुखाचा संसार करीत आहेत. सासरे–जावई यांचे संबंध व्यवहारी नाहीत. एका कुटुंबातील अत्यंत जिव्हाळ्याच्या माणसांचे असावेत तसे आहेत.

मामासाहेबांनी समाजापुढे आपल्या मुलामुलींच्या विवाहांचा एक आदर्श ठेवला आहे. तो पुरोगामी आहे. सुखदायक आहे. आत्मीयता निर्माण करणारा आहे. मानवतेची जोपासना करणारा आहे. खऱ्या अर्थाने मामासाहेब गरिबांचे कैवारी व मानवतेचे पुजारी आहेत.

## प्रकरण १३ वे

१९४८ साली पुणे जिल्ह्याच्या कॉंग्रेस कमिटीत मामासाहेबांचा प्रवेश झाला. मुळशी तालुका कॉंग्रेस कमिटीत ते क्रियाशील कार्यकर्ते म्हणून मान्यता पावले. त्यांचा प्रभाव पुणे जिल्ह्याच्या कॉंग्रेस कार्यामध्ये पडत चालला. तरी वसईला ते विसरले नाहीत. वसई ही त्यांची कर्मभूमीच. वसईतील लोकांचे त्यांच्यावर प्रेम. तरुण पिढीचा ओढा अधिक.

वसईसारख्या छोटया गावात म्युनिसिपल निवडणुकीला महत्त्व फार. म्युनिसिपालिटी ताब्यात घेण्यासाठी अनेकांची धडपड. सत्तेचे राजकारण फार. काही लोक या सत्तेसाठी हपापलेले असतात. सत्ता भल्याबुऱ्या मार्गाने मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. मग सत्तेचा दुरुपयोग होण्याचाही संभव असतो. सत्ता काबीज करणे हा त्यांचा धंदा असतो. असे धंदेवाईक राजकारणी मामासाहेब मोहोळ नाहीत. त्यांच्या चरितार्थाचा धंदा वेगळा. कर्तव्याच्या भूमिकेतून ते राजकारण करतात. सेवेची संधी त्यांना राजकारणातून मिळते.

वसईच्या म्युनिसिपालिटीच्या निवडणुका १९४८ साली होत्या. म्युनिसिपालिटीतील राजकारणाला लोक विटलेले होते. त्यांना बदल हवा होता. बदल

काय सहजासहजी घडून येतो? तो घडवून आणावा लागतो. झुंज देऊन घडवून आणावा लागतो. निवडणूक लढवावी लागते. प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करावे लागते.

वसईतील पुरोगामी विचारांच्या मंडळींनी बदल घडवून आणण्याचे ठरविले. त्यांनी मामासाहेबांना निवडणुकीस उभे राहण्यास आग्रह केला. धंद्यातील माणसाने स्थानिक चुरशीत पडू नये, त्याचा धंद्यावर ताबडतोब परिणाम होतो. मामासाहेबांनी लोकांना सांगितले, "मी पुण्याकडचा, मी उभे राहाणे ठीक नव्हे. तुम्ही स्थानिक माणसालाच उभे करा." परंतु लोक ऐकेनात. त्यांनी मामासाहेबांना निवडणुकीस उभे राहण्याचा फारच आग्रह केला. तेव्हा अनेकांना दुखविणे हेही वाईट, हे जाणून मामासाहेबांनी होकार दिला तो एका अटीवर, "मी एक वर्षच फक्त म्युनिसिपालिटीचा सभासद राहीन !"

मामासाहेबांनी निवडणूक लढविली आणि जिंकली. मुठ्याचे मामासाहेब वसईचे नगरपिते बनले. यात त्यांची लोकसंग्राहकवृत्ती, संघटना चातुर्य दिसून येते. जुन्यांची मिरास मोडली. नव्यांचा उदय झाला. बदल घडून आला. मामासाहेबांना नगराध्यक्ष करण्याचा बेत इतरांनी आखला. मामासाहेबांना तो पसंत नाही पडला. स्थानिक माणूसच नगराध्यक्ष झाला पाहिजे, हे त्यांचे ठाम मत. त्यांनी आपणहून सांगितले, "नगराध्यक्ष मी होणार नाही. कारण तसे करणे योग्य नाही." शेवटी हो ना करता करता मामासाहेबांच्या म्हणण्या-प्रमाणे दुसऱ्यास नगराध्यक्ष केले व मामासाहेब पक्षप्रमुख झाले.

वर्ष संपले. बोलल्याप्रमाणे मामासाहेब वसईच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतून बाहेर पडले. पुणे जिल्ह्यातील कार्यक्षेत्र त्यांची वाट पाहात होते.

मामासाहेबांना मुळशी तालुक्यात कार्य करावयाचे होते. तो त्यांचा तालुका होता. तेथील सुखदु:खे त्यांनी अनुभवली होती. त्या रानचे ते होते. रानची दु:खे रानच्या माणसालाच माहीत असतात. कोणतीही सामुदायिक गोष्ट साध्य करावयाची झाली तर त्यासाठी संघटना हवी. बळकट संघटना हवी. मुळशी तालुका काँग्रेस शक्तिमान केल्याशिवाय गत्यंतर नाही, हे व्यवहारचतुर मामा-साहेबांनी ओळखले. लागलीच ते कामाला लागले. तरुण रक्ताचा तुटवडा, ही तालुका काँग्रेसची व्यथा आहे. हे निदान त्यांनी केले व उपाययोजनेस सुरुवात

केली. मुळशी तालुक्यात गावोगावी ते फिरले. तरुण लोकांना भेटले. त्यांना राजकारणाकडे खेचले. राजकारण म्हणजे सत्ता प्राप्तीचे साधन, असा विचार न करता जनहिताच्या विधायक कार्याचे माध्यम असा आहे, हे त्यांनी तरुणांना पटवून दिले. तरुणांची भरती तालुका काँग्रेसमध्ये होऊ लागली. नवे रक्त सळसळू लागले. नवा जोम दिसू लागला. तालुका शक्तिमान होऊ लागला. मामासाहेबांकडे मुळशी तालुक्याचे लोक आपला नेता म्हणून पाहू लागले. राजकीय प्रांगणात मामासाहेबांचा प्रभाव हळूहळू पडू लागला. पायरीपायरीने पडू लागला. मुळशी तालुक्यात त्यांचा प्रभाव दिसू लागला. त्याचा इष्ट परिणाम म्हणजे १९४९ साली ते जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून निवडून आले. शिवाय प्रांतिक काँग्रेस कमिटीतही त्यांना प्रतिनिधित्व मिळाले. मामासाहेबांच्या कार्य-कुशलतेचा हा गौरव होता. त्यांची सेवा मान्य होत चालली होती, याचे हे लक्षण होते.

मामासाहेबांनी आपले काम नेहमीच्या चिकाटीने चालविले होते. गाजावाजा न करता चालविले होते. सतत काम करीत राहाणे हा त्यांचा शिरस्ता.

पेरलेले उगवते. उगवण्यासाठी संधीची वाट पाहात असते. मामासाहेबांची सेवा अशीच रुजली. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीची नांदी झडली. भोर–वेल्हे–मुळशी हा मतदार संघ ठरला. या मतदार संघातून उमेदवार उभा करावयाचा होता. भाऊसाहेब हिरे प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष होते. पूर्ण विचारांती प्रांतिक काँग्रेस कमिटीने उमेदवार निवडले. भोर–वेल्हे–मुळशी मतदार संघासाठी मामासाहेबांची निवड झाली.

मामासाहेबांनी आपल्या मतदार संघात फिरावयास सुरुवात केली. गाव नि गाव पालथे घातले. गावकऱ्यांना भेटले. त्यांच्याशी विचारविनिमय केला. निवडणूक यंत्रणा आखली. त्यांनी निवडणूक जिंकली. मामासाहेब मुंबई राज्याचे आमदार झाले. भोर–वेल्हे–मुळशी मतदार संघाचे प्रतिनिधी म्हणून विधानसभेत गेले. त्यांचे राजकीय क्षेत्र विस्तृत झाले. शंकरराव भेलके यावेळी मामासाहेबांच्या समवेत फिरत होते.

मामासाहेब भोर संस्थानच्या कायदेमंडळाचे लोकनियुक्त सभासद होते. त्याचा फायदा यावेळी त्यांना झाला. संस्थान विलीन झाले त्यावेळी वीस लाख रुपये खजिन्यात शिल्लक होते. सरकारने या पैशाचा उपयोग त्या विभागाच्या

विकासासाठी करावा, असा मामासाहेबांनी आग्रह धरला. सहजासहजी का कोण एवढी रक्कम एखाद्या विभागाला देते ? अडचणी खूप आल्या. नकारघंटा वाजू लागल्या. दिरंगाईचे तुणतुणे वाजू लागले. सबुरीचा सल्ला मिळू लागला. परंतु मामासाहेब जिद्दीचे लढवय्ये. अंगावर घेतलेली कामगिरी हिरीरीने पार पाडायची त्यांची रीत. श्रमाला हटायचे नाही. पाठलाग करायला थकायचे नाही. हाती घेतलेली गोष्ट पुरी केल्याशिवाय सोडायची नाही. दांडगी चिकाटी. जोडीला नेकी. त्यांनी भोर भागातील अडचणी राज्यकर्त्यांपुढे मांडल्या. लोकांना माणसासारखे जगण्याची संधी द्या, अशी विनंती केली. डोंगराळ भागातील अडाणी जनतेची उपेक्षा करू नका असा इशारा दिला. भोर संस्थानचे पैसे भोर भागाच्या विकासासाठी खर्च करणे न्यायाला धरून होईल, असा आग्रह धरला. खूप खूप प्रयत्न केला. शेवटी प्रयत्नाला यश आले.

सरकारला आपल्या विभागाचे गाऱ्हाणे पटवून दिले. तेव्हा सरकारने वेल्ह्याचा पूल, भोर–भागोडी–अंबाडखेड रस्ता, पौड–कोळवण रस्त्यावरील पूल आणि पिरंगुट–मुठा रस्ता इत्यादि कामांना मंजुरी दिली. ही मंजुरी मिळवायला मामासाहेबांना सतत दोन वर्षे अखंड धडपड करावी लागली. डोंगरदऱ्यांनी भरलेल्या मुलुखात ही कामे झाल्यामुळे लोकांच्या अनेक अडचणी दूर झाल्या. दु:खे कमी झाली. या भागाच्या सुधारणेची ही नांदी ठरली. सुधारणेचे, नवविचारांचे वारे डोंगरकपारी जाऊ लागले. वाहतुकीचे मार्ग व साधने ही सुधारणेचे प्रेषित होत.

नंतर भोर–महाड रस्त्यावरील दोन पूल बांधले. घाटमाथा व कोकण यामध्ये वाहतूक सुरू झाली. त्यापैकी आंबेघर व निगुडघर येथे पूल बांधले. घाट–कोकणाची वाहतूक सुरू झाल्यामुळे लोकजीवनातही हळूहळू फरक पडू लागला. मालाची देवाण–घेवाण होऊ लागली. जीवनोपयोगी वस्तूंची आवक–जावक वाढली. लोकजीवन सुधारू लागले.

पाच वर्षांच्या आमदारकीच्या अवधीत मामासाहेबांनी आपल्या विभागाच्या विकासासाठी खूप खूप गोष्टी केल्या. शिवाय सबंध पुणे जिल्ह्याच्या दृष्टीनेही त्यांनी हालचाल केली. त्यांचे संघटन कौशल्य व रचनात्मक कार्य

करण्याची हातोटी वरिष्ठ काँग्रेस नेत्यांच्या मनात भरली. मामासाहेबांचे व्यक्तिमत्व प्रभावी ठरू लागले.

संघटनात्मक कामे आपणहून त्यांच्यावर सोपविली जाऊ लागली.

मामासाहेब विकासात्मक व संघटनात्मक कामे प्रामुख्याने करीत असले तरी ते ज्वलंत राजकीय प्रश्नापासून अलिप्त होते, असे नव्हे. १९५६ साली राज्य-पुनर्रचनेचा प्रश्न विधानसभेत गाजत होता. मुंबईचे भवितव्य ठरविले जात होते. मुंबई केन्द्रशासित व्हावी असा प्रयत्न चालला होता. महाराष्ट्रातून मुंबई अलग करण्याचा डाव आखण्यात आला होता.

मुंबईच्या प्रश्नावर खडाजंगी चालली होती. तिखट शब्दांची फेकाफेक चालली होती. मुंबई स्वतंत्र ठेवण्याकडे भारत सरकारचा कल होता. मुंबईच्या प्रश्नामुळे महाराष्ट्रातील जनतेत खळबळ माजली होती. मुंबई हे मराठी मुलखातील लाखो लोकांचे मायपोट. महाराष्ट्राचे हृदय ! हे हृदय महाराष्ट्राच्या बाहेर ठेवून कसे चालेल. अनेक आमदारांनी महाराष्ट्राची बाजू तळमळीने मांडली. मामासाहेबांचा मावळ भाग तर मुंबईवर जगलेला. खुद्द मामासाहेबांनी मुंबईचा आश्रय घेतलेला. मामासाहेबांनी विधानसभेत पोटतिडकीने भाषण केले. ते म्हणाले,

"अध्यक्ष महाराज, राज्य पुनर्रचनेसंबंधी जे बिल ह्या सभागृहापुढे मांडण्यात आले आहे, त्यावर गेले पाच-सहा दिवस जी चर्चा झाली, त्या चर्चेत प्रामुख्याने या सभागृहातील महाराष्ट्रीय सन्माननीय सभासदांनी महाराष्ट्रावर कसा अन्याय झाला आहे, याबद्दल आपआपली मते मांडली आहेत. कर्नाटकी आमदारांनी या बिलाने कर्नाटक राज्यावर कसा अन्याय होणार आहे, हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. मुंबई महाराष्ट्रात घातलेली नाही हा निर्णय जरी आज घेतलेला आहे, असे आपल्याला दिसत असले तरी हा निर्णय कैक वर्षांपूर्वीपासूनच घेतलेला आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क नाही हे दाखवून देण्यासाठी जी अनेक कारणे देण्यात आली आहेत, त्यांपैकी एकदोन कारणे अशी आहेत की, मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी व महाराष्ट्र काँग्रेस कमिटी अशा दोन कमिटचा पहिल्यापासून आहेत व त्यानंतर अलीकडे अलीकडे महाराष्ट्र विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ व गुजराथ विद्यापीठ

अशी जी निरनिराळी विद्यापीठे स्थापन केली आहेत, त्यावरून महाराष्ट्राचा किंवा कोणत्याही एका एकभाषिकराज्याचा मुंबईवर हक्क नाही असे सिद्ध होते, असे सांगण्यात आले आहे. ही जी कारणे दिली जातात, यावरूनच मी असा निष्कर्ष काढला की, ज्या दिवशी मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी स्थापन करण्यात आली, त्या दिवसापासूनच मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी ठेवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला, असे म्हणता येईल. नाही तर काँग्रेस कमिट्या वेगवेगळ्या आहेत किंवा विद्यापीठे वेगवेगळी आहेत म्हणून मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क नाही, असे म्हणण्याचे कारण नव्हते. खरी परिस्थिती अशी आहे की ज्याप्रमाणे ब्रिटिशांनी या देशात आपल्यावर त्यांच्या राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने या देशाचे निरनिराळे विभाग पाडले, त्याचप्रमाणे त्या वेळी काँग्रेसने राज्यकारभाराच्या किंवा कामाच्या सोयीच्या दृष्टीने मुंबई प्रदेश कमिटी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, अशा निरनिराळ्या कमिट्या स्थापन केल्या होत्या, पण म्हणून या कारणासाठी मुंबई महाराष्ट्रात घातली जाऊ नये, असे म्हणणे योग्य होणार नाही.

अध्यक्ष महाराज, मुंबई महाराष्ट्राला दिली जाऊ नये म्हणून फार पूर्वीपासून काही हितसंबंधी लोकांनी निर्णय घेतला होता हे दाखविण्यासाठी मी एक उदाहरण देतो. माझे धंद्यात असणारे एक गुजराथी मित्र आहेत. ४–५ वर्षांपूर्वी ते व मी भाषावार प्रांतरचना करावयाची झाली तर मुंबई महाराष्ट्रात राहाणार आहे की नाही व नाही तर मुंबईचे काय होणार अशी चर्चा करीत होतो. माझे हे मित्र मोठे व्यापारी आहेत. दिल्लीला, कलकत्त्याला इतकेच नव्हे तर आफ्रिकेला त्यांच्या धंद्याच्या पेढ्या आहेत. ज्यावेळी हा विषय चर्चेला निघाला, त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, भाषावार प्रांतरचना करावयाची ठरली तर मुंबई शहर कोणत्याही एका भाषिक राज्यामध्ये घातले जाणार नाही. एक तर मुंबईचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात येईल किंवा मुंबई शहर मध्यवर्ती सरकारच्या ताब्यात दिले जाईल असे ते म्हणाले. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा निर्णय पूर्वीपासून घेतलेला असल्याशिवाय त्या व्यापाऱ्याने मुंबईचे हे भवितव्य कसे सांगितले ? तो काही भविष्यवादी नव्हता. असे असताना त्याने त्यावेळी मुंबईचे काय होणार हे भविष्य सांगून ठेवले, याचा अर्थच हा होतो की,

काही ठराविक लोकांनी असा निश्चय केलेला होता की मुंबई कोठे घालावयाची हे ठरविण्याची वेळ येईल तेव्हा ती स्वतंत्रच ठेवली जावी. आता जी अनेक कारणे देण्यात येत आहेत, ती काही तरी कारणे सांगितली पाहिजेत म्हणून सागण्यात येत आहेत. याशिवाय याला दुसरा तिसरा अर्थ आहे, असे मला वाटत नाही. हे काही असले तरी एक गोष्ट मात्र मला स्पष्टपणे दिसते, ती अशी की, त्यावेळी जरी मुंबई वेगळी ठेवण्याचा निर्णय आधीपासूनच घेण्यात आला असला तरी प्रत्यक्ष मुंबई वेगळी ठेवण्याचे ठरविले तर त्याचा परिणाम काय होईल, याची कोणाला कल्पना नसली पाहिजे. ही कल्पना जर असती तर माझी खात्री आहे की आज दिलेला निर्णय मुंबईच्या बाबतीत कधी दिला नसता. आता पुढाऱ्यांची आणि मध्यवर्ती सरकारची अशी परिस्थिती झालेली दिसते की एकदा निर्णय दिल्यानंतर तो बदलावा तर इभ्रतीचा प्रश्न येतो आणि या पर्यायातून तो पर्याय आणि त्या पर्यायातून आणखी दुसरा पर्याय असे जरी कितीही पर्याय सुचविण्यात आले तरी तुम्हांला कोणतीच गोष्ट मान्य होत नाही. तेव्हा तुम्हांला निर्णय बदलून पाहिजे तरी किती वेळा असे उलट आम्हांला विचारण्यात येत आहे. आज एक गोष्ट आपल्याला स्पष्ट दिसत आहे, ती ही की, मुंबईची आणि महाराष्ट्राची कायमची ताटातूट करण्यात आली आहे.

गोडस्याच्या नावाचा उल्लेख वरचेवर करण्यात का येतो, तेच आम्हांला समजत नाही.त्याच्या विचारसरणीची महाराष्ट्राने धुळधाण केली. या सभागृहामध्ये महाराष्ट्रातून १४५ सभासद निवडून आले आहेत. त्यामध्ये गोडस्याच्या विचारसरणीचा एकही सभासद निवडून आलेला दिसत नसूनही पुन्हा पुन्हा आमच्यापुढे तो प्रश्न काढून आमच्या दुःखावर डागण्या का देण्यात येतात, तेच समजत नाही. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, आतापर्यंत महाराष्ट्रासमोर सुचविलेल्या कोणत्याही प्रकारात मुंबई व महाराष्ट्र एकत्र राहातील, असा पर्याय सुचविण्यात आला नव्हता. मुंबई महाराष्ट्रात टाकणे हाच खरा पर्याय असताना तो वगळून इतर पर्याय सुचवावयाचे आणि महाराष्ट्राने ते अमान्य केले की वर म्हणावयाचे, काय करणार ? कोणताच पर्याय तुम्हांला मान्य नाही, जी गोष्ट सुचवावयाला पाहिजे तेवढीच वगळण्यात येत असल्याने हा प्रश्न सुटत नाही. एखाद्याला जी वस्तू हवी असते, ती मिळविण्यासाठी तो

प्रयत्न करू लागल्यावर ती वस्तू लांब लांब नेण्याचा मार्ग कोणी अवलंबिल्यास गरजू व्यक्ती ती वस्तू मिळविण्यासाठी अट्टाहास करू लागते, त्याप्रमाणे महाराष्ट्राचे झाले असून, महाराष्ट्राचा मुंबईवर न्याय हक्क असताना तो डावलण्यात येत असल्याने सध्याची बिकट परिस्थिती ओढवली आहे.

मुंबईत घडलेल्या घटना घडण्याचे कारण महाराष्ट्रीयांच्या भावना विचारात न घेता पर्याय काढण्यात आल्यामुळे वैफल्याच्या भावनेने निर्माण झाले. या प्रकारांचे मी समर्थन करीत नसलो तरी या घटना का घडल्या, याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. घडलेल्या घटनांत सर्व दोष महाराष्ट्रीयांचा आहे, असे म्हणणे संयुक्तिक नसून त्यांना चिडविणाऱ्या गोष्टी झाल्याने तसे प्रकार घडले. मुंबईबाबत महाराष्ट्रीयांच्या भावना किती तीव्र आहेत, हे या सन्माननीय सभागृहातील तिसाच्यावर आमदारांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे उघड झाले आहे. ज्या काही अनिष्ट घटना घडल्या, त्याचे कारण महाराष्ट्रावर अन्याय झाल्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या जनतेकडून घडलेल्या आहेत. जनतेला डिवचण्याचे प्रकार झाले नसते तर घडलेल्या घटना टळण्याची शक्यता होती. अजूनही महाराष्ट्रावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न करता येतील आणि तसे झाल्यास परत सलोखा नांदू शकेल, असे मला वाटते. ''

१९५७ सालच्या निवडणूकी जवळ येत चालल्या. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने मराठी मुलुखात एक वेगळेच वातावरण पसरले होते. काँग्रेसच्या धोरणाविषयी महाराष्ट्रीय जनता नाराज झाली होती. मामासाहेब मोहोळ यांना पूर्वीच्याच मतदार संघातून निवडणुकीस उभे करण्यात आले. वैयक्तिक रीत्या मामासाहेबांची भूमिका संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा अशी होती. तथापि जनमताचा कौल संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने पडला. संयुक्त महाराष्ट्रवादी लोक निवडून आले. काँग्रेसचे उमेदवार पडले. पश्चिम महाराष्ट्रात ही पडझड खूपच झाली. या विभागात अगदी थोडे लोक काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले. मामासाहेब मोहोळ ही निवडणूक हरले. पराजयाची ही पहिलीच खेप. त्यांना मनस्वी वाईट वाटले. यापुढे निवडणुकीस उभे राहावयाचे नाही, असाही विचार त्यांच्या मनात आला. ते जवळजवळ नाउमेद झाले होते. लढवय्यांचा स्वभाव असाच सरळ असतो.

अशा विमनस्क अवस्थेत मामासाहेब यशवंतरावजींना भेटले. त्यांनी मामासाबांना दिलासा दिला. राजकारणात असे दिल टाकून चालत नाही. धीर धरावा लागतो, असे सांगितले व काम करीत राहा असाही सल्ला दिला. मामासाहेबांनी त्यांना आपल्या मनीची इच्छा सांगितली. " मला आर्थिक साहाय्याची अपेक्षा नाही. नव्हे, ते मला नकोच. नको मला तुमच्या त्या मानाच्या जागा. नको वेगवेगळ्या समित्यांवरील सभासदत्व. मला माझ्या आवडीचे काम करायला संधी द्या. माझ्या जीवनाचे कार्य आहे ते. " मामासाहेबांनी यशवंतरावजींच्यापुढे हृदय मोकळे केले.

" कोणतं कार्य हाती घ्यायचा तुमचा मानस आहे ? " यशवंतरावजींनी पृच्छा केली.

" मल्लविद्येचं ! " मामासाहेबांनी तात्काळ उत्तर दिले.

" वा ! छान ! मामासाहेब खरोखरच तुम्ही या पुरातन विद्येची सेवा करा ! फार चांगली कल्पना आहे. कुस्तीकलेच्या उत्कर्षासाठी झटा. मी तुमच्या पाठीशी आहे. "

मामासाहेबांना आनंद झाला. त्यांनी कुस्तीगीरांची संघटना व्यापक पायावर बांधावयाचे ठरविले. ते स्वप्न रंगविण्यात गुंतले. तोच यशवंतरावजी हळूच म्हणाले, " मल्लविद्येची सेवा करीत असता राजकारणाचा संन्यास घेण्याचे काहीच कारण नाही. पक्षाची संघटना तुम्हास करता येईल. जिल्ह्याच्या विकासाच्या कार्याकडे लक्ष देता येईल. ही जनहिताचीच कामे आहेत. " यशवंतरावजींच्या दिलाशाने मामासाहेबांचे नैराश्य कुठच्या कुठे पळाले.

मामासाहेबांनी पक्ष संघटनेचे कार्य हाती घेतले. निष्ठावंत सेवक म्हणून ते काँग्रेसची संघटना बांधू लागले. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर रण माजून संघटनेची घडी विस्कटलेली होती. ती ठाकठीक बसविण्याचा चंग त्यांनी बांधला. कार्यकर्त्यांना भेटून पक्षाची भूमिका विशद करून त्यांना आपलेसे केले.

१९५८ साली मामासाहेब जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष झाले. यशवंतरावजी व बाळासाहेब देसाई यांनी मामासाहेबांवर ही जबाबदारी टाकली होती. मामासाहेबांनी लोकमत जागृत करण्याचा सपाटा चालविला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत



हरिजन सप्ताह, वनमहोत्सव सप्ताह, शिक्षण सप्ताह. . .असे अनेक सप्ताह साजरे केले. त्यात जातीने भाग घेतला. सर्व जिल्हा ते फिरले. गावोगावच्या अडीअडचणी समजावून घेतल्या व जिल्ह्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने हालचाल केली.

एकंदर कामाचा उरक व संघटन—चातुर्य यांचा प्रभाव पडून १९५९ साली मामासाहेब पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपदी निवडून आले. जिल्हाध्यक्ष या नात्याने ते जिल्हाभर हिंडले. कार्यकर्त्यांची शिबिरे घेतली. त्यांच्यात चेतना निर्माण केली. कार्यकर्त्यांना कार्यप्रवृत्त करण्यासाठी मामासाहेबांनी अतोनात परिश्रम घेतले. श्री. अण्णासाहेब मगर यांनी मामासाहेबांना संघटनेच्या कार्यात चांगलीच साथ दिली. आळंदीला असेच एक कार्यकर्त्यांचे शिबिर घेतले होते. या शिबिरास एक हजार कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी यशवंतरावजी व बाळासाहेब देसाई हे आले होते.

जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने अकस्मात एक मोठी जबाबदारी पडली. १९६० साली केशवराव जेधे वारले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर काँग्रेसचे बळ अजविण्याची वेळ आली. केशवराव जेधे खासदार होते. लोक-सभेच्या जागेची पोटनिवडणूक घ्यायचे ठरले. गुलाबराव जेधे काँग्रेसच्या वतीने उभे राहिले. ही निवडणूक प्रतिष्ठेचा प्रश्न ठरली. मामासाहेबांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. सबंध मतदार संघ पायाखाली घातला. मतदारांना काँग्रेसची भूमिका समजावून सांगितली. आपल्यापरी खूप खूप प्रयत्न केले. अनेक कार्यकर्ते राबत होते. यशवंतरावजींनीही जातीने प्रचाराची पराकाष्ठा केली आणि ही प्रतिष्ठेचा प्रश्न झालेली निवडणूक जिंकली.

१२ जुलै १९६१ रोजी पुण्यावर प्रलयाची आपत्ती कोसळली. पानशेत धरण फुटले. यावेळी मामासाहेब जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते स्वत: या दिवशी पुण्यातही होते. पानशेतची कहाणी त्यांच्याच शब्दात पुढे दिली आहे. ही कहाणी मामासाहेबांनी विधानसभेत सांगितली. न्यायमूर्ती नाईक यांनी पानशेत धरणफुटीचा जो अहवाल सादर केला त्यावर विधानसभेची जी चर्चा चालू होती, त्या चर्चेत भाग घेताना मामासाहेबांनी ही कहाणी सांगितली. १९ डिसेंबर १९६३ रोजी सांगितली. ते म्हणाले,

"गेल्या पाच दिवसांपासून न्यायमूर्ती नाईक यांनी पानशेत धरणफुटीचा जो अहवाल सादर केलेला आहे, त्यावर चर्चा चालू आहे. या कमिशनने निर-निराळ्या लोकांच्या साक्षी घेऊन जे निष्कर्ष काढलेले आहेत, त्या निष्कर्षांवर गेल्या पाच दिवसांत मोठ्या प्रमाणात विचार करण्यात आलेला आहे.

ज्या पानशेत धरणाविषयी या सभागृहात चर्चा चालू आहे, त्या भागात गेल्या २५–३० वर्षांपासून कार्य करणारा मी कार्यकर्ता आहे. त्या भागातील एक कार्यकर्ता या नात्याने पानशेत धरणाच्या प्रकरणाची प्रकरणे म्हणण्यापेक्षा कहाणी म्हटले तर वावगे होणार नाही, असे मला वाटते, मला चांगली माहिती आहे. पानशेत गाव हे एक लहानसे खेडे आहे. याची लोकवस्ती २०० आहे. ज्यावेळी पानशेत धरण बांधण्याचे ठरले, त्यावेळी पानशेत येथील लोकांना कल्पना नव्हती की आपल्यावर ही आपत्ती येणार आहे. १२ जुलैला हे धरण फुटले, त्या दिवशी मी सदाशिव पेठेतील माझ्या घरात होतो. त्या दिवशी सकाळी त्या भागातील कुरण गावचा एक कार्यकर्ता माझ्याकडे आला आणि त्याने मला पानशेत फुटल्याची हकिकत सांगितली. तोपर्यंत मला या गोष्टीची कल्पना नव्हती. त्यावेळी मी पुणे जिल्हा विकास मंडळाचा उपाध्यक्ष असल्या-मुळे कलेक्टर, कमिशनर व सर्वसामान्य जनतेशी माझा संबंध होता. पानशेत धरण बांधण्याच्या अगोदर पुनर्वसाहत कमिटी जी नेमली होती, त्या कमिटीचा मी एक सदस्य होतो. यावरून पानशेत धरणाचा व माझा किती जिव्हाळ्याचा संबंध अगदी पूर्वीपासून होता, याची कल्पना सभागृहाला येईल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे पानशेत धरण फुटल्याची बातमी मला प्रथम सकाळी साडेआठ वाजता समजली. एक राजकीय कार्यकर्ता या नात्याने त्या अगोदर १०–१२ दिवस मी माझ्या जिल्ह्यात फिरत होतो. मराठवाड्यातील एक पुढारी श्री. बाबासाहेब सावनेकर हेही पक्षाच्या कामासाठी दौऱ्यावर होते. अकरा तार-खेला त्यांचा दौरा संपलेला होता. दुपारी १२ वाजता मी त्यांना काँग्रेस हाऊस-वर भेटणार होतो. कारण त्यांचा मुक्काम काँग्रेस हाऊसवर होता. मी त्यांना सकाळी फोन केला की पानशेत धरण फुटले आहे. काँग्रेस हाऊस नदीकाठीच असल्याने त्यांनी घाईघाईने जाऊन नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे किंवा काय हे पाहिले. परंतु पाण्याची पातळी फारशी उंचावलेली नव्हती.

त्यामुळे धरण फुटल्याच्या बातमीचे त्यांना विशेष महत्त्व वाटले नाही. आम्हालाही काही वाटले नाही. १९५८ चा मोठा पूर नुकताच येऊन गेलेला होता. त्यावेळी जेवढे पाणी आले होते, त्यापेक्षा थोडे जास्त पाणी वाढेल एवढेच आम्हांला वाटले. ज्या भागात पुराचे पाणी येईल असा संभव होता, तेथील लोक आपल्या व्यवस्थेला लागतील असे वाटत होते. त्यानंतर मोटारीने मी काँग्रेस हाऊसमध्ये गेलो आणि श्री. सावनेकर यांना गाडीत घालून घरी घेऊन आलो. आम्हांला अनेक ठिकाणी जावयाचे असल्याने एक–दीड तासात आम्ही हडपसरला गेलो. तेथे जेवणाचा कार्यक्रम होता. पावसाचे पाणी सारखे वाढत चालले आहे, असा सारखा रिपोर्ट येत होता. परंतु पाणी मोठ्या प्रमाणात वाढेल असे न वाटल्यामुळे त्याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. १९५८ साली पूर आला, त्यापेक्षा जास्त पाणी येणार नाही, अशी अपेक्षा नदीकाठच्या भागात राहणाऱ्या लोकांची होती. मी काँग्रेस हाऊसवर गेल्यावर मला त्या ठिकाणी दोन–तीन कार्यकर्ते भेटले होते. त्यांना धरण फुटल्याची बातमी मी सांगितली होती. परंतु ते तेथेच गप्प बसून राहिले. परंतु नंतर काँग्रेस हाऊसच्या तिसऱ्या मजल्यावर बसून ५० माणसांना परमेश्वराची प्रार्थना करण्याचा प्रसंग आला. एवढे पाणी वाढणार आहे, अशी त्या मंडळींना कल्पना असती तर ते काँग्रेस हाऊसमध्ये बसले नसते. लोकांचा जो समज व्हावयास पाहिजे होता, तो न झाल्यामुळे हा सर्व गोंधळ निर्माण झाला, असे माझे मत आहे. १२ तारखेला सकाळी धरण फुटले आणि मग हाहाःकार उडाला. १२ तारखेला दुपारी दोन वाजेपर्यंत लोक घरात काळजी करीत बसलेले होते. पाण्याचा जोर वाढत चाललेला होता. आम्हीही विचार केला की, घरी बसून राहावे, मुलाबाळांना घेऊन कधी घराबाहेर पडण्याचा प्रसंग येईल ते सांगता येणार नाही. अशा अवस्थेत आम्ही होतो. परंतु आमच्या घरापर्यंत पाणी येऊ शकले नाही. पाणी ओसरल्यानंतर मी विठ्ठलवाडीच्या बाजूला जाऊन आलो. पानशेत धरण ज्या बाजूला आहे, ज्या बाजूला मोटारीच्या मार्गावर आणि विठ्ठलवाडीतील भाग पाण्याने तुडुंब भरून गेलेला होता. अर्थात तेथे जाता येईना. म्हणून आम्ही तेथूनच परत फिरलो. काय करावे काही सुचत नव्हते. पाणी किती खाली गेले आहे, याचा अंदाज करता येत नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर कालच्या पुराने

एकंदर काय परिस्थिती झाली आहे, हे पाहण्यासाठी आम्ही बाहेर पडलो. परिस्थिती अशी होती की आम्हांला नदीच्या पलीकडे जायलाच मिळाले नाही. त्यानंतर एकंदर परिस्थितीबाबत कलेक्टरशी चर्चा करीत बसलो असताना एकदम बाहेर फार मोठा ओरडा ऐकू आला आणि लोक सैरावैरा पळू लागले. ते ओरडत होते की, आता त्याखालचे धरणही फुटले आहे. पळा, पळा, आणि मी बाहेर आलो असताना सर्वत्र एकच हाहा:कार उडालेला दिसला. लोक अन्न, वस्त्राविना जिकडे रस्ता मिळेल तिकडे सैरावैरा पळू लागले. कोणालाच कशाची शुद्ध नव्हती. अन्नवस्त्र नाही, जागा नाही, असे लोक सर्वत्र पळताना दिसले आणि ज्याला जिथे निवाऱ्याची जागा दिसली त्या ठिकाणी त्यांनी आसरा घेतला.

मला येथे आपल्याला सांगितले पाहिजे की, पुण्यावर ही महान आपत्ती आली असताना पुण्याच्या आसपासच्या लोकांनी, पुणे जिल्ह्यातील लोकांनी आणि या राज्यातील इतर लोकांनी जी अमूल्य अशी मदत केली ती खरोखर मोठी कौतुकास्पद होती. ती मदत जर वेळेवर आली नसती तर मोठा कठीण प्रसंग ओढवला असता आणि लोक अन्नपाण्यावाचून मेले असते आणि हे पानशेत प्रकरण काही वेगळेच झाले असते. ते वेगळ्या प्रकाराने लिहावे लागले असते. हा महापूर येऊन गेल्यावर पुण्यात आठ दिवस अन्न नाही, पाणी नाही, प्रकाश नाही, जेथे ज्याला जागा सापडेल तेथे तो राहत होता. परंतु आसपासच्या लोकांनी अन्नपाण्याची अत्यंत तातडीने मदत केली. त्यामुळे मोठा दुर्धर प्रसंग टळला. लोकांनी लॉऱ्या भरभरून अन्न व कपडा पाठविला. नगर, सातारा, मुंबई आदि ठिकाणाहूनही अन्न आणि कपड्याच्या लॉऱ्या आल्या. पुण्याच्या आजूबाजूच्या भागातील लोकांनीही भाकऱ्या आणि भाजी पाठविली आणि त्यामुळे येथील लोकांचे जीवन वाचले. त्या आपत्तीच्या प्रसंगी सामान्य लोकांनी पुणेकरांना जी बहुमोल मदत केली, त्याचा उल्लेख या अहवालात असणे आणि त्या मदतीची नोंद होणे आवश्यक होते. परंतु ती या अहवालात झालेली दिसून आली नाही, म्हणून मी येथे याबाबत विस्ताराने बोलत आहे.

या जिल्ह्यातील लोकांची बऱ्याच वर्षापासूनची खडकवासला धरणाची मागणी होती. हा दुष्काळग्रस्त भाग आहे आणि येथील लोकांना दुष्काळाच्या संकटातून सोडवावयाचे असेल तर या भागात खकडवासला धरण झाले पाहिजे,

अशी इकडील लोकांची मागणी होती. सन १९३८, ३९, ४० सालापासून ही मागणी इकडील जनता करीत आली आहे. त्यावेळी गिल्डर हे पी. डब्ल्यू. डी. विभागाचे मंत्री होते. बरेच दिवस या मागणीवर विचार चालला होता. परंतु मध्यंतरी पुन्हा सन १९४२ साली देशात एक मोठे आंदोलन झाले आणि ही मागणी मागे पडली. परंतु १९५७ सालापासून पुन्हा या भागातील जनता या मागणीच्या मागे लागली. त्यावेळी कै. भाऊसाहेब हिरे हे रेव्हेन्यू मिनिस्टर होते. त्यांनी या कामाला बरीच चालना दिली. परंतु त्यावेळी तंत्रज्ञांचे असे मत पडले की खडकवासल्याचे एकच धरण बांधण्याऐवजी अंबी आणि मुस्सा या दोन नद्यांवर जर दोन धरण बांधण्यात आली तर तेवढयाच खर्चात जास्त पाणी उपलब्ध होऊ शकेल आणि म्हणून खडकवासल्याचे धरण बांधण्याऐवजी पानशेतचे धरण बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा प्रकारे खडकवासल्या-ऐवजी दोन धरणे बांधण्याचे ठरविण्यात आले. अर्थात या धरणाखाली ज्या लोकांच्या जमिनी येणार होत्या, त्या ठिकाणाहून त्या लोकांचे स्थलांतर कर-ण्याचा आणि त्यासाठी त्यांची मने वळविण्याचा मोठा बिकट प्रश्न होता. याची कल्पना येथे मुंबईत बसून येणे शक्य नाही. एका खोलीत राहाणाऱ्या लोकांना जर आपली खोली सोडून दुसरीकडे जाण्याचा प्रसंग आला तर किती कठीण वाटते, याची कदाचित आपल्याला कल्पना असेल. मग जमीनजुमला, घरदार आदि गोष्टी सोडून दुसरीकडे स्थलांतर करणे किती बिकट आहे, याची आपण कल्पना करू शकाल. तेव्हा या लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मोठा बिकट होता. मी स्वतः त्या पुनर्वसन कमिटीत असल्याने मला त्या गोष्टीची कल्पना होती. आम्ही त्यावेळी असा एक निर्णय घेतला होता की, ज्याची जमीन धरणाखाली जात आहे, त्या लोकांना जर दुसरी जमीन द्यावयाची झाली तर या धरणापासून जी जमीन भिजणार असेल, त्या जमिनीपैकीच एखादी जमीन या लोकांना द्यावी. मग ती आताच्या जमिनीपेक्षा जास्त असो अथवा कमी असो.

पानशेतचे धरण फुटून आज दोन वर्षे पाच महिने झाले, परंतु पानशेतची कहाणी अजून संपलेली नाही. येथील लोकांचा प्रश्न जेव्हा आपण खऱ्या अर्थाने सोडवू तेव्हाच ही कहाणी संपली असे मानता येईल. या अडीच वर्षाच्या काळा-मध्ये अनेक घटना घडल्या. हे पानशेत व खडकवासल्याचे धरण फुटले, त्याची

चौकशी करण्याकरिता बावडेकर कमिशन नेमले, पण पुढे त्यांचा अंत झाला, तो का झाला ? कसा झाला? या प्रश्नामध्ये मी जात नाही. त्यानंतर श्री. नाईक कमिशन नेमण्यात आले व त्यांनी हा अहवाल सादर केला. या पानशेत प्रकरणाची कहाणी केव्हा संपणार आहे, हे सांगता येत नाही.

नाईक कमिशनपुढे अनेक लोकांच्या साक्षी झाल्या. त्यात कोण कसे बोलले, कोणाच्या बोलण्याचा रोख कसा काय होता, या खोलात मी जाणार नाही. परंतु एक गोष्ट मी या संदर्भात सांगू इच्छितो की, पानशेत धरण फुटल्यामुळे पुण्याच्या ज्या ज्या लोकांचे नुकसान झाले, त्यांना मदतीचा हातभार अनेक लोकांनी लावला, जी मदत आली, ती इच्छित ठिकाणी पोहोचली पाहिजे, या गोष्टीची खबरदारी आम्ही घेण्याचा प्रयत्न केला. या प्रांतात टाटांचे निरनिराळे कारखाने आहेत आणि त्यांचा एक फंड आहे. त्यातून त्यांनी काही लक्ष रुपयांची मदत या पूरग्रस्तांना देण्याची तयारी दाखविली. त्यासंबंधी या सभागृहात काही लोकांवर आरोप करण्यात आले, परंतु त्याला अर्थ नाही. टाटांची ज्याप्रमाणे मदत आली, त्याचप्रमाणे मुंबईच्या अनेक लोकांनी केली. त्यात एक बाई होत्या. त्यांनी सांगितले की, आम्ही या लोकांना भांडी वाटणार आहोत. तेव्हा जे खरोखर गरजू असतील, त्यांना आमच्याकडे आणा ? त्याप्रमाणे आम्ही त्यांच्याकडे काही लोक पाठविले व त्यांना ती मदत मिळाली. मदत देण्याच्या कामाशी माझाही संबंध होता, म्हणून मी सभागृहाला ही माहिती सांगत आहे. साधे पाव वाटण्याच्या ठिकाणी मुलांची रांगच्या रांग लागत असे. कित्येक मुले दोन दोनदासुद्धा पाव घेत असत. परंतु ही गोष्ट आम्हांला संध्याकाळपर्यंत करावी लागत असे, त्यामुळे ते लक्षात येत नव्हते. त्याचप्रमाणे मला सांगावयाचे आहे की, टाटांची जी मदत आली ती नुसती मदत आली नाही तर मदत वाटण्याकरिता त्यांचा माणूसही आला होता. आमचे काम फक्त त्यांच्यासमोर योग्य माणूस उभा करण्याचे होते. मी स्वतःही काही लोकांना ती मदत मिळावी म्हणून चिठ्ठ्या दिल्या. दिलेल्या चिठ्ठ्यांपैकी काही लोकांना मदत मिळाली नाही व त्या परत आल्या, अशाही गोष्टी घडल्या आहेत. हे सांगण्याचा माझा उद्देश इतकाच आहे की, कोणीही तोंडाला येईल ते बोलू नये आणि कोणावरही भलतेच आरोप करू नयेत.

धरण एक वर्ष लवकर पूर्ण करण्याचा निर्णय घेतला, त्यात काही भलती-सलती गोष्ट कोणी केली असे नाही. श्री. राव हे ख्यातनाम इंजिनियर येथे आले आणि त्यांनी सांगितले की, हे धरण एक वर्षभर अगोदर पूर्ण होऊ शकते. त्याचप्रमाणे सर्वांना वाटले की, हे धरण एक वर्ष अगोदर पूर्ण झाले तर चांगले होईल आणि त्या दृष्टीने मोठ्या इंजिनियरपासून तो ओव्हरसिअरपर्यंत सर्वांना वाटले की आपण हे धरण एक वर्ष अगोदर पूर्ण करावे. कोणतेही काम लवकर झाले पाहिजे, असे आपणच नेहमी या सभागृहात म्हणतो. त्याचप्रमाणे जर या लोकांनी एखादे काम अगोदर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर त्यात काय वावगे घडले हे मला कळत नाही. आपणच दप्तरदिरंगाईवर टीका करतो आणि एका टेबलावरून कागद सहा सहा महिने हालत नाही, असे म्हणतो. कोणतेही काम लवकर झाले पाहिजे, अशी आपणा सर्वांचीच इच्छा असते. तिला अनुसरून हे धरण लवकर पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. साधा पूलसुद्धा लवकर झाला पाहिजे, असे आपण म्हणतो, तेव्हा हे धरण लवकर पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला तर त्यात कोणाला दोष का द्यावा, हेच मला समजत नाही. यावर्षी अतिशय जोराचा पाऊस आला. मी स्वतः माझ्या आयुष्यात असा पावसाळा कधी पाहिला नव्हता. माझ्यापेक्षा जे लोक वडील आहेत, तेसुद्धा सांगतात की, असा पावसाळा आम्हीदेखील असा पाऊस कधी पाहिला नव्हता. नुसता पाऊसच नव्हता, तर त्याच्या जोडीला वारादेखील होता. आणि या दोन्ही गोष्टींमुळे हे धरण फुटण्याला मदत झाली.

ही गोष्ट घडली त्याला दैवी कोप म्हणता येईल. त्याचप्रमाणे या दुष्काळी भागातील लोकांचे दुर्दैवही त्याला कारणीभूत आहे. हे धरण झाले असते तर या दुष्काळी भागातील जमीन सुजलाम् आणि सुफलाम् झाली असती. या भागातील लोकांची कित्येक वर्षांची आकांक्षा पूर्ण झाली असती. परंतु त्यांचे दुर्दैव ओढवले आणि हे धरण फुटले. या पानशेत आणि खडकवासला धरणामुळे जवळ-जवळ २० हजार एकर जमिनीला पाणी मिळणार होते व धरण बांधल्यानंतर ५५ हजार एकर जमिनीला पाणी मिळणार होते. परंतु या भागातील लोकांचे हे स्वप्न उध्वस्त झाले आहे.

...८

या भागात शेती भरपूर आहे, पण पाणी नसल्यामुळे या शेतीचा शेतकऱ्यांना पाहिजे, तसा उपयोग होत नाही. आज त्यांची अवस्था अशी आहे की, त्यांच्या अंगावर कपडे नाहीत, पिण्याला पाणी नाही आणि खावयास अन्न नाही. अशा अवस्थमध्ये हे लोक दिवस कंठीत आहेत. त्यांचे हे दिवस कधी संपणार असा प्रश्न सर्वांना वाटतो. जर पानशेत धरण फुटले नसते तर त्या लोकांच्या हाल-अपेष्टा संपल्या असत्या. त्यांना चांगले दिवस पाहावयास मिळाले असते. खडकवासला धरणामुळे जवळजवळ २० हजार एकर जमीन भिजत होती. परंतु ते धरण फुटल्यामुळे त्या भागाची काय अवस्था झाली आहे, याचा सभागृहाने विचार केला पाहिजे. त्या धरणाची दुरुस्ती शक्य तितक्या लवकर करण्यात आली पाहिजे. त्या भागातील असंख्य कुटुंबांची दयनीय अवस्था झाली आहे. परंतु हे धरण दुरुस्त करण्याचा कोणत्याही तऱ्हेचा प्रयत्न होत नाही, ही मोठी वाईट गोष्ट आहे. या दृष्टीने सरकारने प्रयत्न केले पाहिजेत कारण आपल्याला या राज्याला सुजलाम् सुफलाम् करावयाचे आहे. जनता सुखी झाली पाहिजे, अशी कल्पना यामागे असली पाहिजे. पानशेत धरण लवकर पूर्ण करण्याच्यामागेदेखील हाच हेतू होता. धरण फुटण्याच्या घटना आपल्याच देशात झाल्या, असे नाही, तर इटलीमध्ये झाल्या, अमेरिकेमध्ये झाल्या. तेव्हा धरण फुटले, आता पुढे काय ? जो उद्देश धरण बांधण्यामागे होता, तो किती दिवस आता लांबणीवर पडणार आहे ? अडीच वर्षे चौकशीला लागली. आणि हे धरण मातीचे बांधावे की सिमेंटचे बांधावे, यातच किती तरी वेळ निघून गेला आहे. मला सरकारला इतकेच विचारावयाचे आहे की, या दुर्दैवी लोकांची कहाणी केव्हा संपणार आहे ? या लोकांचा आवाज सभागृहापुढे ठेवावा, या दृष्टीनेच मी या सर्व गोष्टी सभागृहापुढे ठेवल्या आहेत. तेव्हा हे धरण लवकरात लवकर हाती घेऊन पूर्ण करावे व या भागातील असंख्य कुटुंबांचा दुवा घ्यावा, अशी विनंती मला करावयाची आहे.

मी सांगत होतो की पुण्याचे त्यावेळचे कलेक्टर आणि विभागीय कमिशनर यांच्याशी माझा कामानिमित्त बरेच वेळा संबंध येत असे. त्यामुळे आमची चागली ओळख होती. असेच बोलत असताना मी कलेक्टरना एकदा विचारले की, या एकूण प्रकारासंबंधाने आपले काय मत आहे, तेव्हा त्यांनी कबूल केले

की एवढा मोठा आघात होईल, अशी त्यांची कल्पना नव्हती. यानंतर कमिशनर साहेबांशीही माझे या प्रश्नासंबंधाने बोलणे झाले. त्यांनी मला सांगितले की, धरण फुटले आहे, हे कळूनही मी पुणे सोडून मुंबईला जाईन अशी लोकांची कल्पना तरी कशी होते हे मला कळत नाही. १२ तारखेला सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी धरण फुटले. डेक्कन क्वीनने मला मुंबईला जावयाचे होते. ती गाडी त्यावेळस पुणे स्टेशनवरून ७ वाजून २५ मिनिटांनी सुटत होती. ती गाडी पकडण्याकरिता मला सात वाजता किंवा सात वाजून पाच मिनिटांनी घरातून बाहेर पडणे जरूर होते. त्याप्रमाणे मी बाहेर पडलो. बाहेर पडण्याच्या आधी धरण फुटले आहे, हे मला कळले असते तर मी मुंबईला जाणे कसे शक्य होते ? त्यांच्या या म्हणण्यात अविश्वासार्ह असे काही होते असे मला वाटत नाही. आमच्यासारखा सामान्य मनुष्य जेथे धरण फुटल्याचे कळल्यावर बेचैन झाला आणि शक्य ती मदत पुण्याला पाठवू लागला, तेथे जबाबदारीच्या जागेवर काम करणारे श्री. मोहित्यांसारखे अधिकारी आपले कर्तव्य पार पाडण्यास चुकतील असे मला वाटत नाही. १९५८ साली जेव्हा दौंडमध्ये महापुराचे पाणी शिरून हाहा:कार उडाला होता, तेव्हा तेथील लोकांना हरप्रकारची मदत देण्याची आम्ही व्यवस्था केली होती. अर्थात १९५८ सालाप्रमाणे १९६१ सालचा पानशेतचा पूर दौंडपर्यंत पोचला नाही, ही गोष्ट खरी, कारण १९५८ सालचा पूर वेगळ्या स्वरूपाचा होता. आणि १९६१ चा पूर वेगळ्या स्वरूपाचा होता. असो, मला त्यासंबंधाने जास्त बोलावयाचे नाही. जाता जाता मला एवढेच सांगावयाचे आहे की, पानशेत आणि खडकवासला या धरणांमुळे ज्या लोकांचे अपरिमित नुकसान झाले आहे, त्यांना खऱ्या अर्थाने दिलासा द्यावयाचा असेल तर ही दोन्हीही धरणे शक्य तितक्या लवकर बांधून काढली पाहिजेत, तरच त्या लोकांची झालेली हानी काही अंशाने भरून येऊ शकेल."

१९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे वारे सुरू झाले. मामासाहेबांना निवडणुकीस उभे राहण्याची इच्छा नव्हती. मात्र आपल्या जिल्ह्यातील सर्व काँग्रेस उमेदवार निवडून आणण्याची त्यांनी जिद्द बाळगली होती. कोणास कोठे उभे करावे, याची यादी जिल्हाध्यक्ष या नात्याने त्यांनी केली. यादी पार्लमेंटरी बोर्डापुढे ठेवली: एकएका मतदार संघाचा विचार सुरू झाला. मामासाहेबांनी सुच-

विलेली नावे मंजूर करण्यात आली. मावळ तालुक्याचा उमेदवार निवडताना मात्र पार्लमेंटरी बोर्ड थांबले. सुचविलेल्या नावाला पार्लमेंटरी बोर्ड तयार होईना. पार्लमेंटरी बोर्डाची इच्छा वेगळी होती. म्हणून घोडे अडले होते. मामासाहेव मोहोळ यांनी मावळ तालुक्यातून उभे राहावे, ही ती इच्छा !

पार्लमेंटरी बोर्डाने विचारपूर्वक हा निर्णय घेतला होता. मावळ तालुक्यातील जागा अजूनपर्यंत कॉंग्रेसला काबीज करता आली नव्हती. तेव्हा मामासाहेबांना " तुम्हीच उभे राहा " असे पार्लमेंटरी बोर्डाने सांगितले.

मामासाहेबांनी विचारासाठी आठ दिवस मागून घेतले. पक्षाचा आदेश मानण्याचे ठरविले व मावळ मतदार-संघातून निवडणुकीस उभे राहिले. झाले, झंझावाती दौरा सुरू झाला. गाव नि गाव मामासाहेबांनी पायाखाली पालथा घातला. मतदारांपुढे इतर पक्षांची किंवा उमेदवारांची निदानालस्ती करण्याचा मार्ग मामासाहेबांना मुळीच पसंत नव्हता. मामासाहेब लढवय्या माणूस. मतदारांपुढे जनसंघ, कम्युनिस्ट, सोशालिस्ट व कॉंग्रेस यांची मतप्रणाली स्पष्ट शब्दात मांडली व त्यांना विनंती केली की बाबांनो, तुम्हांस जी भूमिका पटेल त्या पक्षाला मते द्या.

मामासाहेव बोलतात ते हृदयाला भिडते. त्यांचे भाषण भावनेने ओथंबलेले असते. त्यात मखलाशीचा अभाव असतो. त्यांच्या भाषणात एक प्रकारचे ओज असते. त्यामुळे त्यांच्या भाषणाचा प्रभाव लोकांवर पडतो.

निवडणुकीच्या मामल्यात अनेक घडामोडी होत असतात. कॉंग्रेस व जनसंघ यांनी तळेगाव ते लोणावळा अशा सायकलस्वारांच्या मिरवणुकी काढायच्या ठरविल्या. एकाच दिवशी दोन्ही मिरवणुका निघाल्या. हजारो सायकलस्वार मिरवणुकीत सामील झाले. कॉंग्रेस व जनसंघ यांचा अटीतटीचा सामना होता. पोलिसांनी वाका प्रसंग येऊ नये म्हणून दक्षता घेतली होती. दोन्ही मिरवणुका लोणावळचास पोहोचल्या. दिलेल्या वेळेपेक्षा उशीर झाला होता. त्यामुळे कॉंग्रेसच्या सभेला पंधरा मिनिटेच मिळणार होती. कार्यकर्त्यांत खळबळ माजली. वातावरण तंग होऊ लागले. पोलिसांची कुचंबणा होऊ लागली. मामासाहेव पुढे आले, त्यांनी नियमाचे पालन केले पाहिजे असे सांगितले व जी पंधरा मिनिटे

सभेसाठी मिळाली होती, तेवढ्या थोड्या अवधीत मुद्देसूद व लोकांच्या मनाचा ठाव घेणारे भाषण केले. भाषण छोटे झाले, पण प्रभाव मोठा पडला. मामासाहेबांनी तंग परिस्थितीत जो मनाचा समतोलपणा राखला व कायदा पाळायची जी तत्परता दाखविली. त्यामुळे लोकांच्या मनावर फार अनुकूल परिणाम झाला.

निवडणुकीचा निकाल लागला. मामासाहेबांना सव्वीस हजारांवर मते पडली. प्रमुख विरोधकास तेरा हजारांवर मते पडली. काहींच्या डिपॉझिट रकमा जप्त झाल्या.

आजवर काँग्रेसला न मिळालेली मावळची जागा या खेपेस काँग्रेसने जिंकली. मामासाहेबांच्या कार्यपद्धतीचा विजय झाला.

मामासाहेब विधानसभेत गेले. तेथेही त्यांनी आपल्यापरीने लोकांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. मावळ भागाच्या दु:खाचा त्यांना स्वत:ला अनुभव होता. डोंगर माथ्यावरील पठारी मुलुखाचा विकास झाल्याशिवाय गत्यंतर नाही, अशी त्यांची ठाम भूमिका. ही भूमिका त्यांनी विधानसभेत वारंवार मांडली आहे.

१९६३–६४ सालचे अंदाजपत्रक अर्थमंत्र्यांनी विधानसभेत सादर केले. त्यावेळी मामासाहेबांनी केलेले भाषण खाली दिले आहे.

" नामदार अर्थमंत्र्यांनी १९६३–६४ सालचे जे अंदाजपत्रक सभागृहासमोर सादर केलेले आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. कृषि-उद्योग समाज निर्माण करण्याचे जे धोरण आपल्या सरकारने स्वीकारलेले आहे, त्याला अनुसरून या अंदाजपत्रकात काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. औद्योगिकदृष्ट्या प्रगती करण्याच्या दृष्टीने आपल्या राज्यात औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. ग्रामीण भागात आणि निमशहरी भागात एकूण ४३ औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचे या अर्थसंकल्पात योजिले आहे. शहरी विभागात १२ औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. एका जिल्ह्यात प्रयोग म्हणून जिल्हा औद्योगिक मंडळ स्थापन करण्याचे ठरलेले आहे. याशिवाय चार जिल्ह्यांत ग्रामीण औद्योगिक योजना सुरू करण्याचे ठरविलेले आहे. याशिवाय अमरावती येथे इंजिनियरिंग कॉलेज आणि नांदेड व यवतमाळ येथे दोन नवीन पोलिटेकनिक

संस्था स्थापन करण्याचे ठरविलेले आहे. बीड व लातूर येथे नवीन टेक्निकल हायस्कूल्स काढण्याचे ठरविलेले आहे. औद्योगिक शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ४४०० होती, ती तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ११,००० करण्याची तरतूद केलेली आहे. युद्धोपयोगी कारखानदारीस लागणारे तंत्रज्ञ तयार करण्यासाठी या वर्षाला ६९४ जागांची वाढ करण्यात आलेली आहे. आपल्या राज्याचे औद्योगिक उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने जी काही तरतूद आपण अंदाजपत्रकात केलेली आहे, ती पाहिल्यानंतर राज्याची प्रगती करण्याच्या दृष्टीने आपल्या राज्यात निश्चितपणे पाउले पडणार आहेत, असे आढळून येते. मोठे उद्योग, कृषि-उद्योग यांची वाढ व्हावी, शेतीचे उत्पादन वाढावे, याकरिता निरनिराळ्या नवीन योजनांचा समावेश तृतीय पंचवार्षिक योजनेत करण्यात आलेला आहे.

मराठवाडा, विदर्भ आणि कोकण या अविकसित विभागांचा विचार करून या भागात जेवढ्या योजना घेता येणे शक्य आहे, तेवढ्या घेण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि या विभागाला प्राधान्य देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आणीबाणीच्या काळात ज्या विषयांना जास्तीत जास्त महत्त्व देणे जरूर असते, त्यांना योग्य ते महत्त्व देण्यात आलेले आहे. विशेषतः खेड्यापाड्यांतून आणि जिल्ह्यातून जास्तीत जास्त तरुण होमगार्डमध्ये कसे भरती होतील याविषयी काही योजनांचा समावेश या अर्थसंकल्पात आहे. होमगार्ड आणि इतर सैनिकी शिक्षण राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने देण्यात येत असले तरी नोकरीच्या निमित्तानेही अनेक तरुण या शिक्षणात सहभागी होऊ लागलेले आहेत. तरुणांना सैनिकी शिक्षण देण्याचे काम सुरूही करण्यात आलेले आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून या देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने जी पाऊले टाकली जात आहेत आणि ठरविण्यात आल्याप्रमाणे गोष्टी केल्या जात आहेत, त्यांत या वर्षीही सरकार कोणत्याही प्रकारे मागे राहिलेले नाही, असे दिसते. या ठिकाणी मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, विकासाची वाटचाल करीत असताना आणीबाणीच्या काळात ज्या काही गोष्टी करणे जरूर होते, त्या करण्याकरिता या अंदाजपत्रकात विशेष जोर देण्यात आलेला आहे. शेती आणि उद्योग या गोष्टींवर जास्तीत जास्त जोर दिला आहे आणि त्या दृष्टीने या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात

कोणत्याही प्रकारे सरकार मागे राहिलेले नाही. शेती उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने विदर्भात तलावांच्या दुरुस्तीचा प्रश्न हाती घेण्यासंबंधीची तरतूद अर्थ-संकल्पात करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्यात निरनिराळ्या ठिकाणी पाणी अडविलेले नसल्यामुळे त्या पाण्याचा उपयोग शेतीला होत नव्हता. तेव्हा लहान लहान नद्या अडवून त्यांचे पाणी शेतीला पुरविण्याच्या योजना हाती घेऊन त्या पुऱ्या करण्याचे ठरविलेले आहे. त्याचप्रमाणे कोकणमध्ये लोकांना निरनिराळ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. तेथे दळणवळणाची साधने अपुरी आहेत. त्यामुळे या भागातील लोकांना मुंबई शहराशी संबंध ठेवणे कठिण जाते. या अडचणी दूर करण्यासाठी त्या ठिकाणी रस्त्यांचे काम आणि रेल्वेचे काम सुरू करण्यासाठी योजना सुरू केल्या आहेत. त्याचप्रमाणे विदर्भ हा अनेक वर्षे हिंदी भाषी मुलखाशी संलग्न होता. त्यामुळे या भागाच्या विकासा-कडे दुर्लक्ष झाल्यामुळे या भागाचा विकास झाला पाहिजे ही गोष्ट खरी आहे. त्याप्रमाणे त्या भागाच्या विकासाकरिता निरनिराळ्या योजना कार्यान्वित करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे मराठवाडा हा भाग एका संस्थानाशी संलग्न होता. मराठवाड्याचे पाच जिल्हे महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांच्या विकासाकडे जास्त लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हा अविकसित भाग आहे. त्या-दृष्टीने योजनाबद्ध कार्यक्रम आखण्याला सुरुवात झाली आहे. म्हणजे सर्व अविकसित भागांच्या विकासाला योजनाबद्ध रीतीने सुरुवात झाली आहे. या गोष्टींची फळे आपल्याला चार दिवसांत किंवा एक वर्षात दिसणार नाहीत कारण विकासाचे काम वर्षानुवर्षे चाललेले असते. अध्यक्ष महाराज, या सर्व भागांच्या विकासाच्या दृष्टीने कामाला सुरुवात झाली असली तरी आपल्या या महाराष्ट्रात एक भाग असा आहे की, त्याकडे अजून कोणी लक्षही दिलेले नाही आणि तो भाग म्हणजे मावळ भाग होय. हा भाग सह्याद्रीच्या पठाराचा आहे व तो नाशिक पासून कोल्हापूरपर्यंत पसरलेला आहे. या भागाच्या विका-साच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले नाहीत, ही गोष्ट नमूद करा-वयास हरकत नाही असे मला वाटते. या भागातील शेतीची सुधारणा करण्यास सुरुवात झाली नाही, या भागात दळणवळणाची साधने नाहीत. त्या दृष्टीनेही प्रयत्न झाला नाही.या भागात उद्योगधंदे नाहीत म्हणून त्या भागातील लोक मुंबई

शहरात येऊन मजुरी किंवा हमाली करताना दिसतात. त्या भागातील लोकांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविण्याच्या कामी फार मोठे मोलाचे कार्य केले आहे. शिवाजी महाराजांनी जेव्हा स्वातंत्र्याचा लढा सुरू केला, तेव्हा सर्वप्रथम त्यांच्या मागे जर कोणी उभे राहिले असेल तर त्या भागातील मावळे. मावळ्यांचा उल्लेख केला नाही, तर महाराष्ट्राचा त्या वेळचा इतिहास पूर्ण होऊ शकणार नाही. असे महत्त्वाचे कार्य या लोकांनी केले असताना या लोकांच्याकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे. स्वराज्य येऊन पंधरा वर्षे झाली तरी या लोकांची लंगोटी आणि काठी सुटली नाही. तेव्हा या लोकांच्या विकासाकरिता योजनाबद्ध कार्यक्रम आखून त्या भागाचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे.

या ठिकाणी मांडलेल्या बजेटवर बोलताना काही सन्माननीय मित्रांनी मध्यवर्ती सरकारच्या कामावर टीका करण्याचा प्रयत्न केला आहे. मला त्यांना सांगावयाचे आहे की जे काम आपल्या हातात आहे, यासंबंधी आपण बोलावे व त्यावर जरूर टीका करावी. परंतु जे काम आपल्या हातचे नाही, त्यासंबंधी बोलण्यात काय उपयोग ? त्याचप्रमाणे ज्यांनी या बजेटमध्ये उणीवा दाखविल्या, त्यांनी त्या भरून काढण्यासाठी उपाययोजना किंवा विधायक सूचना केल्या नाहीत. महाराष्ट्राने आपले पाऊल कोणत्या दिशेने टाकावे, यासंबंधी विधायक सूचना कराव्यात."

त्याचप्रमाणे बांधकाम खात्याची मागणी सभागृहापुढे चर्चेस आली असता मामासाहेबांनी मावळ भागाच्या गरजेसंबंधी जे भाषण केले आहे, ते खाली दिले आहे.

"आज बांधकाम खात्याची मागणी सभागृहात मांडण्यात आली असून, त्यावर मी माझे विचार मांडणार आहे. कोकणच्या लोकांनी आपल्या अडचणी सभागृहासमोर ठेवल्या, मराठवाड्याच्या मंडळींनी आपल्याकडील अडचणी सभागृहासमोर ठेवल्या. आता मी मावळ विभागाच्या काही अडचणी सभागृहासमोर ठेवणार आहे. मावळ हा या राज्यातील एक असा भाग आहे की, येथे दळणवळणाच्या अनेक अडचणी पिढ्यान् पिढ्याच्या आहेत आणि त्याकडे अजूनही जितके लक्ष सरकारने द्यायला पाहिजे तितके दिलेले नाही, हे मोठ्या

खेदाने म्हणावे लागते. पुण्यापासून मुळशीकडे जायला एक रस्ता आहे आणि तो या मावळ भागातूनच आहे. हाच महत्त्वाचा रस्ता या विभागात आहे. परंतु पावसाळ्याच्या दिवसांत या रस्त्यामध्ये येणारे जे ओढे आहेत, त्यांना जर पाणी आले, तर आठआठ दिवस रस्ता बंद होतो. दळणवळणाचे या रस्त्याशिवाय दुसरे साधनच नाही. परंतु या रस्त्यावर आवश्यक ते पूल आदि नसल्याने लोकांची पावसाळ्याच्या दिवसांत फार गैरसोय होते. या तालुक्याची लोकसंख्या ८० हजार आहे. निझामपुरा-माणगाव तालुक्याकडे जाणारा रस्ता जर या भागातून गेला, तर मावळ व कोकण येथील जनतेला त्याचा बराच फायदा होणार आहे. हा रस्ता मुळशीवरून जाणार आहे.

यानंतर पुणे–मुंबई रस्त्यावरील रहदारी कमी करण्याच्या दृष्टीने एक डायव्हर्जन रोड काढण्याची घोषणा सभागृहामध्ये सध्याचे मुख्यमंत्री यांनी केली होती. हा रस्ता लोणावळ्याहून आंबगाव–पौडवरून पुण्यास जाणारा असा जर रस्ता झाला तर त्याचा मावळ भागाला बराच फायदा मिळू शकेल आणि या रस्त्यामुळे मावळ–कोकण भाग जास्त जवळ येऊ शकेल. त्याचप्रमाणे घाटावरील नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या भागाचा जर काही ठिकाणी घाट फोडून रस्ते तयार केले तर या भागाचा आणि कोकण भागाचा निकटचा संबंध प्रस्थापित होऊ शकेल आणि मावळ भाग या हा दोहोंना सांधणारा दुवा होईल. मावळ भागात दरीखोरी अनेक असल्याने दळणवळणात बऱ्याच अडचणी येतात. कित्येक ठिकाणी तर रस्ते नसल्याने मुख्य रस्त्यापर्यंत यायलाच आतील भागातील लोकांना वीस–वीस मैल चालत यावे लागते. सोमाटणे–आंबगाव रस्त्यावर यायला लोकांना वीस मैल चालावे लागते. याशिवाय आणखीही एक रस्ता बेग्रे–पिरंगुट असा आहे की जेथे येण्यासाठी लोकांना वीस वीस मैल पायी चालावे लागते आणि इतरही अनेक विभाग असेच अडचणीचे आहेत. उदरनिर्वाहासाठी कित्येक तरुण लोकांना मुंबईला यावे लागते. तेव्हा या विभागाची जी रस्त्याची अडचण आहे, ती दूर झाली पाहिजे. येथे कित्येक रस्ते असे आहेत की यावर जे लहान लहान पूल करणे जरूर आहे, ते बांधले न गेल्याने किंवा पावसाळ्यात ओढेनाले बांधले नसल्यामुळे वाहतूक चारसहा महिने बंद राहाते. आणि सर्व जगाशी या भागाचा संबंध तुटल्या-

सारखा होतो. आताच या इमरजन्सीमुळे रस्त्यांच्या कामावर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर काट आलेली आहे. परंतु या विशिष्ट विभागाची गरज लक्षात घेऊन सरकारने मावळ भागातील रस्त्यांची कामे त्वरित हाती घेतली पाहिजेत. आज या भागातील लोकांचे जीवन या रस्त्यावर अवलंबून आहे. आणि म्हणून या भागात जर आपण चांगले रस्ते केले तर ते या लोकांना मोठे वरदानच ठरणार आहे. तेव्हा या गोष्टींकडे माननीय उपमंत्र्यांनी लक्ष द्यावे."

मावळचा विकास हे मामासाहेबांचे एक जीवित कार्य आहे. ते नेहमी म्हणतात, "मावळचा सर्वांगीण विकास झालेला पाहणे ही माझी अंतिम इच्छा आहे."

मावळविषयी ही त्यांची तीव्र निष्ठा. मावळात ते जन्मले. तेथील दुःखे त्यांनी अनुभवली. मावळच्या लोकांच्या दुःखाने त्यांचे हृदय पिळवटून निघते. मावळचा विकास झाला पाहिजे, हा त्यांनी घेतलेला ध्यास आहे. डोंगरी मुलखाचा विकास करण्यासाठी प्रयत्नांची ते पराकाष्ठा करीत आहेत. त्यांनी मावळ (डोंगरी) विभाग विकास परिषद स्थापन केलेली आहे. या परिषदेच्या अधिवेशनात स्वागताध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले भाषण हृदयाला पीळ पाडणारे आहे, तसेच मावळची सत्य स्थिती दर्शविणारे आहे.

"पश्चिम महाराष्ट्रातील मावळी भागातील सात जिल्ह्यांचे प्रतिनिधी व नागरिक या ठिकाणी आज एकत्र जमले आहेत. अशा स्वरूपाची परिषद घ्यावी, असा विचार गेली कित्येक वर्षे आमच्या मनात आहे. या परिषदेच्या निमित्ताने या भागातील लोकांच्या दारिद्र्याला व दुःखाला वाचा फोडावी असा उद्देश आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या मावळ्यांच्या सहकार्याने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्या मावळ्यांच्या वंशजांची आजची स्थिती स्वराज्य मिळाल्यानंतर १६ वर्षे होऊन गेली तरी अनुकंपनीय आहे.

मावळी भाग हा डोंगरी भाग आहे. या भागात महादेव कोळी, भिल्ल, मराठे आदि मागासलेले लोक राहातात. पश्चिम महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांतून या मागासलेल्या लोकांची वस्ती ३० ते ४० लाखांपर्यंत असेल. छत्रपतींच्या काळी या लोकांचे पूर्वज डोंगर विभागातील किल्ल्यांचे प्राण पणाला लावून संरक्षण करण्यासाठी त्या जागी जाऊन राहिले.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम........ वि:
क्रमांक ........ टाकीचे घाव



डोंगर माथ्यावर २०० इंच पाऊस पडावा व सारी जमीन उध्वस्त करीत त्या पावसाच्या पाण्याने नदीमधून सागर काढावा अशी अवस्था आहे. पाऊस खूप पडला तरी उन्हाळ्यात पिण्यास पाणी नाही, दुबार शेतीस पाणी नाही, अशा स्थितीत मावळी लोक कसेबसे जीवन कंठीत आहेत. या भागात उत्पन्न होणारे पीक जेमतेम तीन चार महिने पुरेल इतके असून, बहुसंख्य कुटुंबातील कर्त्या तरुणांना जीवन जगविण्यासाठी पुणे, मुंबई व अन्यत्र नोकरीसाठी धाव घ्यावी लागते.

हा साराच भाग अत्यंत डोंगराळ असल्याने याचा विकास साधावयाचा असल्यास अग्रहक्क कशास द्यावयाचा असेल तर तो रस्ते--बांधणीस द्यावयास हवा. अपुऱ्या दळणवळणाच्या साधनांमुळे व वाहतुकीच्या मार्गाच्या अभावामुळे या भागातील नैसर्गिक संपत्तीचा, मनुष्यबळाचा व इतर साधनांचा उपयोग पुरता होऊ शकत नाही.

या परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य सरकारकडे आमची अशी अग्रहक्क मागणी आहे की, गेल्या तीन पंचवार्षिक योजनात या अविकसित भागाकडे सरकारने द्यावे तितके लक्ष दिले नाही. तेव्हा चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात तरी मावळी विभागाच्या विकासासाठी किमान पंचवीस कोटी रुपयांची खास तरतूद करण्यात यावी व पश्चिम महाराष्ट्रातील या सात-आठ जिल्ह्यांतील डोंगरी भागातील विकासाचा पाया म्हणून मोठ्या प्रमाणावर रस्ते बांधणीचा कार्यक्रम प्रथमतः घ्यावा.

मावळी भागातील शेतीचा प्रश्न अत्यंत बिकट आहे. हे आपण जाणताच. डोंगर उतरणीवरून शेतीवर मोठ्या प्रमाणावर टेरेसिंग, बंडिंग, छोटे बंधारे केल्याशिवाय व शेती कामासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाचा पुरवठा केल्याशिवाय शेतकऱ्यांची स्थिती सुधारणे अशक्य आहे.

या भागात सहकारी संस्थांचे जाळे पसरून शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडीअडचणी दूर करणे शेतीसाठी सुधारलेली अवजारे बी--बियाणे, खते व तांत्रिक मार्गदर्शन खास सवलतीने देणे अत्यंत आवश्यक आहे. या भागातील शेतकरी कष्टास मागे पुढे पाहणार नाही. परंतु भांडवलाशिवाय त्याचे सारे कष्ट फोल ठरत आहेत व त्यास अर्धपोटी व अर्धनग्न जीवन कंठावे लागत आहे.

शेतीबरोबर प्रमुख जोडधंदा म्हणन दूध उत्पादन व कोंबडी पालनाचा व्यवसाय हाती घ्यावयास हवा. या व्यवसायामुळे मावळ भागातील परिस्थिती निश्चित सुधारेल. या बरोबरच जंगल संवर्धनाच्या प्रश्नासही चालना द्यावयास हवी. मावळात जंगल संपत्ती आजही विपुल आहे. गेल्या काही वर्षांत दुर्दैवाने निर्वाहाचे दुसरे साधन कोणतेही न राहिल्यामुळे या भागातील झाडांची जी अनिर्बंध तोड होत आहे, ती थांबली पाहिजे. यासाठी सरकारने कायद्याने व शेतकऱ्यांनी स्वयंखुषीने मनापासून प्रयत्न करावयास हवेत.

मावळातील मनुष्यबळाचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे, त्या त्या ठिकाणी छोटे उद्योग काढणे अतिशय गरजेचे आहे. अशा लहानसहान उद्योगात मनुष्यबळ गुंतविल्याखेरीज शेतीवरील ताण कमी होणार नाही व शेतकऱ्याचे जीवनमान सुधारणार नाही. नैसर्गिक व जंगल संपत्तीचा उपयोग तेथे कच्च्या मालावर प्रक्रिया करून लहान उद्योग निर्माण करणे शक्य आहे. उदा–गवतापासून पुठ्ठा, हिरड्यांपासून रंग इत्यादि.

नद्यांवर धरणे बांधली जात असताना ज्या शेतकऱ्यांची जमीन पाण्याखाली जात असेल, त्यांचे अन्यत्र पाण्याखालील जमीन देऊन पुनर्वसन केले पाहिजे. मावळी भाग हा आदिवासी विकास गटाप्रमाणेच मागासलेला असल्याने तशाच स्वरूपाच्या खास सवलती या सर्वच भागातील शेतकऱ्यांना देणे निकडीचे आहे.

अनेक विभाग मागासलेले समजून ज्या तरतुदी केल्या जातात, त्याचप्रमाणे हा मावळी भाग मागासलेला मानून त्याच्यासाठी स्वतंत्ररीत्या खास सवलती देऊन वर उल्लेखिलेल्या तरतुदी शक्य तेवढ्या लवकर कराव्यात ही आग्रहाची मागणी आहे."

मावळ भागाचा विकास होईपर्यंत मामासाहेब स्वस्थ बसणार नाहीत. अखंड सायास, अखंड धडपड, करीत राहणार आहेत.

मामासाहेब हे एकांडे शिलेदार नाहीत. कितीही कर्तबगार माणूस असला तरी तो एकटा सगळ्याच गोष्टी करू शकत नाही. त्याच्या कर्तृत्वाला मर्यादा असतात. दहा लोक करतील ते एकटा करू शकत नाही. संघशक्ती ही अमोघ शक्ती आहे. गाव करील ते राव करू शकणार नाही. या उक्तीत संघशक्तीचे सार साठविलेले आहे. मामासाहेबांना याची पूर्ण जाणीव आहे. लोकशाहीची

मूलभूत तत्त्वे त्यांच्यात रोमरोमी भिनली आहेत. म्हणूनच ते एकांडे शिलेदार बनले नाहीत. कोणतीही योजना कार्यवाहीत आणण्यासाठी अनेकांशी ते विचारविनिमय करतात व सर्वांच्या सहकार्याने ते ती पार पाडण्याचा प्रयत्न करतात. जिल्ह्याच्या प्रश्नांचा निर्णय घेताना जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांना ते एकत्रित आणतात. त्यांच्यापुढे प्रश्न ठेवतात. साधकबाधक चर्चा करतात आणि शेवटी सर्वानुमते निर्णय घेतात. एकटे कधी निर्णय घेत नाहीत. आपली मते इतरांवर लादत नाहीत. आपली मते पटवून देण्याचा अतोनात प्रयत्न करतात. सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याची त्यांची शैली आहे. प्रत्येक कार्यकर्त्याच्या कर्तृत्वाला त्यामुळे वाव मिळतो. अनुभव मिळतो. त्याचा आत्मविश्वास वाढतो. प्रत्येक कार्यकर्त्यावर त्याच्या आवडीचे व त्याला झेपेल असेच एक एक काम सोपवितात. त्यामुळे कार्यकर्तेही खूप असतात. संघटना कौशल्य आहे ते इथेच. पुणे जिल्हा काँग्रेसची संघटना एकसंध आहे ती यामुळेच. कार्यकर्त्यांचा विश्वास संपादन करण्यात मामासाहेबांनी यश मिळविले आहे. त्यांचे दुसरे एक वैशिष्टय आहे. ते म्हणजे ज्याने जे कार्य केले असेल त्याचे श्रेय त्याला द्यायचे. ते लुबाडायचे नाही. जाहीरपणे त्या कार्यकर्त्याचा गौरव करावयाचा ! ही वृत्ती दुर्मिळ असते, पण ती संपादण्यात मामासाहेब यशस्वी झाले आहेत.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना मोठेपणाची बाधा झालेली नाही ही होय. मीपणाचा त्यांच्या ठिकाणी अभाव आहे. आपली कुवत, परिस्थिती आणि गती ते चांगले ओळखून आहेत. म्हणून नसता बडेजाव ते कधी दाखवीत नाहीत. भलती लुडबुड करीत नाहीत. निःस्पृहपणे, निष्ठेने काम करीत राहाणे हा त्यांचा बाणा. नको ती प्रसिद्धी. करू या काम. या वृत्तीमुळे त्यांच्याकडे लोक आकर्षिले जातात. त्यांचा लोकसंग्रह फार मोठा आहे. सगळ्या थरातील आहे. सगळ्या क्षेत्रातील आहे. ते मानाच्या पाठी लागत नाहीत. उलट मात्र मान त्यांच्या पाठीशी लागतो. अशी स्थिती आहे. म्हणूनच मामसाहेबांच्या रूपान राबणारी सात्त्विक शक्ती महाराष्ट्राला लाभली आहे, असे वाटते.

राजकीय क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रातही मामासाहेब कार्य करीत आहेत. भोर येथे श्री शिवाजी को-ऑप. टेक्स्टाईल मिल आहे. ती बंद पडली होती. मजूर

बेकार झाले होते. मामासाहेबांनी तो प्रश्न हाती घेतला. मजूरमंत्र्यांना भेटले. वस्तुस्थिती सांगितली. त्यांच्यापुढे पर्याय योजना मांडली. मजुरांनी सहकारी तत्त्वावर ती गिरण सुरू करायची ही ती योजना. यशवंतरावजींना ही योजना फार आवडली. ही कल्पना नवीन होती. त्यांनी प्रयोगादाखल ती योजना स्वीकृत केली. सहकारी तत्त्वावर श्री शिवाजी को-ऑप. टेक्स्टाईल मिल सुरू झाली. मजुरांच्या बेकारीचा प्रश्न सुटला. मजूर मालक बनले. सहकारी तत्त्वावर गिरण चालविण्याच्या युगाचा या गिरणीने पाया घातला. श्री. शंकरराव भेलके यांनी मामासाहेबांना या कामी फार मदत केली. त्यांनीही जिवापाड श्रम घेतले.

मजुरांनी सहकारी तत्त्वावर चालविलेली महाराष्ट्रातील ही पहिली टेक्स्टाईल मिल ! वास्तविक या गिरणीच्या वाढीकडे सरकारने खूपच लक्ष द्यायला हवे होते. परंतु दुर्दैवाने तसे काही घडलेले दिसत नाही.

पूना डिस्ट्रिक्ट को-ऑप. बँक लिमिटेड या संस्थेचे मामासाहेब चेअरमन आहेत. पुण्यातील नामवंत मंडळींनी मामासाहेबांना चेअरमन होण्याबद्दल आग्रह केला, तेव्हा कोठे मामासाहेबांनी होकार दिला. मामासाहेबांनी बँकेची उपयुक्तता कशी वाढेल यावर मोठा कटाक्ष ठेवला आहे.

मामासाहेबांची एक नवी कल्पना म्हणजे पूरग्रस्तांसाठी घरे बांधण्याची योजना. एक रुपाया प्रवेश फी व दहा रुपये शेअरचे असे अकरा रुपये भरून सभासद व्हायचे. सरकारी मदतीने घरे बांधायची. यासाठी त्यांनी यशवंतनगर हौसिग सोसायटी काढली. त्यांपैकी एक कॉलनी पुरी झाली आहे. लोक राहायला गेले आहेत. गरिबांची ही हौसिग कॉलनी. मामांना गरिबांचा जिव्हाळा वाटतो. गरिबी म्हणजे काय हे त्यांना चांगलेच ठाऊक आहे.

या कल्पनेचे चांगलेच स्वागत झाले. त्यानंतर अनेकांनी ही कल्पना उचलली. तिचा प्रसार झाला.

मामासाहेब मानवतेचे पुजारी आहेत. नुकताच घडलेला प्रसंग. मावळ भागात ते गेले होते. कामकाज आटोपून परत पुण्यास येत होते. काही कार्यकर्ते जीपने पुढे गेले होते. डॉ. सुमनबाई खेर, आंबेगाव तालुका पंचायत समितीच्या अध्यक्ष व कडुलकर, दाभाडे वगैरे कार्यकर्ते जीपमध्ये होते. या जीपला अपघात झाला. कार्यकर्त्यांना खूप लागले. जवळपास कोणी नाही, रक्ताच्या धारोळ्यात

ही मंडळी कण्हत पडली होती. मागोमाग मामासाहेबांची गाडी आली. त्यांनी हे दृश्य पाहिले. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी नेसते धोतर टरकन फाडले आणि जखमा बांधल्या. जखमींना दवाखान्यात पोहोचविले. माणुसकीचा पाझर मामासाहेबांच्या ठायी आहे. मानवतेचा गहिवर त्यांच्या ठिकाणी वास करीत आहे.

प्रजासमाजवादी पक्षाने पंतप्रधान पंडित नेहरूंवर अविश्वास दाखविण्यासाठी गावोगावी अविश्वास मोर्चे काढले होते. पुण्यातही असा एक मोर्चा निघाला होता. मामासाहेबांना हा मोर्चा पाहून वाईट वाटले. भाग्यवशात् पंडित नेहरूंच्यासारखा युगपुरुष राष्ट्राला लाभतो. भारताला ते भाग्य लाभले होते. त्याचा आनंद मानायच्या ऐवजी त्या युगपुरुषावर अविश्वास दाखविण्याचा खटाटोप चालला होता.

मामासाहेबांचे मन उसळी मारून उठले. त्यांनी ताबडतोब विश्वास मोर्चा काढायचे ठरविले. खेडोपाड्यांतून अक्षरशः हजारो स्त्री–पुरुष स्वेच्छेने या मोर्चात सामील झाले होते. आपल्या लाडक्या पंतप्रधानावर आपले किती प्रेम आहे, किती विश्वास आहे, हे त्यांनी कृतीने दाखवून दिले, तो प्रचंड मोर्चा पुणेकर कधीच विसरणार नाहीत. मूठभर लोकांनी अविश्वास दाखवायचा जो प्रयत्न केला त्याला जनताजनार्दनाने विराट स्वरूप दाखवून गप्प केले. मामासाहेबांची कल्पना ही अशी स्वतंत्र व मुलखावेगळी असते.

सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र 'राज्याने' जिल्हापरिषदा व पंचायत समित्या कायदा पास केला. यानुसार १९६२ साली जिल्हापरिषदांच्या निवडणुकी झाल्या.

मामासाहेबांनी धोरणाने कर्तबगार तरुण मंडळी अगोदरच हेरून ठेवली होती. शंकरराव उरसळ हे त्यांपैकी एक. शंकरराव उरसळांसारखा सामाजिक कार्यकर्ता व पुण्याचे महापौर पदावर विराजमान झालेला तडफदार तरुण जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर आल्यास ठीक होईल अशी मामासाहेबांची भावना या धोरणाने त्यांनी शंकररावांचे नाव पुरंदर मतदारसंघात अगोदरच दाखल केले होते. त्या मतदारसंघात शंकरराव

उरसळ यांच्या प्रचारासाठी मामासाहेबांनी आघाडी उघडली होती. शंकरराव निवडून आले आणि मामासाहेबांच्या संकल्पाप्रमाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षही झाले. राजकारणापासून अलिप्त पडू लागलेल्या शंकररावांना मामासाहेबांनी परत राजकारणात खेचले व जनसेवेस जुंपले. शिवाजीराव काळे यांनाही मामासाहेबांनीच कार्यान्वित केले. ते प्रजासमाजवादी पक्षातून काँग्रेसमध्ये आले होते. १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी हार खाल्ली होती. मामासाहेबांनी त्यांना धीर दिला. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीस उभे राहण्याची संधी दिली आणि निवडून आल्यावर जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदाची जोखीमही त्यांच्यावर टाकली.

विठ्ठलराव सातव यांचा शैक्षणिक संस्थांच्या कारभाराचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना जिल्हापरिषदेच्या शिक्षण समितीचे चेअरमनपदी विराजमान केले. विठ्ठलराव सातव हे राजकारणात नव्हते. पण मामासाहेबांनी त्याच्या ठायी असलेल्या गुणांचा उपयोग करून घेतला.

अण्णासाहेब मगर हे बुद्धिवान कार्यकर्ते. ते विधानसभेवर निवडून आलेलेच होते. तथापि आर्थिक क्षेत्रात त्यांचा उपयोग करून घेण्याचा मामासाहेबांचा मानस म्हणून आण्णासाहेब मगर यांना तालुका खरेदी-विक्रीसंघाचे प्रतिनिधी म्हणून पूना डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बॅन्केवर निवडून घेतले व त्यांना व्हाईस चेअरमन केले. बॅन्केचा कारभार पाहण्याची संधी त्यांच्यापुढे ठेवली.

साहेबराव सातकर हे बॅन्केत व्हाईस चेअरमन होते. जिल्हा परिषदेत काम करण्याच्या इराद्याने त्यांनी त्या जागेचा राजीनामा दिला. तो मामासाहेबांच्या सल्ल्यानेच. जिल्हा परिषदेमध्ये त्यांचा सहकार चळवळीतील अनुभव लक्षात घेऊन सहकार व बांधकाम समितीचे चेअरमन त्यांना करण्यात आले.

बेलवडयाचे शंकरराव ढमाले. मुळशी तालुक्यातील उमदे कार्यकर्ते. यांची कार्यतत्परता ध्यानी घेऊन मुळशी तालुका पंचायत समितीचे अध्यक्षपद त्यांना बहाल केले.

भोरचे शंकरराव भेलके. राजकीय क्षितिजावरील तरुण पण धडाडीचे कार्यकर्ते. मामासाहेबांच्या बरोबर निवडणुकीच्या धामधुमीत हिंडलेले. १९५२ सालच्या लोकलबोर्डाच्या निवडणुकीत निवडून आले. त्यांना लोकलबोर्डाचे अध्यक्ष करण्यात मामासाहेबांचा वाटा मोठा आहे. तसेच १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी मामासाहेबांनी शंकरराव भेलक्यांच्या नावाचा उमेदवार म्हणून पुरस्कार केला होता.

शंकरराव पाटील उपमंत्री झाले त्यामागे मामासाहेबांचा प्रयत्न होता. मावळ तालुका पंचायत समितीच्या अध्यक्षपदी एक महिला आहे. डॉ. सुमन खेर. महिला अध्यक्ष असलेली महाराष्ट्रातील ही एकमेव पंचायत समिती. सुमन खेरांची निवड करण्यात मामासाहेबांचे पुरोगामित्व दिसून येते.

अशा रितीने गुणागुणांचा विचार करून योग्य माणसे योग्य ठिकाणी बसविण्यात मामासाहेबांनी कौशल्य दाखविले, म्हणून तर कारभार सुधारणेबरोबरच वळकट संघटना त्यांना साधता आली. जिल्हाध्यक्ष या नात्याने त्यांनी ही भरीव कामगिरी केली म्हणावयास हरकत नाही.

## प्रकरण १४ वे

कुस्ती हा मामासाहेबांचा जिव्हाळ्याचा विषय. कुस्तीचे विलक्षण आकर्षण त्यांना आहे. लहानपणी आपण नामवंत पैलवान व्हावे, ही त्यांची मनीषा. ती पुरी करण्यासाठी त्यांनी जिवाचा आटापिटा केला. ते नामवंत पैलवान म्हणून गाजले. कुस्तीमुळे त्यांना निरोगी शरीरसंपदा लाभली, तद्वतच निरोगी विचारसंपदाही लाभली. ते उत्तम खेळाडू होते. त्यांच्या अंगी त्यामुळे खिलाडूवृत्ती बिंबली. मामासाहेबांच्या आयुष्याला इष्ट वळण लागले, ते मल्लविद्येमळे. मल्लविद्येची उपासना त्यांच्या आयुष्यात अनेक प्रकारे उपयोगी पडली. मल्लविद्येचा ध्यास अजूनही त्यांना आहे. मल्लविद्येचा प्रसार झाला पाहिजे, असे त्यांना वाटते. नुसते वाटत नाही तर त्यासाठी ते अक्षरशः चंदनाप्रमाणे झिजत असतात. मल्लविद्येचा पद्धतशीर प्रसार करणे हे त्यांनी जीवनाचे कार्य मानले आहे.

कोल्हापूरच्या राजर्षी शाहू छत्रपतींच्या निधनामुळे महाराष्ट्रातील मल्लविद्येचा आधारस्तंभ तुटला. करवीरी जरी मल्ल होते, कुस्त्यांची मैदाने होत होती, तरी पूर्वीचा जोम व शान ओहोटीला लागलेली दिसत होती. बाकीचे

संस्थानिक जेवढ्यास तेवढा कुस्तीचा पोक करीत. पुढे पुढे तर तालमींकडे व पैलवानांकडे बरेच दुर्लक्ष झाले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा भडकत चालला. सर्वांचे लक्ष या 'न भूतो न भविष्यती' लढ्यामध्ये गुंतले. बाकीच्या गोष्टींकडे लक्ष पुरवायला कोणाचेच चित्त थाऱ्यावर नव्हते. मल्लविद्येची स्थिती खालावत गेली. तालमी रोड होऊ लागल्या. भरदार पैलवान दिसेनासे झाले. तालमी–तालमींतून कलह सुरू झाले. अनिष्ट परंपरा त्यात शिरल्या. आणि अशी वेळ येऊन ठेपली की, भारताची उज्ज्वल परंपरा असलेली मल्लविद्या मुमुर्षु झाली की काय, असा संभ्रम निर्माण व्हावा.

कुस्ती ही लोककला. लोक तिला आपल्यापरी जगवायचा प्रयत्न करीत होते. संस्थानिक लाजेकाजेस्तव पैलवानांना आश्रय देत होते. परंतु १९४८साली संस्थाने विलीन झाली आणि मल्लविद्येचा उरला सुरला राजाश्रय संपला. मल्लविद्या वनवासी झाली. स्वातंत्र्योत्तर काळात ताबडतोब सरकारचे लक्ष मल्लविद्येकडे गेले नाही. एक प्रकारे तिची उपेक्षा झाली. मल्लविद्या पोरकी झाली.

मामासाहेबांना मल्ल विद्येला आलेले हे नादारपण डाचत होते. मल्लविद्या ही पराक्रमाची–पौरुषाची जननी आहे. तिची ही केविलवाणी झालेली अवस्था त्यांना पाहवत नव्हती. त्यांना भडभडून येत होते. पण करणार काय ? योग्य संधी आल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नसते. अनुकूल वेळेची वाट पाहात बसण्याखेरीज गत्यंतर नव्हते.

मामासाहेबांनी पुण्यात मुक्काम ठोकला होता. १९५१ साली त्यांनी पुण्यात घर बांधले व ते पुणेकर झाले.

कोल्हापूर खालोखाल पुणे हे कुस्तीचे केंद्र. पुण्यात शे–सव्वाशे तालमी. या तालमींत पैलवानांपेक्षा हेवेदावेच फार. मध्ये मध्ये कुस्त्यांची मैदाने व्हायची, पण तंट्याशिवाय पार पडायची नाहीत. कुस्तीकलेची प्रतिष्ठा उतरतीला लागली होती. लोक पैलवानी पेशाकडे आदराने पाहावच्या ऐवजी तुच्छतेने पाहात. पैलवान म्हणजे दांडगेश्वर असे समीकरण होऊ लागले होते. लोक पैलवानीपेशापासून दूर दूर जात होते.

मल्लविद्येची आबाळ थांबविण्याचा प्रयत्न पुण्यातील कुस्तीगिरांनी केला. त्यांनी पुणे राष्ट्रीय तालीम-संघ स्थापन केला. या संघाचा इरादा होता कुस्तीकलेला सावरून धरण्याचा. या संघामार्फत कुस्त्यांची मैदाने होत. पण त्यात खिलाडूवृत्तीचा अभाव दिसून येई.

मामासाहेब कुस्त्या पाहायला जात. मैदानात घडणारे प्रकार पाहून विपण्ण-चित्त होत. तालीम संघाच्या कार्यकर्त्यांशी त्याबाबत खूप विचारविनिमय करीत. कुस्तीत शिरलेल्या अनिष्ट परंपरा नाहीशा केल्याशिवाय कुस्तीकलेला उर्जितावस्था येणार नाही, याची खात्री मामासाहेबांना पटली. एखादा पैलवान एखादे वेळी पडला की तो कायमचा बाद होत असे. परत त्याला जोड दिली जात नसे. होतकरू पैलवानांची त्यामुळे कुचंबणा होई. कुस्तीकलेचे हे खच्चीकरणच तालीमसंघाने असल्या अनिष्ट चाली मोडण्याचा प्रयत्न केला. चार चार तास त्यांच्या घरात बैठकी चालत. चर्चा होई. खडाजंगी होई. रक्त आटवून मामासाहेब रास्त गोष्टींचा पाठपुरावा करीत व कौशल्याने त्या इतरांच्या गळ्यात उतरवीत. यावेळेपावेतो मामासाहेब पुणे राष्ट्रीय संघाचे उपाध्यक्षही झाले होते.

ते राजकारणाच्या धक्काबुक्कीच्या मामल्यात शिरले असले तरी त्यांच्या डोक्यात मल्लविद्येच्या विकासाचे विचार सदैव घोळत असत. त्यांनी विचार केला. पुण्यापुरते मल्लविद्येच्या सुधारणेचे कार्य मर्यादित ठेवून त्याचा फारसा उपयोग होणार नाही. मल्लविद्येला चांगले दिवस यावयाचे असतील तर कार्याची उभारणी विस्तृत पायावर पद्धतशीरपणे केली पाहिजे. सबंध राज्य हे क्षेत्र ठरविले पाहिजे. पायाशुद्ध विचारसरणीवर सबंध मुंबई राज्यासाठी कुस्तीगीर परिषदेची उभारणी केली पाहिजे. प्रभावी संघटनेशिवाय कुस्तीकलेला तारण्याचा दुसरा उपाय नाही.

मामासाहेबांनी आपला हा विचार पुणे राष्ट्रीय तालीमसंघाच्या कार्यकर्त्यांच्या गळी उतरविला. पुणे राष्ट्रीय तालीमसंघाने तसा ठराव केला. गावोगावी, जिल्ह्यांजिल्ह्यातून पत्रे पाठविली. अनेकांना ही कल्पना पटली. राज्य-संघटना करण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप येण्याचे लक्षण दिसू लागले.

पुणे राष्ट्रीय तालीमसंघाने पुढाकार घेऊन मुंबई राज्य कुस्तीगीर परिषदेचे अधिवेशन पुणे येथे घ्यावयाचे ठरविले. हेच राज्य कुस्तीगीर परिषदेचे पहिले अधिवेशन होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ........................ वि: ..........
क्रमांक ........................



या परिषदेचे स्वागताध्यक्ष मामासाहेब मोहोळ होते. ते भाऊसाहेब हिरे यांना भेटले. मनीचा हेतू सांगितला. परिषदेची भूमिका व ध्येय विस्ताराने सांगितले. सगळे ऐकून भाऊसाहेब हिरे हसले व थट्टेच्या सुरात म्हणाले, " मामा, आता तुम्ही पैलवानांची संघटना बांधायला निघालात ! अजब आहे तुमचे काम ! " त्यांच्या हास्यातून व बोलातून " काय वेडयासारखं करायला निघालात मामा तुम्ही. आवळयाची मोट नि पैलवानांची संघटना कधी कुणाला बांधता येईल का ? " असा भाव ओसंडून वाहत होता. भाऊसाहेब हिऱ्यांच्या बोलण्यात सत्यता होती. पैलवान आणि पर्यायाने कुस्तीकला जनतेत थट्टेचा विषय बनली होती. भाऊसाहेब हिरे यांनी नर्म विनोदाने ती व्यक्त केली एवढेच. भाऊ-साहेबांच्या बोलाने मामासाहेब हिरमुसले झाले नाहीत. त्यांनी जीव तोडून परिषदेची भूमिका पटवून देण्याचा प्रयत्न केला. मामासाहेबांची तळमळ व कळकळ पाहून भाऊसाहेब हिरे यांनी परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष-स्थान स्वीकारण्याचे कबूल केले.

श्री. बाळासाहेब देसाई व मामासाहेब मोहोळ यांचे जवळकीचे संबंध होते. कोणतीही गोष्ट करावयाची झाली की, मामासाहेब बाळासाहेबांचा सल्ला घेत. त्यांच्याशी विचारविनिमय करीत. मामासाहेबांनी स्वागताध्यक्षाचे भाषण लिहून तयार केले व बाळासाहेब देसाई यांना दाखविले. बाळासाहेबांनी ते लक्ष-पूर्वक वाचले. त्यात योग्य त्या दुरुस्त्या केल्या आणि ते म्हणाले, " मामा, तुम्ही हे फार मोलाचे आणि महत्त्वाचे कार्य अंगावर घेतले आहे. हे कार्य जर यशस्वी-पणे पार पाडलेत, तर चिरकाल टिकणारी मोठी कामगिरी तुमच्या हातून होईल. पिढयान् पिढया लोक तुम्हांला दुवा देतील. राष्ट्राची अभूतपूर्व सेवा तुमच्या हातून घडेल. "

बाळासाहेब देसाई यांचा द्रष्टेपणा या उद्गारावरून दिसून येतो. त्यांनी बलोपासनेतील सुप्त शक्ती ओळखली होती. म्हणूनच त्यांनी मामांना प्रोत्साहन दिले. कुस्ती हा थट्टेचा विषय बनला असता बाळासाहेबांनी अंत:करणपूर्वक तिच्या विकासाबद्दल मामासाहेबांना दिलासा दिला तो कुस्तीकलेच्या कार्याचे मर्म ओळखून. मामासाहेबांना हायसे वाटले. त्यांना दुप्पट जोम आला.

मुंबई राज्यातील कुस्तीगीर परिषदेचे पहिले अधिवेशन १९५३ साली पुणे येथे भरले. अध्यक्षस्थानी मुंबई राज्याचे महसूलमंत्री कै. ना. भाऊसाहेब हिरे हे होते.

मामासाहेबांनी केलेले स्वागताध्यक्षीय भाषण भावनेने ओथंबलेले होते. परकीय सरकारने पैलवानी पेशासंबंधी कटाक्षपूर्वक विकृत दृष्टिकोन जनतेत पसरविला. आस्ते आस्ते जनता या पेशापासून दूर राहू लागली. एवढेच नव्हे तर पुढे पुढे तर जनतादेखील पैलवानांकडे दूषित नजरेने पाहू लागली. पैलवान म्हणजे गुंड असे समजू लागली. अर्थातच तालमींना अवकळा येत चालली. सुशिक्षित लोक तालमींकडे फिरकण्याचे टाळू लागले. तरुणांना मल्लविद्येचे आकर्षण वाटेनासे झाले. खरे पाहता बलोपासनेमुळे तरुण पिढी बलवंत, आरोग्य-संपन्न व निकोप विचाराची होते. राष्ट्रोद्धारणी तिचा उपयोग होतो. पौराणिक काळाने त्याचप्रमाणे ऐतिहासिक काळाने हे सिद्ध करून दाखविले आहे. बलवंता-शिवाय राष्ट्ररक्षण व राष्ट्रसंवर्धन होत नाही, असे आजचा काळही सांगतो. परंतु दुर्दैवाने बलोपासनेविषयी भारतीय जनतेचे मन कलुषित झालेले आहे. लहान-थोर, सुजाण–अज्ञान, सर्वजण बलोपासनेकडे–मल्लविद्येकडे दुजाभावाने पाहत आहेत. कळत वा नकळत तिची कुचंबणा करीत आहेत. अवहेलना करीत आहेत. ही विकृत मनोवृत्ती नाहीशी केली पाहिजे. राष्ट्रहिताच्या दृष्टीने मल्लविद्येकडे पाहण्याचा सदोष दृष्टिकोन बदलला पाहिजे व मल्लविद्येची जोपासना केली पाहिजे. राष्ट्राच्या कारणी मल्लविद्येची प्रचंड शक्ती वळविली पाहिजे.

कुस्तीकला ही लोककला आहे. लोकांच्या आवडीची व जिव्हाळ्याची कला आहे. परंतु स्वातंत्र्य मिळून सहा वर्षे उलटली तरी राज्यकर्त्यांचे लक्ष या कले-कडे गेले नाही. देशाच्या उपयोगासाठी या कलेचा उपयोग करून घेतला गेला नाही. देशाच्या उत्कर्षासाठी मल्लविद्येचा उपयोग निश्चितपणे करून घेता येईल. तो राज्यकर्त्यांनी घेतला पाहिजे. तद्वतच या कलेला समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. तसे प्रयत्न पद्धतशीरपणे केले पाहिजेत.

अशा आशयाचे मल्लविद्येचे समर्थन करणारे भाषण मामासाहेबांनी केले. त्याचा परिणाम असा झाला की, राजकीय वर्तुळात व जनतेतही मल्लविद्येविषयी

औत्सुक्य निर्माण झाले. मल्लविद्येविषयी दूषित दृष्टिकोन निवळण्यास सुरुवात झाली व मल्लविद्या राष्ट्रोपयोगी आहे, असे वाटण्यास प्रारंभ झाला. अशा रीतीने मल्लविद्येची प्राणप्रतिष्ठा झाली.

पुणे अधिवेशन अतिशय यशस्वी झाले. सांघिकरीत्या मल्लविद्येचा विकास करण्याचे बीज येथे चांगलेच रुजले. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी अनेकांनी परिश्रमांची पराकाष्ठा केली होती. गावोगावचे शेकडो लोक अधिवेशनास आले होते. हजारो लोकांचा जनसंमर्द अधिवेशनास आलेला पाहून बुद्धिवंतांचा व सत्ताधिकाऱ्यांचा पैलवानी पेशाबद्दल झालेला गैरसमज वितळत चालला. ही खरी मल्लविद्येच्या उदयाची प्रभात होय.

मामासाहेब मोहोळांना भारी आनंद झाला. त्यांचा उत्साह दुप्पटीने वाढला. या कार्याची मुहूर्तमेढ चांगली रोवली गेली. जनतेत अनुकूल वातावरण पसरत चालले. मामासाहेबांनी जिल्हानिहाय शाखोपशाखा काढण्याचा व त्या कार्यप्रवण करण्याचा चंग बांधला. कुस्तीच्या नियमांत इष्ट ते बदल केले आणि कुस्तीकलेचा व मल्लांच्या कर्तृत्वाचा विकास होईल, अशी रचना केली.

मामासाहेब पहिल्याच अधिवेशनात मुंबई राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष झाले. त्यावेळेपासून आजवर बारा वर्षे झाली. या मुदतीत नऊ अधिवेशने झाली. प्रत्येक वेळी मामासाहेबांची एकमताने कार्याध्यक्ष म्हणून निवड होत आली आहे.

मामासाहेबांनी ही सेवेची संधी दवडली नाही. त्यांचे आवडते क्षेत्र त्यांना मिळाले. मल्लविद्येच्या उत्कर्षासाठी मामासाहेब झटू लागले.

१९५५ साली मुंबईला अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे अध्यक्षपद कै. ना. भाऊसाहेब हिरे यांनी मोठ्या खुषीने स्वीकारले. सयाजीराव सीलम हे स्वागताध्यक्ष होते. उद्घाटक होते, ना. मोरारजीभाई देसाई. मामासाहेबांच्या व्यवहारी व चतुर प्रयत्नांचा प्रभाव हा. राज्यकर्त्यांच्या मनात मल्लविद्येविषयी आस्था निर्माण केल्याशिवाय मल्लविद्येचा विकास झपाट्याने व इष्ट दिशेने होणार नाही, असे त्यांचे ठाम मत बनले होते. मल्लविद्येच्या विकासरथाची चाके दोन. एक राज्यकर्ते व दुसरे प्रजाजन. दोन्ही चाके बळकट

पाहिजेत. मामासाहेबांनी ही दोन्ही चाके सुव्यवस्थित राखण्याचा प्रयत्न केला.

मुंबई अधिवेशनही गाजले. कार्याच्या दृष्टीने गाजले. मुंबई राज्यातील शेकडो लहानथोर मल्ल या अधिवेशनास हजर राहिले. सरकारी मदत नाही. इतर कसला आर्थिक आधार नाही, अशी स्थिती होती. तरी मल्लविद्ये-विषयीच्या जिव्हाळ्याने पदरमोड करून कुस्तीगीर आले. याचा इष्ट परिणाम सरकारवर व जनतेवर झाला. सरकारची व जनतेची मल्लविद्येच्या विकासा-विषयी सहानुभूतीची भाषा निघू लागली.

कुस्तीगीर परिषदेच्या कार्याने मूळ धरले. नव्हे, ते रोप जोराने फोफावू लागले. सरकार व जनता त्याकडे आस्थेवाईकपणे पाहू लागली.

प्रत्यक्ष अल्प प्रमाणात का होईना खतपाणी घालण्यास सरकार पुढे सरसावले ते सोलापूरच्या अधिवेशनापासून.

सोलापूरचे अधिवेशन भरले १९५८ साली. मधली दोन वर्षे १९५६ व १९५७ ही मुंबई राज्यात अतिशय धामधुमीची गेली. मुंबई स्वतंत्र ठेवण्याचा व भाषावार प्रांत रचनेचा प्रश्न ज्वलंत बनला होता. राज्यकर्ते व जनता या बिकट समस्या सोडविण्यासाठी आपापल्यापरी हिरिरीने प्रयत्न करीत होती. भावना उफाळल्या होत्या. वातावरण तप्त होते. इतर गोष्टींकडे लक्ष पुरवायला कोणालाच अवसर नव्हता. वेळ-वखत ओळखून मुंबई राज्य कुस्तीगीर परि-षदेच्या चालकांनी या मुदतीत अधिवेशनाचा प्रपंच मांडला नाही. हाती घेत-लेल्या कार्याच्या पूर्तीसाठी ही वेळ अनुकूल नव्हती.

जेव्हा वातावरण शांत झाले, निवळले, अनुकूलता निर्माण झाली, तेव्हा लागलीच १९५८ साली सोलापूर येथे कुस्तीगीर परिषदेचे अधिवेशन घेतले. श्री. केशवलाल शहा हे स्वागताध्यक्ष होते. मामासाहेब कार्याध्यक्ष. मामा-साहेबांच्या पायाला चक्रे बांधलेली. ते सारखे परिषदेच्या कार्यासाठी गरागरा फिरायचे. याला भेट, त्याला भेट, असा क्रम सारखा चाललेला असायचा. परि-षदेचे कार्य पाहून सरकारी धोरण अधिक अनुकूल बनले होते. सरकारने दहा हजार रुपये ग्रँट द्यायची ठरविले, पण अट घातली फिरत्या ढाली, कप वगैरे-साठीच ही रक्कम खर्ची घातली पाहिजे.

सरकार मदत द्यायला उद्युक्त झाले. ही समाधानाची गोष्ट होती. तो मामासाहेबांच्या प्रयत्नवादाचा व परिषदेच्या कार्याचा विजय होता. तथापि ग्रँट देताना सरकारने घातलेली ही अट परिषदेच्या कार्याला पोषक आहे, असे मामासाहेबांना वाटले नाही.

त्यांना स्वस्थ बसवेना. हालचाल केल्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यांनी लागलीच ना. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे धाव घेतली. ना. यशवंतराव चव्हाण हे त्यावेळी महाबळेश्वरी होते. मामासाहेब तातडीने तेथे गेले. यशवंतरावजींना आपला दृष्टिकोन सविस्तरपणे सांगितला. फिरत्या ढाली व कप वगैरे बक्षीस देण्यापेक्षा पैलवानांना रोख रकमा देणे कसे आवश्यक व व्यवहारी आहे, हे सांगितले. मल्लविद्येला त्यामुळे गती कशी मिळेल, याचे विवरण केले. यशवंतरावजींना आपले म्हणणे पटविण्यात मामासाहेब यशस्वी झाले. त्यांनी ग्रँटची दहा हजार रुपये ही रक्कम पैलवानांना वाटण्यासाठी परिषदेच्या हवाली करण्याचे धोरण मान्य केले. यशवंतरावजींच्या या निर्णयामुळे खरोखरच परिषदेच्या कार्याला फार जोराची चालना मिळाली.

याच भेटीच्या वेळी ना. बाळासाहेब देसाई यांना मामासाहेब भेटले. तेही महाबळेश्वरीच होते. त्यांना सगळे इतिवृत्त सांगितले. त्यांच्याशी विचारविनिमय केला. कुस्तीगीर परिषदेच्या कार्याच्या सुरुवातीपासूनच बाळासाहेब देसाई हे मामासाहेबांना जिव्हाळ्याने मार्गदर्शन करीत होते. मल्लविद्येविषयी त्यांना आपुलकीची भावना होती. ही विद्या जोपासली गेली पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. मुलाखतीच्या शेवटी मामासाहेबांनी बाळासाहेबांना सोलापूर अधिवेशनाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयी आग्रहाची व तळमळीची विनंती केली. बाळासाहेबांनीही ती मान्य केली. सुयोग जुळून आला. मल्लविद्येचा खंदा अभिमानी कुस्तीगीर परिषदेला लाभला. असे दुहेरी हितकारी यश पदरात पाडून घेऊन महाबळेश्वराहून मामासाहेब परतले.

ना. बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वाखाली सोलापूरच्या अधिवेशनाने मल्लविद्येच्या क्षेत्रात काळाला अनुरूप असे क्रांतिकारक कार्य करण्यास प्रारंभ केला. कुस्तीकौशल्य दाखविणाऱ्या पैलवानांना थोडेफार आर्थिक साहाय्य देण्याचा उपक्रम सोलापूरला पार पडला. पैलवानांमध्ये चैतन्य निर्माण झाले.

मल्लविद्येच्या बाबतीत सरकारचे धोरण सक्रीय सहानुभूतीचे आहे, हे लोकांना दिसून आले. लोकमतही अनुकूल होऊ लागले. यथा राजा तथा प्रजा. मल्लांना हुरूप आला. मल्लविद्येचा उर्जितकाळ जवळ आला, याची ही नांदी होती.

अवघ्या सहा वर्षांत एवढा मोठा बदल घडवून आणण्याचे श्रेय यशवंतरावजी चव्हाण, बाळासाहेब देसाई व मामासाहेब मोहोळ यांनाच आहे. ही त्रिमूर्ती म्हणजे परिषदेचे आधारस्तंभच होत.

जनतेत पसरलेल्या उत्साहाच्या लाटेत १९५९ साली सांगली येथे कुस्तीगीर परिषदेचे चौथे अधिवेशन ना. बाळासाहेब देसाई यांच्या अध्यक्षतेखाली भरले. श्री. वसंतरावदादा पाटील स्वागताध्यक्ष होते.

या परिषदेच्या वेळी ग्रँटदाखल सरकारने पंधरा हजार रुपये रक्कम मंजूर केली. परिषदेचे वातावरण उत्साहाने भरून गेले. परिषदेला सरकारचा वाढता पाठिंबा मिळू लागला. पैलवानांना प्रोत्साहन मिळू लागले. बलोपासनेचा स्फुलिंग झाकळला गेला होता, तो फुलू लागला.

ना. बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वाखाली व दूरदृष्टीच्या मार्गदर्शनामुळे कार्याध्यक्ष मामासाहेबांच्या कार्याचा पसारा गुणात्मक व संख्यात्मक वाढू लागला. कार्य करताना त्यांना वेळ पुरेना. विश्रांती मिळेना. तथापि हाती घेतलेले कार्य रंगरूपास येत असलेले पाहून मामासाहेबांना श्रमाचे काही वाटेनासे झाले. ते मोठ्या तडफेने कार्य करू लागले.

याच साली ऑल इंडिया इंडियन स्टाईल रेसलिंग फेडरेशनचे ( हिंदी पद्धतीच्या कुस्त्यांची अखिल भारतीय कुस्तीगीर परिषद ) अधिवेशन होते. मामासाहेबांना अवसान आले. त्यांनी या अधिवेशनात होणाऱ्या स्पर्धांमध्ये भाग घेण्याचे ठरविले. ना. बाळासाहेब देसाई यांनी प्रोत्साहन दिले. मामासाहेब निरनिराळ्या वजनगटाचे निवडक पठ्ठे घेऊन अधिवेशनास गेले. महाराष्ट्राच्या मल्लांनी अक्षरश: विजयश्री खेचून आणली. भीम-पराक्रम केला. नऊ पारितोषिकांपैकी सात पारितोषिके लीलया पटकावली आणि विशेष म्हणजे त्याच वर्षी सुरू झालेले ' हिंदकेसरी ' पदही मिळविले. पैलवान श्रीपती खंचनाळे हे भारताचे पहिले " हिंदकेसरी " होत. महाराष्ट्राच्या मल्लाने पहिला

'हिंद केसरी' होण्याचा मान मिळविला. मामासाहेबांचा आनंद गगनात मावेना. त्यांना आपल्या श्रमाचे चीज होत चाललेले याचि डोळा याचि देही दिसू लागले. ज्या कार्यासाठी राज्य कुस्तीगीर परिषदेची स्थापना करण्याचा आटापिटा केला ते कार्य सफल होऊ लागले. स्वप्ने साकार होऊ लागली. कुस्तीगीर परि-षदेच्या कार्याची खरी ओळख लोकांना यावेळी झाली. ना. बाळासाहेब देसाई यांचे द्रष्टेपण फळास येऊ लागले.

अखिल भारतीय कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनाहून परत आल्यावर विजयाने मामासाहेब हुरळून गेले नाहीत. तिकडूनही त्यांनी अनुभव सांगाती आणला. जे जे घेण्यासारखे असेल ते ते चोखंदळपणे टिपून घेण्यात मामासाहेब पटाईत आहेत. परत आल्याबरोबर मामासाहेबांनी कुस्तीच्या नव्या नियमांची आखणी केली. या नव्या नियमांप्रमाणे कुस्त्या करण्याचे आदेश शाखोपशाखांना दिले.

१९६० साली ना. बाळासाहेब देसाई यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे अधिवेशन भरले. हे पाचवे अधिवेशन. दीनदयाळ गुप्ता होते स्वागताध्यक्ष. या अधिवेशनात परिषदेचे कर्तृत्वाचे एक पाऊल पुढे टाकले. नवीन पद्धतीने कुस्त्या घेतल्या. कुस्तीचा निकाल देण्यासाठी तीन जज्ज व एक रेफरी नेमण्यात आले. कुस्तीला वेळेची निश्चित मर्यादा घालण्यात आली आणि ठराविक वेळेत कुस्ती चीतपट न झाल्यास निकाल देण्यासाठी गुणपद्धत (मार्कांची) सुरू केली. या गुणपद्धतीमुळे प्रत्येक कुस्ती निकालीच होऊ लागली. मैदानात गेलेला पैलवान हरेल किंवा जिंकेल, कुस्ती बरोबर सुटली म्हणून परत येणार नाही. गुणपद्धतीने प्रत्येक कुस्ती निकाली होऊ लागली. पैलवान सरस-निरस ठरविता येऊ लागले आणि 'नुरा' कुस्तीला पायबंद बसला. कुस्ती 'नुरा' झाली याचा अर्थ लढणाऱ्या पैलवानांनी संगनमताने कुस्ती केली. आपसात ठरवून त्याप्रमाणे लढायचे व शेवटी कुस्ती बरोबरीने सुटायची. ही लढत नव्हे. ही लढतीची फसवणूक. मल्लयुद्धाची विटंबना. मल्लविद्येची विटंबना.

नव्या पद्धतीचा अवलंब करून नागपूर अधिवेशनापासून मल्लविद्येच्या विटंब-नेला कायमचा पायबंद घातला गेला. जुन्या कुस्तीगीरांनी मात्र नव्या पद्धतीला

जोरदार विरोध केला. परंतु मामासाहेब मोहोळ या विरोधाने विचलीत झाले नाहीत. विचारपूर्वक त्यांनी पाऊल उचलले होते. पुढे टाकलेले पाऊल मागे घेणे याचा अर्थ भूमिका ठाम नसताना निर्णय घेतला होता असा होतो. मामासाहेबांची भूमिका ठाम होती. ती विचारमंथनातून निघाली होती. अनुभवाचे तिला अधिष्ठान होते. परिषदेने स्वीकृत केलेली होती. माघार घेण्याचा किंवा तीत बदल करण्याचा प्रश्नच नव्हता. गरजही नव्हती. विरोधकांच्या कल्लोळाला मामासाहेबांनी भीक घातली नाही. मामासाहेब हे झुंझार कार्याध्यक्ष आहेत. त्यांनी हा विरोध, विरोधाकडे दुर्लक्ष करून मोडून काढला.

परिषदेचे अध्यक्ष बाळासाहेब देसाई व परिषदेचे कार्याध्यक्ष मामासाहेब मोहोळ ही परिषदेला लाभलेली कृष्णार्जुनाची जोडी होय. कार्याध्यक्ष मामासाहेबांच्या पाठीशी बाळासाहेब असल्यामुळे परिषदेची प्रगती घोडदौडीने होत गेली. नव्या पद्धतीच्या कुस्तीला पद्धतशीर वळण लागावें, त्यात काही उणीवा राहू नयेत म्हणून कुस्ती-पंचांची शिबिरे घेतली. शिबिरांतून पंचांना कुस्तीला गुण कसे द्यावे, याचे शिक्षण दिले जाते. ही फार चांगली योजना आहे. नागपूर अधिवेशनापासून आजतागायत पंचांची शिबिरे नियमितपणे व अखंडपणे भरतात.

बाळासाहेब देसाई हे परिषदेचे अध्यक्ष झाले त्यावेळेपासून परिषदेला भरीवपणा व व्यापकत्व प्राप्त होऊ लागले. बाळासाहेब केवळ वार्षिक अधिवेशनाचे सभाध्यक्ष बनले नाहीत. परिषदेचे कार्य हे सामाजिक कार्य आहे. जनतेच्या जिव्हाळ्याचे व देशाच्या हिताचे ते कार्य आहे, अशी त्यांची विचारसरणी असल्यामुळे ते जातीने या कार्याशी समरस झाले व क्रियाशील अध्यक्ष बनले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे राज्य कुस्तीगीर परिषदेला एक विशिष्ट प्रकारचे वळण लागले आहे. बाळासाहेबांनी परिषदेच्या कार्याची व्याप्ती व कर्तृत्व सरकारपुढे मांडले. परिषदेचे कार्य किती मोलाचे आहे, हे सरकारला सशास्त्र व साधार पटवून दिले व असे राष्ट्र-हित साधण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या संस्थेला सरकारने रास्त ग्रँट द्यावी, अशी विनंती परिषदेकरवी केली. सरकारने यावर्षी साठ हजार रुपये ग्रँट मंजूर केली.

परिषदेची कार्यव्याप्ती मोठी होत चालली. मामासाहेबांनी आणखी एक झेप घ्यायची ठरविली. अखिल भारतीय कुस्तीगीर परिषदेचे अधिवेशन मुंबईत घेतले. महाराष्ट्रीय पैलवानांनी चमक दाखविली. पैलवान गणपत आंदळकर यांनी " हिंदकेसरी " पद मिळविले.

भारतीय सामन्यात आपले कुस्तीगीर चमकू लागले यावर मामासाहेबांचे समाधान होईना. असेच भरघोस यश जागतिक सामन्यांतही आमच्या मल्लांनी मिळविले पाहिजे व अजिंक्यपदे मिळविली पाहिजेत. देशाचे नाव उज्ज्वल केले पाहिजे, असे मामासाहेबांना वाटू लागले. त्यांनी ऑल इंडिया अमॅच्युअर रेसलिंग फेडरेशनशी ( अखिल भारतीय हौशी कुस्तीगीर परिषद ) संबंध जोडले. ऑलिंपिक स्टाईलची माहिती पैलवानांना व्हावी, त्या पद्धतीचे शिक्षण मिळाल्याशिवाय तरणोपाय नाही; म्हणून तात्काळ एक योजना आखली. काही पैलवानांना 'कोच'च्या ट्रेनिंगसाठी-शिक्षणासाठी पाठवावयाचे. रामचंद्र चव्हाण, बापू राडे, बापू भोसले, राम नलावडे व श्रीरंग जाधव यांना या योजनेनुसार पतियाळा येथे 'कोच'च्या ट्रेनिंगसाठी कुस्तीगीर परिषदेच्या वतीने पाठविले व तयार करून आणले. ऑलिंपिक स्टाईलची लढत आणि भारतीय स्टाईलची लढत यात खूपच फरक आहे. दोन्ही पद्धती प्रकृतीने भिन्न आहेत. तेव्हा राज्यात निरनिराळ्या ठिकाणी कँप घेऊन नवीन प्रकारचे ट्रेनिंग ( शिक्षण ) कुस्तीगिरांना द्यावयाचा रास्त उपक्रम पार पाडला. कांदिवली, कोल्हापूर व सांगली या ठिकाणी हे ट्रेनिंग कँप्स घेतले. या सर्व खटाटोपात श्री. तुकाराम भोसले यांचे भारी साहाय्य झाले.

यामुळे अखिल भारतीय कुस्ती स्पर्धेत भाग घेण्यासाठी महाराष्ट्राच्या टीम्स नियमितपणे जाऊ लागल्या.

एवढेच नव्हे तर भारताची सीमा ओलांडून परदेशांतही आमचे मल्ल जाऊ लागले. एवढी हिंमत, एवढा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला. आमच्या मल्लांच्या कर्तृत्वाला जगाचे क्षेत्र मोकळे झाले.

जाकार्ता येथे १९६० साली आशियायी स्पर्धा होत्या. त्या स्पर्धांत आमच्या मल्लांनी भाग घेतला. मैदान गाजविले.

राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्य भरीव होत चालले. योग्य मार्गाने चालले. अपेक्षित गतीने चालले. जे ध्येय उराशी बाळगले होते, ते साध्य होण्याचा रंग दिसू लागला.

राज्य कुस्तीगीर परिषदेची नंतरची अधिवेशन खालीलप्रमाणे भरली--

१९६१ साली औरंगाबाद येथे स्वागताध्यक्ष श्री. काकासाहेब देशमुख.

१९६२ साली धुळे येथे स्वागताध्यक्ष श्री. चुडामण पाटील.

१९६३ साली सातारा येथे स्वागताध्यक्ष श्री. दादासाहेब जगताप.

१९६४ साली अमरावती येथे स्वागताध्यक्ष श्री. वैद्य.

१९६४ च्या सुरुवातीला मामासाहेब इराणला गेले भारतीय मल्लांचे पथक घेऊन. सदिच्छा पथक. याच वर्षाच्या उत्तरार्धात टोकियो येथे भरलेल्या ऑलिंपिक सामन्यांसाठी भारतीय मल्लांची पथके पाठविण्यात आली होती. मामासाहेब त्यांच्या समवेत होते.

मामासाहेबांना मल्लविद्येच्या क्षेत्रात जे काही करता आले, त्याचे श्रेय अनेकांना आहे. परंतु त्यातल्या त्यात बोलायचे झाले तर सर्व श्रेयाचे धनी मामासाहेब मोहोळ हे एकटेच नसून, त्यात बाळासाहेब देसाईही आहेत, असे म्हणणे सत्यास धरून होईल. कारण मामासाहेबांच्या हातून हे कार्य झाले, होत आहे, हे सारे खरे. मामासाहेब जिवापाड मेहनत घेत आहेत हेही खरे. तथापि बाळासाहेब देसाई यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन व प्रत्यक्ष साहाय्य नसते तर मामासाहेबांच्या कर्तृत्वाला सीमा पडल्या असत्या. बाळासाहेब देसाई पाठीशी नसते तर एवढे भरघोस कार्य एवढ्या अल्पावधीत करणे मामासाहेबांना अशक्य झाले असते, ही गोष्ट मामासाहेब कबूल करतात.

कुस्तीगीर परिषदेचा पसारा खूप वाढला आहे. महाराष्ट्राच्या सव्वीस जिल्ह्यांत तिच्या शाखा आहेत. तालुका पातळी, जिल्हा पातळी व शेवटी राज्य पातळीवर कुस्त्यांचे सामने घेतले जात आहेत. हजारो लहानथोर पैलवान याचा फायदा घेत आहेत. पैलवानांच्या कर्तृत्वाला वाव मिळू लागला आहे. 'महाराष्ट्र-केसरी' 'हिंदकेसरी' अशी बहुमानाची पदके आमचे पैलवान मिळवू लागले आहेत. श्रीपती खंचनाळे, गणपत आंदळकर व मारुती माने हे तिघे हिंदकेसरी,

तर गणपत खेडकर महाराष्ट्र-केसरी बनले आहेत. मल्लविद्येची उपेक्षा थांबली आहे. उत्कर्षाची वाटचाल ती चालत आहे. मामासाहेब मल्लविद्येच्या उत्कर्षा-साठी तनमनाने झटत आहेत. झिजत आहेत. त्यांनी मल्लविद्येच्या विकासाच्या कार्यास वाहून घेतले आहे. त्यांचे ते जीवितकार्य आहे.

हा असा आला आहे, मामासाहेबांच्या जीवन-सरितेचा प्रवाह गेली साठ वर्षे वाहत. त्यांचे जीवन म्हणजे संकटांशी मुकाबला करीत यशोमार्ग आक्र-मणाऱ्या मर्दाची कथा आहे. हलाखीत जन्मलेल्या माणसांना ही कथा वाचून धीर येईल, उमेद येईल व वाटू लागेल की आपणास बावरून जाण्याचे कारण नाही. चिकाटीने, धैर्याने, निष्ठेने, विचारपूर्वक सतत कष्ट करीत गेले की अड-चणींवर मात करता येते. स्थिती बदलता येते. मानमान्यतेस पोहोचता येते, पण ते साध्य होण्यासाठी टाकीचे घाव सहन केले पाहिजेत.

आल्या प्रसंगाचे आघात सोशीत सोशीत मामासाहेबांनी प्रगतीचा टप्पा गाठला. कारण त्यांनी सोसले आहेत अगणित टाकीचे घाव !

REFBK-0014464

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
दि:
दि:
१४४६४

## कृ. गो. सूर्यवंशी यांची
## प्रकाशित वाङ्‌मय संपदा

### नाटके

| | | |
|---|---|---|
| १ | न मळलेली वाट | रु. १–५० |
| २ | पांढरा ढग | रु. १–२५ |
| ३ | ओवाळणी | रु. १–२५ |
| ४ | तुम्ही तिथं आम्ही | रु. २–०० |
| ५ | पुतना मावशी | रु. ०–३७ |
| ६ | गोकुळचा कान्हा | रु. ०–३७ |

### रेडिओवरील श्रुतिका

| | | |
|---|---|---|
| १ | घर माझे गाव तुमचे | रु. १–२५ |
| २ | आम्हीच आमुचे रक्षणकर्ते | रु. १–२५ |

### चरित्र

| | | |
|---|---|---|
| १ | टाकीचे घाव | रु. |

### छापत आहे

१ मल्लविद्येचा उदय आणि विकास

अशक्य
सव्वीस
राज्य
ाचा
ाष्ट्र-
ागले
ारी,